
# अर्णवाचें आमंत्रण

१६६८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भूप्रवास
स. क्र. ४७३.



REFBK-0017214
REFBK-0017214

काका कालेलकर

भारत-दर्शन : ५

७५६२९
२०१३।६९

# अर्णवाचें आमंत्रण

८६३
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५६२९ ... ग्रु प्रवास
८६३ ... २०१३।६९

लेखक :

काका कालेलकर

REFBK-0017214
REFBK-0017214

रवीन्द्र केळेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९५२९८
... शाखा (स्थळ प्रत)

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

श्री : ५७२ [ २-६८ ]

© १९६८

काका कालेलकर

आवृत्ति पहिली

शके १८८९, सन १९६८

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ

वोरा ॲण्ड कंपनी

पब्लिशर्स प्रा. लि., करितां

३, राउंड बिल्डिंग

मुंबई २

मुद्रक :

ज. श्री. टिळक

केसरी मुद्रणालय

५६८, नारायण पेठ,

पुणें २

# भारत-दर्शन

: ५ :

# अक्षता

नित्य-प्रवासी काकांच्या हिंदी, मराठी, गुजराथी भाषांतील मर्मस्पर्शी नि भावनोत्कट अशा प्रवासवर्णनांतून निवडलेल्या – संपादन करून घेतलेल्या 'भारतदर्शना'चा हा पांचवा भाग. अर्थात् या संग्रहांत केवळ भारताचेंच दर्शन नाहीं, तर भारताबाहेरच्याहि जगाचें दर्शन कांहीं प्रमाणांत घडत आहे. मात्र दर्शकाची नि प्रेक्षकाचीहि दृष्टि भारताशीं एकनिष्ट रहावी असेंच त्याचें स्वरूप आहे.

प्रवासवर्णनासारख्या विषयांतहि काकांमधील विचारवंत देशभक्त जागा असतो, हें यापूर्वीच्या भागांतूनहि प्रत्ययाला आलेलेंच आहे; यांत तें प्रकर्षानें प्रत्ययाला येईल.

"स्वराज्य होण्यापूर्वीच आपण हिंदी महासागर आपला करावयास पाहिजे होता. राष्ट्रीय सरकारनें प्रत्येक भारतीयाच्या घरांत हिंदी महासागराचा एक भला मोठा नकाशा पांहोंचविला पाहिजे. आज त्या प्रचंड महासागराला 'हिंदी महासागर' असें म्हणतात खरें; पण तो आपला नाहीं, इंग्रजांचा आहे. त्यांच्या ग्रंथांत या महासागराला आत्मीयतेनें 'ब्रिटिश सरोवर' म्हणतात – कारण, या महासागराच्या सर्व बाजूंनीं ब्रिटिश पुरुषार्थ पेरलेला आहे. जेव्हां आपण समुद्राला पादाक्रान्त करून समुद्राची दोरती वाढवूं तेव्हांच या दक्षिण महासागराला 'हिंदी' हें विशेषण शोभेल!"

काकांचें हें विश्लेषण कठोर नि कटु असलें तरी सत्य आहे. या वृद्ध देशभक्ताकडून नव्या पिढीला प्रेरणा देणारे असे अनेक विचार या पुस्तकांतून अवश्य मिळतील. ते स्वीकारण्याची मनाची तयारी ठेवून हें वाचलें मात्र पाहिजे.

१. अर्णवाचें आमंत्रण
२. प्रथम समुद्रदर्शन
३. गोकर्णाची यात्रा
४. छप्पन्न वर्षांची भूक
५. भरताच्या डोळ्यांनीं
६. रण कीं सरोवर
७. सार्वभौम भरती-ओहटी
८. चांदीपूर
९. दक्षिणेच्या टोंकास
१०. कराचीच्या वाटेवर
११. लाटांचा तांडवयोग
१२. समुद्राच्या पाठीवर
१३. समुद्राच्या सहवासांत
१४. रेखोल्लंघन
१५. जपानला जातांना
१६. सागर-सरितेचा संगम
१७. सार्वभौम जीवनसागर
१८. हिंदी महासागराची हांक

## अनुक्रम

# अर्णवाचें आमंत्रण

१

समुद्र अथवा सागर यासारखा परिचित शब्द सोडून अर्णव शब्द मीं निवडला तो केवळ आमंत्रण शब्दाशीं जुळणाऱ्या अनुप्रासाच्या लोभानें नव्हे. अर्णव शब्दामधून उंच उंच लाटांच्या अखंड तांडवाचें सूचन होतें. वादळ, अस्वस्थता, अशांति, वेग, प्रवाह आणि कोणत्याहि प्रकारच्या बंधनाविषयींची चीड हे सर्व भाव अर्णव शब्दांतून व्यक्त होतात. अर्णव शब्दाचा धात्वर्थ आणि त्याचें उच्चारण या दोन्ही गोष्टी वरील भावाभिव्यक्तीला पोषक अशाच आहेत आणि म्हणूनच पुष्कळदां वेदामधें अर्णव शब्द समुद्राचें विशेषण म्हणून वापरण्यांत येतो. विशेषतः वेदांतील विख्यात अघमर्षण सूत्रांत जो अर्णव-समुद्राचा उल्लेख आहे तो त्याच्या भव्यतेचा सूचक आहे.

अशा अर्णवाचा संदेश आजच्या आपल्या जगापुढें सादर करण्याची शक्ति मला प्राप्त व्हावी म्हणून प्रारंभींच वैदिक देवता—सागरसम्राट् वरुणाला मी नमन करतों.

वरुण हा, जेथें मार्ग नाहीं, तेथें मार्ग करून देणारा देव आहे. प्रभंजनाच्या तांडवानें जेव्हां वाळवंटांत वाळूच्या लाटा उसळूं लागतात, तेव्हां तेथेंहि प्रवाशांना दिशा-दर्शन करून देण्याचें काम वरुणाचेंच; आणि अनंत आकाशांत आपल्या पंखांची शक्ति अजमावणाऱ्या त्रिखंड-यात्री पक्ष्यांना व्योममार्ग दाखवून देणारा देखील वरुणच होय. आणि वेदकाळांतील भुज्युपासून ते कालच ज्याला मिसरूड फुटली आहे अशा खलाश्यापर्यंत प्रत्येकाला समुद्रावर मार्गदर्शन करण्याचें काम जसें वरुणाचें, त्याचप्रमाणें नव्या नव्या क्षेत्रांत प्रवेश करून, नवे नवे रस्ते तयार करून देणारा यमराज असो, किंवा अगस्ति असो, त्यांना हिंमत व प्रेरणा देणारा दीक्षागुरु वरुणच होय.

वरुण जसा यात्रेकरूंचा वाटाड्या आहे तसाच मनुष्यजातीला तो न्याय आणि व्यवस्था देणारा देव आहे. ‘ ऋतम् ’ आणि ‘ सत्यम् ’ यांचा

साक्षात्कार त्याला पूर्णपणें झालेला असल्यामुळें तो प्रत्येक आत्म्याला सत्याच्या मार्गानें जाण्याची प्रेरणा देतो. न्यायाप्रमाणें वागण्यांत जें सौंदर्य आहे, जें समाधान आहे आणि जें अंतिम साफल्य आहे, त्याची वरुणाकडून दीक्षा घ्यावी आणि जर कुणा लोभी, अदूरदर्शी मनुष्यानें वरुणाच्या या न्यायनिष्ठेचा अनादर केला, तर वरुण त्याला जलोदरानें पीडित करतो. ज्यायोगें मानवाला कळावें कीं लोभाच्या वृक्षाला कधींहि मधुर फळें लागत नाहींत.

ज्याप्रमाणें परममंगल, कल्याणकारी, सदाशिव आपली किंमत कमी होऊं नये, आपण अगदीं स्वस्त बनूं नये म्हणून अधूनमधून रुद्ररूप धारण करतात, त्याचप्रमाणें रत्नाकर समुद्र देखील अट्टहास्य करणाऱ्या लाटांच्या जोरावर भित्र्या माणसाला दूर ठेवतो. नाजुक मुलायम वनस्पति व घरकोंबडीं माणसें यांनीं आपल्या किनाऱ्यावर स्थिर होऊं नये म्हणून भरतीओहटी चालवून तो सर्वांना बजावीत असतो कीं माझ्याशीं वागतांना योग्य अंतर ठेवूनच तुम्हीं वागलें पाहिजे.

समुद्राच्या कांठावर उभें राहून लाटा उसळतांना आणि ओसरतांना पाहिल्या. अमावास्येला व पौर्णिमेला भरती येत असलेल्या व ओसरत असलेल्या पाहिल्या, हें सारें पाहून देखील जेव्हां बुद्धीला याचें रहस्य उमजेना तेव्हां हृदय उद्गारलें– 'इतकें देखील समजत नाहीं ? आपण श्वासोच्छ्वास करतांना आपली छाती नाहीं का वरखालीं होत ? हा विराट् सागर देखील तसाच श्वास घेत आहे त्याची ही धडधड आहे; त्याला येणारा हा उमाळा आहे. जमिनीवर माणसानें जें पापाचरण आणि अत्याचार माजविले आहेत ते पोटांत घालण्याची क्षमावृत्ति धारण करण्याची शक्ति यावी म्हणून महासागराला इतका हृदयाचा व्यायाम करावा लागतो !'

ज्या लाटा हृदयदुर्बळ लोकांना डरावून दूर ठेवतात, त्याच लाटा वीर पराक्रमी लोकांना प्रेमळ, ऊर्मिल आणि फेसाळ आमंत्रण देतात कीं, 'चला ! या स्थिर जमिनीवर काय उभे राहिलां आहांत ? उभ्या उभ्या गंजून जाल ! घ्या एक जहाज, व्हा त्यावर स्वार, उभारा शीड आणि चला जेथें वाऱ्याचा प्राण नेईल तेथें. आम्ही सर्व जरी सागराचीं लेकरें असलों, तरी आमचा दीक्षागुरु आहे वारा. तो जसा नाचवील तसे आम्ही नाचत असतों. तुम्हीं सुद्धां हेंच व्रत घ्या आणि चला आमच्याबरोबर !' उमद्या हृदयाला असलें आमंत्रण नाकारणें कधींच शक्य होणार नाहीं.

लहानपणीं सिंदबादची गोष्ट तुम्हीं वाचली नाहीं का ? सिंदबादजवळ विपुल धन होतें, जमीनजुमला सारें कांहीं होतें. आपल्या मायेनें त्याच्या जीवनांत कसलीहि उणीव उरूं न देणारे नातेवाईकहि त्याच्या आसपास अनेक होते. इतकें सारें असलें तरी समुद्राची गाज कानीं पडली कीं त्याला घरांत बसवत नसे. लाटांचा पाळणा सोडून जो घरीं पलंगावर निजतो तो खरोखर दुर्दैवी होय. हृदय म्हणे, 'चल, नीघ !' सिंदबाद समुद्रपर्यटनाला गेला, तेथें अनेक प्रकारें हैराण झाला. मधुर अनुभवापेक्षां कटु अनुभवच त्याला अधिक आले. म्हणूनच त्यानें एकदां शपथ घेतली कीं पुन्हां म्हणून समुद्रयात्रेचें नांव घ्यायचें नाहीं.

परंतु किती झालें तरी शेवटीं तो एक मानवी आणि अकर्मण्य संकल्प होता. त्या संकल्पाला सम्राट् वरुणाचा आशीर्वाद थोडाच मिळाला होता ? थोडे दिवस गेले आणि गृहस्थजीवन त्याला अळणी अळणी वाटूं लागलें. रात्रीं तो झोंपीं जाई, पण झोंप येत नसे. सारख्या लाटा त्याच्याशीं गोष्टी करीत. उत्तररात्रीं किंचित् डोळा लागला तर स्वप्नांत देखील लाटा उसळूं लागत आणि आपलीं लवचिक बोटें हलवून हलवून त्याला बोलावूं लागत. कुठवर तो आपला हेका चालूं ठेवणार ! अन्यमनस्क होऊन तो सहज फिरायला म्हणून बाहेर पडला तर त्याचे पाय बागेचा रस्ता सोडून समुद्राच्या पांढऱ्या शुभ्र व चकाकणाऱ्या वाळूकडेच त्याला घेऊन जात. शेवटीं त्यानें चांगलीं चांगलीं जहाजें विकत घेतलीं, खंबीर मनाचे खलाशी नोकरीवर ठेवले, तऱ्हेतऱ्हेचा माल सोबत घेतला आणि 'जय दरिया पीर' असें म्हणून जहाजें हाकारलीं.

ही तर झाली काल्पनिक सिंदबादची गोष्ट, परंतु आपल्याकडील सिंहपुत्र विजय तर एक ऐतिहासिक पुरुष होता. बाप त्याला कुठेंहि जाऊं देईना. त्यानें पुष्कळ मनधरणी केली, परंतु त्यांत तो यशस्वी झाला नाहीं. शेवटीं त्यानें कंटाळून जाऊन असा कांहीं धुमाकूळ घालायला सुरुवात केली कीं प्रजा अगदीं कातावून गेली आणि राजापाशीं येऊन म्हणूं लागली कीं, 'राजा, एक तर तूं आपल्या मुलाला देशाबाहेर हांकलून लाव, नाहींतर आम्ही तरी तुझा देश सोडून निघून जातों.' पित्यानें मोठींमोठीं जहाजें आणलीं. त्यांत आपल्या मुलाला व त्याच्या दंगेखोर साथीदारांना बसविलें आणि सांगितलें, 'आतां जिथें जायचें असेल तेथें जा. परत आपलें तोंड

दाखवूं नका.' ते निघाले. सौराष्ट्राचा किनारा त्यांनीं मागें टाकला, भृगुकच्छ सोडलें; सोपारा सोडलें; दाभोळ सोडलें; थेट मंगलापुरीला ते पोंचले. तेथेंहि राहूं न शकल्यामुळें हिंमतपूर्वक पुढें प्रवास करून ते ताम्रद्वीपांत जाऊन बसले आणि तेथले राजा बनले. विजयच्या पित्यानें आपल्या मुलाला परत येण्याची मनाई केली होती, परंतु त्याच्या मागोमाग कुणी जाऊं नये असें फर्मान काढलें नव्हतें. त्यामुळें अनेक दर्यावर्दी लोक विजयच्या मार्गानें जाऊन नवे नवे विजय मिळवूं लागले. जातां जातां ते महाबलिष्ठ लोक जावा आणि बालिद्वीपापर्यंत पोंचले. तेथील समृद्धि, तेथलें हवापाणी आणि तेथलें सृष्टिसौंदर्य पाहिल्यानंतर तेथून परतण्याची इच्छा कुणाला होणार! त्यानंतर तर आजच्या भावनगरजवळील घोघा बंदराच्या वरानें सगळा पश्चिम किनारा ओलांडून, लंकेच्या नवरीशीं लग्न करावें हा जवळ जवळ नियमच होऊन बसला होता.

या बाजूस बंगालचे नदीपुत्र नदी-मुखेन समुद्रांत प्रवेश करूं लागले. ज्या बंदरांतून निघून ताम्रद्वीपाला जातां येत असे, त्या बंदराचें नांव त्यांनीं ताम्रलिप्ति (आजचें तामलुक) असें ठेवलें. अशा रीतीनें ताम्रद्वीप लंकेंत अंगवंगाचे बंगाली, ओरिसाचे कलिंग आणि पश्चिमेकडील गुजराथी गोळा झाले. मद्रासमधील द्रविड तर तेथें केव्हांच जाऊन पोंचले होते. अशा रीतीनें पूर्व, पश्चिम व दक्षिण भारत आपापल्या अर्णवांच्या आमंत्रणावरून लंकेमध्यें एकत्र झाले.

बुद्धभगवानांनीं निर्वाण प्राप्त करून घेण्याचा मार्ग शोधून काढला आणि आपल्या शिष्यांना आदेश दिला कीं, 'या अष्टांगिक धर्मतत्त्वाचा दशदिशांना प्रसार करा!' त्यांनीं स्वतः उत्तर भारतांत चाळीस वर्षें प्रचाराचें कार्य केलें. आसेतुहिमाचल आपलें साम्राज्य पसरविण्यासाठीं निघालेल्या सम्राट् अशोकाला दिग्विजय सोडून धर्मविजय करण्याची इच्छा झाली. धर्मविजय म्हणजे आजच्याप्रमाणें धर्माच्या नांवाखालीं देशदेशांतरींच्या प्रजेला लुटून, गुलाम करून बाटवण्याचा धंदा नव्हे; तर लोकांना कल्याणाचा, आपलें जीवन कृतार्थ करून घेण्याचा अष्टांगिक मार्ग दाखवणें. बुद्धभगवान जसे स्वतः गेंड्याप्रमाणें अकुतोभय होऊन रानावनांतून फिरत, त्याचप्रमाणें त्यांचे साहसी शिष्य अर्णवाचें आमंत्रण ऐकून देशदेशांतराला जाऊं लागले. कांहीं पूर्वेकडे गेले, कांहीं पश्चिमेकडे.

आजदेखील पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर या साधूंचीं ठाणीं पहाडांत कोरलेलीं सांपडतात. सोपारा, कान्हेरी, घारापुरी वगैरे स्थळें बौद्ध मिशनऱ्यांच्या परदेशयात्रेचीं सूचक आहेत. ओरिसामधील खंडगिरि आणि उदयगिरि येथील लेणीं देखील याच गोष्टीची साक्ष देतात.

याच बौद्धधर्म-प्रचारकांपासून प्रेरणा घेऊन प्राचीनकाळचे ख्रिस्तीदेखील समुद्रावाटें निघाले आणि त्यांनीं अनेक देशांत भगवद्भक्त ब्रह्मचारी येशू ख्रिस्ताच्या संदेशाचा प्रसार केला.

जे स्वार्थवश होऊन समुद्रयात्रा करतात त्यांनासुद्धां समुद्र मदत करतो खरा. पण वरुण म्हणतो, 'स्वार्थी लोकांना माझी आडकाठी आहे. त्यांचा मी निषेध करतों. परंतु जे धर्मप्रचारासाठीं निघतील त्यांना माझा आशीर्वादच आहे. मग ते महिन्द व संघमित्ता असोत किंवा विवेकानन्द असोत. सेन्ट फ्रान्सिस झेवियर असो किंवा त्याचा गुरु इग्निशियस लॉयला असो.'

आतां अर्णवाची मदत घेणाऱ्या स्वार्थी लोकांचा इतिहास पाहूं. मकराणी लोक बलुचिस्तानच्या दक्षिणेस राहून पश्चिम सागराचा किनारा पालथा घालीत. हिन्दुस्थानचा व्यापार त्यांच्याच हातांत होता. हिरीरीनें त्यांनीं तो आपल्याच हातांत ठेवला होता. त्यामुळें एका वरुणपुत्राला वाटलें कीं, 'आपण दुसरा सागरी मार्ग शोधून काढला पाहिजे. वरुणानें त्याला सांगितलें कीं, अमुक महिन्यांत अरबस्तानहून तुझें जहाज तूं भर समुद्रांत हांकारलेंस तर सरळ कालीकतकडे येऊन पोंचशील. एक-दोन महिने हिन्दुस्थानांत व्यापार करून तूं परत स्वदेशीं जायला निघालास कीं त्या सुमारास मी माझ्या वाऱ्याची दिशा उलट करून तुला आलेल्या रस्त्यानेंच परत स्वदेशीं पोंचवीन.' ही गोष्ट इ. स. ५० पूर्वींची आहे.

दूर दूर पश्चिमेला वायकिंग म्हणून चांचे लोक रहात असत. वरुणाचे ते आवडते होते. ग्रीनलंड, आईसलंड, ब्रिटन आणि स्कॅंडीनेव्हिया यांच्यामधील थंड आणि वादळी समुद्रांतून ते प्रवास करीत. आजचे इंग्रज हे त्यांचेच वंशज होत. नॉर्वे, ब्रिटन, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल या समुद्रकिनाऱ्यावर वसलेल्या राष्ट्रांनीं आळीपाळीनें समुद्र पालथा घातला. त्या सर्वांना हिंदुस्थानला यावयाचें होतें. मधें पूर्वेकडे मुसलमानी राज्यें होतीं. त्यांना वळसा घालून किंवा टाळून हिन्दुस्थानचा रस्ता शोधून काढायचा होता. सर्वांनीं वरुणाची उपासना करायला सुरुवात केली आणि समुद्राचा

मार्ग धरला. कांहीं गेले उत्तरेकडे, कांहीं गेले अमेरिकेकडे. कित्येकांनीं आफ्रिकेची उलटी प्रदक्षिणा केली आणि शेवटीं एकदांचे सगळे हिन्दुस्थानला येऊन पोंचले. समुद्र म्हणजे लक्ष्मीचा पिता. त्याच्यावरून प्रवास करणारे सर्व लक्ष्मीच्या कृपेचे पात्र बनावेत हें स्वाभाविक होतें. त्या सर्वांनीं नवे नवे देश जिंकले, धनदौलत गोळा केली; परंतु वरुणाच्या न्यायासनाचा त्यांना विसर पडला. वरुण हा न्यायाचा देव आहे. त्याच्यांत जशी धीर धरण्याची वृत्ति आहे, तसाच पुण्यप्रकोप देखील आहे. ‘ आपण या लोकांना समुद्राचें राज्य दिलें, परंतु त्यांनीं राजाला शोभेल असा न्याय-धर्म पाळला नाहीं !’ असें जेव्हां वरुणराजाला दिसून आलें, तेव्हां त्यानें आपला आशीर्वाद मागें खेंचून घेतला आणि सर्वांना जलोदराची शिक्षा फर्मावली. आतां या राष्ट्रांनीं हिंदुस्थान आणि आफ्रिका ह्या दोन्ही खंडांतून जी कांहीं संपत्ति मिळवून आणली होती ती ते आपआपसांत लढण्यासाठीं वापरूं लागले आहेत आणि आपल्या प्राणांबरोबर ती सगळी संपत्ति आकाशांत लढवून जलाच्या उदरांत बुडवूं लागले आहेत. समुद्रयान असो कीं आकाशयान, शेवटीं पोंचायचें समुद्र-जलाच्या उदरांतच. आतां वरुणराज कोपला आहे. सागराची सेवा घेणाऱ्या लोकांत जर सात्त्विकता नसेल तर ते जगांत उत्पात माजवणार आहेत याची त्याला खात्री झाली आहे. आतांपर्यंत त्यानें विज्ञान-शास्त्र्यांना तसेंच ज्योतिषशास्त्र्यांना, विद्यार्थ्यांना तसेंच लोकसेवकांना समुद्र-पर्यटनाची प्रेरणा दिली. आतां तो हिंदुस्थानाला एक नवीनच प्रेरणा देऊं पहात आहे. हिंदुस्थानापुढें एक नवीन मिशन ठेवूं पहात आहे. तें ऐकण्याची आपली तयारी आहे का ?

आपण पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर रहातों. दिवस-रात्र पश्चिम सागराचें * आमंत्रण आपल्या कानीं पडत असतें. आतांपर्यंत आपण बहिरे होतों. हा संदेश आपल्या कानांवर पडूनहि आंत उतरत नव्हता. आतां ही स्थिति राहिली नाहीं. युरोपच्या महाप्रजांनीं आपल्यावर राज्य स्थापित

---

* आपल्या या शेजाऱ्याला आपण अरबी समुद्र या नांवानें संबोधणें हें अगदीं विचित्र आहे ! विलायतेहून येणारे गोरे लोक त्याला खुशाल ‘अरबी समुद्र’ म्हणोत. आपल्या दृष्टीनें तो मुंबई समुद्र अथवा पश्चिम सागर आहे. याच नांवाचा आपण वापर केला पाहिजे.

करून आपल्याला मोहिनींत टाकलें होतें. आतां ती मोहिनी उतरली आहे. आपले कान उघडले आहेत. जगाच्या नकाशाकडे आपण नव्या दृष्टीनें पाहूं लागलों आहोंत. महासागर भूमिखंडांना एकमेकापासून तोडत नाहींत, तर जोडतात हें आपण आतां समजूं लागलों आहोंत. आफ्रिकेचा सगळा पूर्व किनारा आणि कलकत्त्यापासून ते सिंगापूर आल्बनी ( ऑस्ट्रेलिया ) पर्यंतचा पूर्वेकडील पश्चिम किनारा आपल्याला आमंत्रण देत आहे कीं, ईश्वरानें तुम्हांला जें कांहीं ज्ञान, चारित्र्य व वैभव दिलें असेल, त्याचा फायदा येथल्या जमातींना करून द्या. एका बाजूला आफ्रिका आहे, दुसऱ्या बाजूला जावा आहे, बाली आहे, ऑस्ट्रेलिया आहे, टास्मानिया आहे आणि प्रशान्त महासागरांतील असंख्य बेटें आहेत. तीं सर्व अर्णवाच्या वाणीनें आपल्याला बोलावीत आहेत.

या सर्व ठिकाणीं सागराच्या प्रेरणेनें, अनेक मिशनरी गेले होते, परंतु सर्वत्र ते आपल्याबरोबर दारू घेऊन गेले, वंशावंशांतील उच्चनीच भाव घेऊन गेले, येशूखिस्ताला विसरून फक्त त्याचें बायबल घेऊन गेले. आणि त्या बायबलाच्या मदतीनें त्यांनीं आपापल्या देशाचा व्यापार मात्र वाढवला. अर्णव त्यांना घेऊन गेला खरा, पण वरुण त्यांच्यावर नाराज झाला आहे. आपण भारतवासी प्राचीन काळांत चीनला गेलों, यवनांच्या देशीं ग्रीसला गेलों, जावा आणि बालीला गेलों. आपण 'सर्वे सन्तु निरामया:' या संस्कृतीचा विस्तार केला. परंतु कधींहि त्या त्या ठिकाणीं आपलीं साम्राज्यें स्थापन करण्याची दुर्बुद्धि आपण मनांत आणली नाहीं. दुसऱ्या लोकांच्या मानानें आपले हात स्वच्छ आहेत, त्यामुळें वरुणाचा आदेश आहे—अर्णव आपल्याला आवाहन करीत आहे आणि सांगत आहे, " दुसरे लोक विजयपताका घेऊन गेले; तुम्ही अहिंसाधर्माची तिरंगी अभयपताका घेऊन निघा आणि जेथें जाल तेथें सेवेचा सुगंध पसरवा. शोषणासाठीं नव्हे, तर मागासलेल्या लोकांच्या पोषणासाठीं आणि शिक्षणासाठीं बाहेर पडा. आफ्रिकेचे शालिग्रामवर्णाचे तुमचे बांधव तुम्हांला बोलावीत आहेत. पूर्वेकडील केतकीसुवर्णवर्णाचे तुमचे बांधव तुमची वाट पहात बसले आहेत. त्या सर्वांच्या सेवेसाठीं बाहेर पडा आणि सर्वांना सांगा कीं, अहिंसा हाच परमधर्म आहे. उच्चनीच भाव, अभिमान, अहंकार अशा हीन वृत्तींना या धर्मांत थारा नाहीं. भोग आणि ऐश्वर्य म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून

जीवनावर सांचणारें शेवाळ आहे. संयम आणि सेवा, त्याग आणि बलिदान, यांतच जीवनाची कृतार्थता आहे. या धर्मांचें ज्यांना आकलन झालें आहे, त्या सर्वांनीं निघावें ! पूर्वसागर व पश्चिमसागर यांच्या मधें दक्षिणेकडे घुसणारा हजारों मैलांचा किनारा तयार करून हिन्दुस्थानाला हिन्दी महासागरांत जें स्थान दिलें गेलें आहे तें कांहीं समुद्रविमुख होण्यासाठीं नव्हे. समुद्रयात्रा करून अहिंसेच्या विश्वधर्माचा परिचय साऱ्या विश्वाला करून देण्यासाठीं तें दिलें गेलें आहे. ”

युरोपमधल्या महायुद्धाचा अंत झाल्यावर जगाचें रूप जसें पालटणार असेल तसें पालटो परंतु असंख्य भारतीय जन यापुढें अर्णवाचें आमंत्रण ऐकून वरुणाकडून दीक्षा घेऊन हळू हळू देशदेशान्तरांत पसरूं लागतील याविषयीं मला शंका नाहीं. सागराच्या पृष्ठभागावर आपलीं जहाजें डोलतांना मी पहातों, त्यांच्या अभयपताका आकाशांत फडकतांना मला दिसतात, आणि माझें हृदय उचंबळून येतें. अर्णवाचें हें आमंत्रण आतां मला स्वतःला स्वीकारणें फारसें शक्य नसलें तरी तरुण हृदयापर्यंत तें आमंत्रण मी पोंचवूं शकतों याचीच मला धन्यता वाटते. वरुणराजाला आमचें वंदन असो ! जय वरुणराजकी जय !!

ऑक्टोबर, १९४०

* * *

# प्रथम समुद्रदर्शन

२

वडिलांची कारवारला बदली झाली आणि आम्हीं सातारा सोडलें. आम्ही प्रथम शाहपूरला गेलों. तेथें कांहीं दिवस राहून आम्ही वेस्टर्न इंडिया पेनिन्शुलर रेल्वेमधें बसून मुरगांवला गेलों. वाटेंत गुंजीच्या स्टेशनवर कारंजीं उडत होतीं तीं पहाण्याची आम्हांला मोठी मौज वाटली. लोंढ्याला गाडी बदलून डब्ल्यू. आय्. पी. रेल्वेच्या डब्यांत आम्ही बसलों.

कॅसलरॉकपासून तीनई घाटापर्यंत घाटाची शोभा डोळे भरभरून पाहिली. बघण्याचा आनंद अधिक होता कीं एकमेकांना बोलून दाखवण्याचा, हें सांगणें कठीण. पण आम्ही उजव्या खिडकीकडून डाव्या खिडकीकडे आणि डावीकडून उजवीकडे, असें नाचून डब्यांतील लोकांना अगदीं नकोसें केलें.

पुढें आला दूधसागर. तो तर आमचेहून मोठमोठ्या उड्या मारी. आम्हीं यापूर्वीं धबधबा पाहिला नव्हता. इतकें दूध वाहात चाललेलें पाहून खूपच मौज वाटली आणि आमची आगगाडीहि मोठी रसिक! अगदीं धबधब्यासमोरच्या पुलावर ती उभी राहिली आणि धबधब्याचे थंडगार तुषार खिडकीवाटे आमच्या डब्यांत येऊन आम्हांला गुदगुल्या करूं लागले. त्या दिवशीं आम्हीं बाकीचा दिवस धबधब्याच्याच गोष्टी केल्या.

आम्ही मुरगांवला पोहोंचलों. हल्लीं मुरगांवला लोक मार्मागोवा म्हणतात. आम्ही स्टेशनवर उतरलों. पुष्कळसे आगगाडीचे रूळ ओलांडून एका खाणावळींत गेलों. तेथें जेवलों आणि मी जवळपास पडलेल्या शिंपा घेऊन खेळूं लागलों. इतक्यांत केशू धांवत धांवत आला. त्याचे ते विस्फारलेले डोळे आणि जीव घेऊन धांवत असावा अशी त्याची ती गति पाहून मला वाटलें एखादा बैल त्याच्या मागें लागला असावा.

तो ओरडून म्हणाला, ' दत्तू, दत्तू, लवकर ये ! लवकर ये ! पहा तिथें किती किती पाणी आहे. अरे चल. टाक त्या शिंपा तिकडेच. समुद्र आहे

समुद्र ! चल तुला दाखवितों." लहानपणीं एकाच्या उत्साहाचें वारें दुसऱ्याला लागायला कारण समजावें लागत नाहीं. मलाहि केशूसारखेंच अवसान चढलें आणि आम्ही दोघे धांवूं लागलों. गोंदूनें दुरून आम्हांला धांवतांना पाहिलें. त्यानेंहि धूम ठोकली ! आणि आम्ही तीन वेडेपीर एकसारखे धांवूं लागलों.

आणि समोर काय दृष्टीस पडलें ? जन्मांत कधीं न पाहिलें इतकें पाणी समोर दूरवर नाचत आहे. मी एकदम उद्गारलों, " अबबबबबऽ ! कितीतरी हें पाणी ! " मीं दोन्ही हात शक्य तितके पसरले—छातीला ताण पडेल इतके पसरले, केशू आणि गोंदू यांनींहि हात पसरले. वडिलांनीं आम्हांला तशा स्थितींत पाहिलें असतें तर त्यांनीं तसबिरीचें यंत्र आणून आमची तसबीर काढली असती. " कितीतरी हें पाणी ! इतकें पाणी आलें कोठून ? उन्हामध्यें कसें चकाकत आहे ! " डोळाभर पाहिलें तरी तृप्ति होईना. आतां या पाण्याचें करावें तरी काय ? अगदीं आकाश टेकलें आहे तिथपर्यंत पाणीच पाणी. आणि गप्पहि बसत नाहीं. आम्ही नाचूं लागलों आणि मोठमोठ्यानें ओरडूं लागलों, " समुद् द्र ! समुद् द्र ! ! समुद् द्र ! ! ! " आणि प्रत्येक वेळीं आम्ही समुद्रांतील 'मुद्' शक्य तितकें फुगवून म्हणत असूं. समुद्राची विशालता, लाटांचा खेळ आणि असलें दृश्य प्रथमच पाहिल्याचा आमचा आनंदातिरेक व्यक्त करण्याला आमच्याजवळ दुसरें साधनच नव्हतें. लाट उठून, फुगून फुटावी त्याप्रमाणें आम्ही 'समुद्र-समुद्र' म्हणत तालांत नाचूं लागलों. पण आम्ही स्वतः लाटा नसल्यामुळें शेवटीं थकलों आणि आसपास पाहूं लागलों. तेव्हां एका बाजूला खोलीखोली एवढ्या मोठ्या विटा रचलेल्या आम्हीं पाहिल्या. कांहीं तिरप्या ठेवलेल्या होत्या आणि कांहीं सपाट. त्या वेळीं मला उपमा सुचली, दुकानांतील साबणाच्या वड्यांची आणि आगकाड्यांच्या पेट्यांची. या विटा पसरून मुरगांवचा धक्का तयार केला होता. महादेवाच्या पोळानें धिंगाणा घालावा त्याप्रमाणें या लाटा येऊन येऊन धक्क्याशीं टक्कर देत होत्या.

आम्ही परतलों, आणि सर्वांना समुद्र कसा दिसतो त्याविषयीं सांगूं लागलों. समुद्रापुढें बिचारा दूधसागर मागेंच पडला.

सूर्य समुद्रांत मावळला. सर्वत्र अंधार पसरला. आम्ही जेवूनखाऊन धक्क्याला लागलेल्या आगबोटींत जाऊन बसलों. लोखंडी तारांचें जें

कटवंजन ( कठडा ) असतें त्याला लागून असलेल्या बाकावर गोंदू आणि मी दोघे जाऊन बसलों. आणि उंटासारखी मान असलेल्या याऱ्या मोठाली पोतीं दोरखंडांत बांधून कशीं उचलतात आणि ठेवून देतात हें पाहूं लागलों. आमच्यासमोरील यारीनें एका मोठ्या ढिगांतून पोतीं काढून काढून आमच्या आगबोटीचें पोट भरलें. यंत्रें घरघर करीत आणि जहाजांतील खलाशी 'आबेस, आबेस, आऱ्या, आऱ्या 'चा मंत्र बोलत. आबेस आबेस म्हणतांच सांखळी घट्ट होई. आणि आऱ्या आऱ्या म्हटलें कीं ती सैल होई.

आम्ही गंमत पहात होतों इतक्यांत आमच्या मागें जणूं काय अगदीं कानाला लागून 'भों ओं ऽऽऽ ' असा आवाज झाला. आम्ही दोघांनीं घाबरून बाकावरून टुण्दिशीं उडी मारली. आणि वेड्यासारखे चारी बाजूंस पाहूं लागलों. कानठळ्या अगदीं बसून गेल्या होत्या. एवढा मोठा आवाज इतक्या जवळचा सहन तरी कसा करावा ? कुठें आगगाडीचें दुरून ऐकूं येणारे 'ऊं ऽऽऽ ' आणि कुठें हें म्हशीप्रमाणें 'भों ओं ऽऽऽ ! ' शेवटीं आवाज थांबला. लाकडी पूल मागें खेंचला गेला. येण्याजाण्याच्या रस्त्यावरील तारेचें कटवंजन पुनः बसविण्यांत आलें आणि 'घसघस' करीत आमच्या आगबोटीनें किनारा सोडला. बघतां बघतां अंतर वाढलें. कुणीं हातरुमाल दाखवून तर कोणीं नुसते हात हलवून एकमेकांना निरोप दिला. अशा वेळीं कांहीं लोकांचें कांहींतरी विसरलेलें असतेंच. मग ते ओरडून एकमेकांना सांगतात आणि समोरचा मनुष्य न समजलें तरी आश्वासनासाठीं 'हो हो' म्हणत असतो.

ही सर्व मजा पाहिल्यानंतर आम्ही मागें वळलों. आगबोटींत सर्वत्र विजेचे दिवे होते. आगगाडींतील दिवे निराळे. तेथें खोबरेल आणि रॉकेल मिसळलेले दिवे लटकत्या हंडींत ठेवलेले असावयाचे. येथें भिंतींतून लहान लहान कांचेच्या गोळ्यांत विजेच्या तारा लाल तापून मंद प्रकाश देत असत.

आजचा दिवस म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या नवीन नवीन उत्कट अनुभवांची मसालेदार खिचडी. डोळे, कान, मन अनुभव घेऊन थकून गेले होते. त्यामुळें झोंप केव्हां आणि कशी आली हें मुळींच कळलें नाहीं; फक्त आगबोटीचा पाळणा गोडपणें हलत होता एवढीच गोष्ट झोंपेंतून स्वप्नांत शिरली होती.

जून १९४९.

* * *

## गोकर्णाची यात्रा

३

गोकर्ण महाबळेश्वर हें स्थान कारवार आणि अंकोला या दोन बंदरांच्या-मध्यें तदडी बंदराच्या उत्तरेला सहाएक मैलांवर समुद्रकांठीं आहे. दक्षिणेकडे गोकर्ण महाबळेश्वराचें महत्त्व काशीविश्वेश्वराहून अधिक मानलें जातें. लिंग जमिनीच्या आंतच आहे. लिंगाच्या साळुंकींत मध्येंच एक भोंक ठेवलेलें आहे. त्यांत अंगठा घातला असतां आंतील लिंगाचा स्पर्श होतो. दर्शन होण्याची आशाच नको! पुजारी म्हणतात कीं लिंगाची शिळा इतकी कांहीं मऊ आहे कीं ती भक्तांच्या स्पर्शानें झिजून जाते. म्हणून जुन्या लोकांनीं तिच्याभोंवतीं वरपर्यंत जलाधारी बसवून केवळ अंगुष्ठ-स्पर्शाची सोय ठेवली आहे. पुष्कळ वर्षांनीं शुभशकुन झाला म्हणजे वरची साळुंकी काढतात, आसपासची बांधणी उखडून काढून मूळ लिंग हात दोन हात उघडें राहील, इतकें खुलें करतात. या उघड्या लिंगाचें दर्शन करण्या-साठीं यात्रा लोटते. अमुक महिने पुरे झाले म्हणजे नंतर मोती वाटून तयार केलेल्या चुन्यानें आसपासची चुनेगची पूर्वींप्रमाणें करून टाकतात. या सर्व प्रकाराला 'अष्टबंध' म्हणतात असें मला स्मरतें.

आम्ही कारवारला असतांना एकदां कपिलाषष्ठीप्रमाणें दुर्लभ अशा या अष्टबंधाचा योग आला. वडील, आई आणि मी तिघेंहि यात्रेला निघालों. गोकर्ण आगबोटीचें बंदर नाहीं. बोटी तदडीलाच जाऊन थांबतात. तदडी बंदरावरून गोकर्णाला मला नेण्यासाठीं एक गडी करण्यांत आला. मी त्याच्या काळ्या कुळकुळीत खांद्यावर बसून गोकर्णाला गेलों. तेथें आम्हीं कोटितीर्थांत आंघोळ केली. गोकर्ण महाबळेश्वराचें दर्शन केलें. स्मशानाचें रक्षण करणारा हरिश्चंद्र पाहिला. त्याच्या खांद्यावर एक चाबूक कोरलेला होता. जवळच एक तीर्थ होतें. त्यांत म्हणे हाडें टाकलीं असतां हळूहळू

विरघळून जातात. परत येऊन आम्ही अहिल्याबाईच्या अन्नछत्रांत जाऊन त्या साध्वीच्या मूर्तीचें दर्शन केलें. कपाळावर खोक पडलेला आणि दोनच हात असलेला गणपति पाहिला. ब्रह्मदेवाची एक मूर्ति पाहिली आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे रावणाच्या त्या प्रख्यात लघुशंकेचें कुंड पाहिलें. आजदेखील तें भरलेलें असतें आणि डोकें भणाणून जावें इतकी त्याची दुर्गंधी आहे. इतरहि पुष्कळ पाहिलें असेल पण आतां तें कोठून आठवणार ?

हो, बरें आठवलें ! या प्रदेशांतील एक विशेष गोष्ट सांगण्याची राहूनच जात होती. घर गरिबाचें असो कीं श्रीमंताचें; जमीन काळी कुळकुळीत लिंपलेली असावयाची. जणूं काय काळ्या संगमरवरी दगडाचीच बनवली आहे. इतकी कांहीं गुळगुळीत आणि चकचकीत कीं मी जमिनींत पाहूनच गंध लावीत असें. उन्हाळ्याच्या दिवसांत जमिनीवर कांहींहि अंथरल्या-वांचून सुखानें निजावें. वेळोवेळीं शेणांत काजळ मिसळून ही जमीन सार-वली जाते. पण हें सारवणें हातानें होत नसतें. सुपारीच्या झावळ्याच्या मुळाशीं पुठ्ठ्याप्रमाणें एक भाग असतो; त्याचा एक तुकडा घेऊन त्याच्या उभ्या कांठानें घासून घासून जमिनीला ओप काढलेली असते. कोंकणी भाषेंत ह्या पुठ्ठ्याला पोवळी असें म्हणतात.

गोकर्णाहून परत येतांना तदडीपर्यंत पायीं न जातां गोकर्णाहून एका वाफरांत बसून तदडीच्या समुद्रांत उभी असलेली आगबोट गांठावी, असें आम्हीं ठरविलें होतें. वाफर किंवा वाफोर म्हणजे वाफेच्या यंत्रानें चालणारी एक मोठीशी होडी. इंग्रजींत हिला स्टीम लाँच म्हणतात. मोसमचें तुफान सुरू होण्याचे ते दिवस होते. आगबोटी लवकरच बंद होणार होत्या. यामुळें परत जाणाऱ्या यात्रेकरूंची गर्दी बेसुमार होती. तदडी बंदरावरून बसणाऱ्या लोकांना जागा मिळेल कीं नाहीं याची शंका होती. म्हणून आम्ही गोकर्णालाच वाफरामधें बसून आगबोट लवकर गांठण्याचा मनसुबा केला होता.

गोकर्णाच्या बंदराला धक्का बांधलेला नाहीं. कांठापासून पाणी कमरेइतकें येईपर्यंत चालत जावें लागे. ( लोकांच्या कमरेपर्यंत म्हणजे माझ्या छाती-पर्यंत. ) तेथें एका होडींत चढून वाफरापर्यंत जावयाचें. तरुण लोक

होडीपर्यंत चालत जात आणि बायकामुलांना गड्याच्या खांद्यावर बसवून किंवा दोन गड्यांच्या हाताची पालखी करून होडीपर्यंत नेत असत.

प्रारंभींच एक अपशकुन झाला. एक गरीब म्हातारी शरीरानें विशेष स्थूल होती. पण दोन गडी करण्याइतके तिच्याजवळ पैसे नव्हते. तिनें एका लोभी गड्याला थोडीशी अधिक मजुरी देण्याची लालूच दाखवून आपल्याला पाठकुळीवरून घेऊन जाण्यास कबूल करविलें. गडी कांहीं विशेष सशक्त नव्हता. तो समुद्रकांठीं बसला, ती विधवा म्हातारी त्याच्या पाठकुळीवर बसली. गडी उठावयास गेला तोंच त्याचा तोल जाऊन तो पुढें कलंडला. अर्थात् म्हातारीहि कोलांटी खाऊन पडली. इतक्यांत एका टवाळ लाटेनें धांवत येऊन दोघांना सचैल स्नान घातलें आणि पावन केलें !

आमची बोट जवळ जवळ शेवटची असल्यामुळें, गोकर्णाहून बसणारे यात्रेकरू देखील पुष्कळ होते. त्या सगळ्यांना वाफरांत जागा कोठून मिळणार ? म्हणून कंपनीनें शंभरएक माणसें बसूं शकतील एवढा एक मोठा पडाव वाफराच्या मागें बांधला होता. वाफर भरल्यानंतर उरलेले लोक या पडावांत बसले. या पडावाच्या मागें कस्टम खात्याची एक होडी बांधली होती. तिच्यामधें त्या खात्यांतील एक अंमलदार आणि इतर शिपाई नोकर बसलेले होते. मीं पाहिलें कीं खाजगी होड्या चालवायचीं वल्हीं एखाद्या झाऱ्यासारखीं वाटोळीं असतात आणि कस्टमच्या सरकारी होड्यांचीं वल्हीं क्रिकेटच्या बॅटीसारखीं लांबट आणि चपटीं असतात.

आमची 'वरात' वेळेवर निघाली. एक-दोन मैल आम्ही कापले असतील इतक्यांत आभाळ भरून आलें. वारा सोसाट्यानें वाहूं लागला आणि लाटा तर लांडग्यांना मेजवानी मिळावी त्याप्रमाणें नाचूं लागल्या. होड्या डोलूं लागल्या आणि वाफरावरील ताण वाढूं लागला.

अरे ! हें काय ? थेंब ! पावसाचे थेंब !! मोठे मोठे ! बोराएवढे थेंब ! आतां कसें होईल ? लाटां जोरजोरानें उसळूं लागल्या. वाफर बेफाम झालेल्या घोड्याप्रमाणें थैमान घालूं लागलें ! मागच्या होडीचें दोरखंड कर्रर्रर्र कर्रर्रर्र आवाज करूं लागलें. इतक्यांत वाफर आणि होडी यांच्यामधें एक एवढी मोठी लाट आली कीं आम्हांला होडी दिसेनाशी झाली.

मी वाफरामधें वाफेच्या बंबा ( बॉयलर ) जवळील लाकडी फळ्यांच्या ओट्यावर बसलों होतों. आमच्या तांडेलाला वाफर शक्य तितक्या लवकर

आगबोटीपर्यंत पोहोंचवण्याची घाई होती. त्यानें आपला वाफर बेफामपणें भरवेगानें सोडला होता. मी ज्या फळीवर बसलों होतों ती तापून गरम झाली. मला चटके बसूं लागले. काय करावें हें सुचेना. सरकायला जावें तर 'समुद्रास्तृप्यन्तु' व्हावयाचें आणि बसून रहाणें तर जवळ जवळ अशक्य झालें होतें. या संकटांतून एका भयंकर रीतीनें माझी सुटका झाली. एक प्रचंड लाट वाफरावर तुटून पडली आणि तिनें मला नखशिखान्त स्नान घातलें. आतां लांकडी ओटा कसचा गरम लागतो!

लाट पाहून वडील घाबरले. आईला कुलदेव आठवला. 'मंगेशा, महारुद्रा, मायबापा, तूंच आतां आम्हांला तार!' पाऊस मुसळधार पडूं लागला. वाफरांत बसणारे आम्ही कांहीं तरी सुरक्षित होतों पण आमच्यामागील होडींत बसलेल्यांचें काय? प्रथम प्रथम आमच्यापेक्षां त्यांची स्थिति बरी होती. वाफर यंत्रानें पाणी कापीत जात असल्यानें थोडें थोडें पाणी आमच्या बाजूनें उडत असे. होडीला आलेल्या लाटेवर स्वार होतां येत असे. त्यामुळें होडी कितीहि पुढेंमागें डोलली तरी पाणी आंत येत नसे. पण आतां जेव्हां वारा आणि पाऊस यांच्यांत शर्यत लागली आणि दोघांचें अट्टहास्य सुरू झालें, तेव्हां एक लाट आली कीं जवळ जवळ अर्धी होडी भरून जाई. लाटा समोरून येत तोंपर्यंत कांहींसें ठीक होतें. होडी लाटेवर चढून अलग पलीकडे जाई. क्षणांत लाटेच्या शिखरावर, तर क्षणांत दोन लाटांमधील गर्तेंत. केव्हां केव्हां होडी एका लाटेच्या शिखरावरून पलीकडे उतरूं लागते न लागते इतक्यांत दुसऱ्या एका नव्या लाटेनें फुगून येऊन होडीला वरच्यावर उचलून धरावें! असें कांहींतरी अकल्पित झालें म्हणजे होडींत उभे असलेले लोक धडाधड एक दुसऱ्याच्या अंगावर पडत.

पण आतां लाटा बाजूनें आपटूं लागल्या. होडींत असलेल्या बायका-मुलांना रडण्याचा एकच उपाय माहीत होता. जेवढे म्हणून जवानमर्द होते ते सगळे डोल, घागर, डबा, जें कांहीं हातीं येईल तें घेऊन होडींतील पाणी भरभरून उपसून काढीत होते. आगीचा (फायर ब्रिगेडचा) पंप याहून कितीशा वेगानें काम करीत असेल? होडी कुठें जवळ जवळ रिकामी व्हावी इतक्यांत एखादी क्रूर लाट विकट हास्य करून धाडादिशीं होडीच्या बरगडींत आपटून होडींत शिरत असे. त्या वेळच्या आरोळ्यांनीं आणि किंकाळ्यांनीं कानठळ्या बसून जात. काळीज जणूं फाटून जाई. एखाद्या

यात्रेकरूनें अवधूत दत्तात्रेयाचा धांवा करावा; एखाद्यानें पंढरपूरच्या विठोबाला आळवावें; कुणी अंबाभवानीला नवस करावा तर कुणी विघ्नहर्त्या गणेशाची स्तुति करावी; असें एकसारखें चालू होतें. प्रथम प्रथम वाफराचा तांडेल ( कप्तान ) आणि त्यांतील खलाशी आम्हां सर्वांना धीर देण्यासाठीं म्हणत, "अहो, तुम्ही कशाला घाबरतां ? जबाबदारी आमची आहे ना ! आम्हीं असलीं कितीतरी तुफानें पाहिलीं आहेत ! याला कोण भीक घालतो ?" पण बघतां बघतां मामला इतका कांहीं गंभीर झाला कीं कप्तानाचें तोंड देखील उतरलें. तो आतां म्हणूं लागला, "बाबांनो, रडून काय होतें ? मनुष्याला केव्हांतरी मरावयाचें आहेच. मग तें अंथरुणावर येवो किंवा घोड्यावर, शिकारींत येवो किंवा समुद्रांत. तुम्ही पहातांच आहां कीं आमच्यानें होईल तें आम्ही करीत आहोंत. पण इन्सानच्या हातांत काय आहे ? मालिक करेल तें खरें !" मी तर टक लावून त्याच्या चेहऱ्याकडे पहात होतों. सफरीच्या सुरुवातीला जो मनुष्य गाजरासारखा लालबुंद होता, तो आतां अळवाच्या पानासारखा हिरवा निळा होऊन गेला होता.

त्या वेळीं माझें तर पोरवय होतें; पण गंभीर प्रसंग ओढवला असतां लहान मुलांनाहि मोठ्यांसारखें समजूं लागतें. क्षणोक्षणीं मी बसल्या जागेवरून सरकून जाई. ओस्याची कड दोन्ही हातांनीं गच्च धरून मी कसेंबसें आपलें बस्तान सांभाळीत होतों. आमचें सगळें सामान एका बाजूला पडलें होतें, पण त्याच्याकडे ढुंकून तरी बघतो कोण ? तरी पण पूजेचे देव आणि पूजेचा नारळ एका वेताच्या सांबळींत ठेवलें होतें. ती सांबळी मात्र मी माझ्या मांडीवर घेऊन बसावयास विसरलों नाहीं.

माझ्या मनांत त्या वेळीं कसले कसले विचार येत होते ? तो काळ माझ्या मुग्ध भक्तीचा होता. रोज सकाळीं उठून दोन दोन तास माझें भजन चालत असे. माझी मुंजच झाली नव्हती. तेव्हां संध्यापूजा हातून कशी घडावयाची ? तरीपण वडील पूजेला बसले म्हणजे देव्हाऱ्यांतून देव काढणें, अभिषेकासाठीं त्यांना ताम्हनांत ठेवणें, अभिषेक आटोपल्यानंतर त्यांना पुसून पुन्हां वर ठेवणें, वगैरे प्रकारची तांत्रिक मदत वडिलांना करण्यांत मला खूप धन्यता वाटे. आजचें तें काळमुखी तुफान पाहून मनांत विचार आला कीं, आज जर पाण्यांत बुडून मरणेंच नशिबांत असेल तर देवांची सांबळी छातीशीं घट्ट धरूनच मी जलसमाधि घेईन. दुसऱ्याच क्षणीं

ग्रं. क्र. ..........

विचार आला कीं, जर आईच्या देखत वाफरांतुन पाण्यांत उलटून पडलों तर आईची काय स्थिति होईल ? हा विचारच इतका कांहीं असह्य झाला कीं, श्वास गुदमरून गेला. छातींत दगड बसल्याप्रमाणें दुखूं लागलें. मीं ईश्वराची प्रार्थना केली कीं, ' देवा ! आम्हांला जर बुडवायचेंच असेल तर आईला आणि मला एकमेकांना मिठी मारली आहे अशा स्थितींतच बुडव. '

प्रत्येक बालकाला वाटतें कीं, आपले वडील म्हणजे धैर्याचे मेरु ! आकाश कोसळून पडेल पण माझ्या वडिलांची हिंमत खचणार नाहीं अशी प्रत्येक बालकाला खात्री असते. त्यामुळें अशा प्रसंगीं, जेव्हां वडील पण घाबरून गेले आहेत, दिङ्मूढ झाले आहेत, गोंधळले आहेत, असें मुलाच्या दृष्टीस पडतें, तेव्हां त्या मुलाला कसेंसेंच होऊन जातें. त्या दिवशीं मला त्या तुफानाची इतकी भीति वाटली नव्हती, मुसळधार पावसालाहि मी तसा घाबरलों नव्हतों. तुला खातों, तुला खातों, म्हणून तोंड पसरून तांडवनृत्य करणाऱ्या भुतांसारख्या प्रचंड लाटा पाहून देखील माझी गाळण उडाली नव्हती. पण जेव्हां वडिलांना घाबरलेले आणि गोंधळलेले मीं पाहिले आणि त्यांचा कंठ गद्गदित झालेला पाहिला, तेव्हां मात्र माझा धीर खचला.

जो तो तांडेलाला विचारी, " आपण कुठवर आलों ? अजून किती बाकी आहे ? ", चारी बाजूंस जेथें नजर फेंकावी तेथें फक्त पाऊस, झंझावात आणि लाटांचें तांडव ! इतका पाऊस पडला तरी आकाश कांहीं केल्या उघडेना. मीं तांडेलाला विनवलें, " वाफर जरा किनाऱ्याच्या जवळून चालवा ना ! जर आपला वाफर बुडालाच तर निदान कांहीं लोक तरी पोहत कांठाला जातील. " तांडेल उत्साहशून्य आणि विषादयुक्त हास्य करून म्हणाला, " कैसा बेवकूफ लडका ! किनाऱ्याहून जितके दूर आहोंत तितकेच आपण आज सुरक्षित आहोंत. असल्या वादळांत कांठाच्या जरा जवळ गेलों कीं खडकावर आपटून चक्काचूर व्हावयाचा. आज तर आम्ही मुद्दामच किनाऱ्याहून विशेष दूर राहिलों आहोंत. एकदां बोट गांठली म्हणजे मिळवली. आज दुसरा उपाय नाहीं. "

मी कधींकाळीं मोठ्या माणसांना एकमेकांस मिठी मारून रडतांना पाहिलें नव्हतें. तें दृश्य आज आमच्या मागच्या मोठ्या होडींत मीं पाहिलें. तेथें स्त्री-पुरुष एकमेकांना मिठ्या मारून आकान्त करीत होते. दोन तीन मुलांची एक आई सगळ्या मुलांना एकदम मिठींत घेण्याचा प्रयत्न करीत

होती. बस्स; फक्त पांच पंचवीस जवानमर्द तनतोड मेहनत करून समुद्राशीं असमान युद्ध लढत होते. वादळ इतकें कांहीं वाढलें आणि वाफर व होडी अशी कांहीं डोलूं लागली कीं लोक गर्भगळीत होऊन रडण्याचेंहि विसरले. एकच कृष्णछाया सर्वत्र पसरली. भान जाग्यावर होतें फक्त त्या होडींतील बहादुरांचें आणि काळे-निळे विजार-सदरे घातलेल्या आमच्या वाफरांतील खलाश्यांचें. आमचा तांडेल केव्हां केव्हां हुकूम सोडतांना गोंधळलेला दिसे; पण खलाशी मात्र बरोबर एकाग्र होऊन न चुकतां, न गोंधळतां आपापलें काम करीत होते.

कर्मयोग याहून कांहीं निराळी चीज असेल ?

शेवटीं एकदांचें तदडी बंदर आलें. आम्हांला ती प्राणरक्षक आगबोट दिसली; त्यापूर्वींच आगबोटीची आमच्या वाफरावर नजर पडली. आगबोटीनें भोंगा वाजविला, " भों SSS ! " जणूं काय सर्वांची करुण वाणी ऐकून ईश्वरानेंच " मा भैः "ची आकाशवाणी केली ! आमच्या वाफरानें आपल्या किनऱ्या आवाजानें भोंग्याला उत्तर दिलें. सर्वांच्या हृदयांत आशेचा अंकुर उगवला. सर्वत्र जयजयकार झाला !

इतक्यांत जणूं काय शेवटचा प्रयत्न करून पहावा म्हणून आणि आम्हां सर्वांच्या भाग्यासमोर स्वतःची हार कबूल करण्यापूर्वीं एक शेवटचा हल्ला चढवून पहावा म्हणून एका मोठ्या लाटेनें आमच्या वाफरावर आक्रमण केलें. माझे वडील जेथें बसले होते तेथेंच उताणे पडले. मीं किंकाळी फोडली. आतांपर्यंत मी रडलों नव्हतों, त्या सर्वांची जणूं भरपाईच त्या हृदयविदारक किंकाळीनें केली. वडील तावडतोब उठून बसले. त्यांनीं मला छातीशीं धरून म्हटलें, " दत्तू, भिऊं नकोस. मला कांहीं सुद्धां झालें नाहीं. "

आम्ही आगबोटीच्या जवळ जाऊन पोहोंचलों; पण आगबोटीला जाऊन चिकटण्याची हिंमत कशी करावयाची ? कस्टमची होडी त्या लोकांनीं केव्हांच सुटी केली होती. कारण वाफराचे आणि होडीचे हेलकावे तिला सहन होत नव्हते. आमच्या तांड्यांतून वेगळें पडण्यांतच तिची सलामती होती. आमच्या वाफरानें दुरून दुरून आगबोटीला एक प्रदक्षिणा केली; जवळ येण्याची कांहीं सोय दिसेना. लाटांच्या जोरानें जर वाफर आगबोटी-वर आपटलें तर अगदीं शेवटच्या घडीला सर्वांचा चेंदामेंदा व्हावयाचा. शेवटीं वरून सोल फेंकला गेला आणि वाफराचें आगबोटीशीं लग्न लागलें.

आमचे खलाशी वाफराच्या छतावर उभे राहून लांबलचक वेळूंच्या मदतीनें वाफराला आगबोटीच्या भिंतीवर आपटण्यापासून बचावीत होते. लाटेनें वाफर उचलून आगबोटीकडे फेंकावा आणि खलाश्यांनीं आपल्या वेळूंच्या टोकांची ढाल बनवून तो सारा मारा आपल्या हातापायांवर जिरवून टाकावा. तरीपण, शेवटीं आगबोटीच्या शिडीवर वाफराचें छत आपटलें आणि 'कडाड्‌ड्' असा आवाज होऊन छताची एक भली मोठी फळी मोडून समुद्रांत पडली.

मीच अगदीं जवळ असल्यामुळें स्टीमरमधें चढण्याची पहिली संधि मला मिळाली. चढण्याची कसली ? चेंडूप्रमाणें फेंकलें जाण्याची. तांडेल स्वतः दुसऱ्या एका खलाश्याला घेऊन वाफराच्या कांठीं उभा होता. ते दोघे मुसाफिरीचा एक एक बावळा पकडून आगबोटीच्या शिडीच्या अगदीं खालच्या पायऱ्यांवर उभे असलेल्या खलाश्यांच्या हातीं त्याला फेंकून देत. यांत ते एवढी काळजी घेत कीं जेव्हां वाफर लाटांच्या गर्तेत खालीं उतरे, तेव्हां मुसाफिरांना पकडून धरून ते वाट पहात. दुसऱ्या क्षणीं वाफर लाटेच्या शिखरावर चढला आणि आगबोटीची शिडी जवळ आली कीं झट त्या मनुष्याला शिडीवर फेंकून देत आणि तिकडचे खलाशी त्याला अर्धवट झेलून घेत. जर का वाफराच्या खलाश्यांनीं आणि आगबोटीच्या खलाश्यांनीं एक एक हात पकडून ठेवला असता तर दुसऱ्या क्षणीं वाफर लाटांच्या गर्तेत उतरतांच मुसाफिराचे जरासंधाप्रमाणें दोन तुकडेच व्हावयाचे.

मी शिडीच्या दोन-चार पायऱ्या चढलों आणि आई येते किंवा नाहीं तें मागें वळून पाहूं लागलों. अनोळखी मुसलमान धटिंगणांनीं माझ्या आईचे दंड पकडलेले पाहून मला कसेंसेंच झालें. पण तो प्राण वांचविण्याचा वेळ होता. तेथें नाजूक भावना काय कामाच्या ? थोड्याच वेळांत वडीलहि येऊन पोहोंचले. देवांची सांबळी तर मीं माझ्या खांद्यावर लटकावलीच होती. वर जाऊन चांगली जागा शोधून आम्हांला तेथें बसवून, वडील परत सामान आणण्यासाठीं गेले. मी श्रद्धाळू मुलगा खरा. पण त्या वेळीं मला वडिलांचा मनस्वी राग आला. जळो तें सगळें सामान ! जीव जोखमींत घालून परत कां बरें हे जातात ? पण त्यांनीं तर तीन फेऱ्या केल्या. शेवटची फेरी करून आले तेव्हां ते म्हणाले, " गोकर्ण-महाबळेश्वराच्या प्रसादाचा नारळ

पाण्यांत पडला ! " आई आणि मी एकदमच उद्गारलों; आई म्हणाली, " अरेरे ! " आणि मी म्हणालों, " एवढेंच ना ? "

वाफरांतील उतारू चढल्यानंतर होडींतील उतारूंची पाळी आली. ते सर्व चढले. त्यानंतर वाफर आणि होडी निशाचर भुतासारखी किंचाळत तदडीच्या किनाऱ्याकडे गेली; आणि किनाऱ्यावर तपश्चर्या करीत बसलेल्या यात्रेकरूंना हप्त्याहप्त्यांनीं आणूं लागली. आतां तुफान थोडेंसें शांत झालें होतें. परंतु काळोखी रात्र आणि उफाळणाऱ्या लाटा यांत सांपडलेल्या लोकांचे जे हाल झाले त्यांचें वर्णन कोण करूं शकेल ?

आगबोट यात्रेकरूंनीं चिकार भरून गेली. जो कोणी बोले तो आपलें सामान समुद्रांत बुडून गेल्याच्याच गोष्टी करी. अंतीं यात्रेकरू सर्व आले. परमेश्वराची कृपा कीं कोणाच्या जीवाची हानि झाली नाहीं. आगबोट निघाली; आणि लोक आपापल्या जुन्या सफरींतील असल्याच संकटांचीं संस्मरणें एकमेकांना सांगून सांगून आजचा दुःखभार हलका करूं लागले. रात्रीं बराच वेळपर्यंत कुणाला झोंप आली नाहीं. मी केव्हां झोपीं गेलों, कारवार बंदर केव्हां आलें, आणि आम्ही घरीं कधीं पोंहोंचलों, यांतील कांहींच आज आठवत नाहीं. पण त्या दिवसाचा तो तुफानाचा प्रसंग जणूं काय कालच घडला असावा इतका स्मरणपटावर ताजा, स्पष्ट आहे.

खरोखरच,

दुःखं सत्यं, सुखं मिथ्या
दुःखं जन्तोः परं धनम् !

आक्टोबर, १९२५

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५६२९ वि: ... प्रवास
८४३ ... २०/३/६

# छप्पन वर्षांची भूक

४

सर्वांत प्रथम मी कारवारला गेलों, तें १८९३-९४ साल असावें. मार्मगोवा बंदरावर पहिल्या प्रथमच चकाकणारा समुद्र पाहून मी आश्चर्यमुग्ध होऊन गेलों होतों. रात्रीं नऊ वाजतां आम्ही आगबोटीमध्यें बसलों. आगबोट किनारा सोडून समुद्रांत चालूं लागली तेव्हां माझें डोकें देखील आपले नेहमींचे किनारे सोडून कल्पनेवर तरंगूं लागलें. आम्ही कारवारला पोहोंचलों तेव्हां सकाळ झाली होती. आगबोटींतून होडींत उतरणें सोपें काम नव्हतें. प्रत्येक होडीबरोबर उलंड्या ( Outriggers ) बांधलेल्या होत्या. अशी गैरसोय जाणूनबुजून कां करून ठेवली आहे असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. मागाहून त्या उलंड्यांचा उपयोग ध्यानांत आला.

प्रवासाचा थकवा उतरतांच आम्ही समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेलों. किनाऱ्यावरून समुद्रांत तीन डोंगर दृष्टीस पडत होते. एक देवगडचा, दुसरा मधलिंगगडचा आणि तिसरा कूर्मगडचा. देवगडावर दिवादांडी होती हें त्याचें वैशिष्ट्य. त्या दिवादांडीच्या शेजारीं एक बारीकशी ध्वजादांडी अंधुक दिसत होती. समुद्रकिनाऱ्यावर खेळून थकलों, कीं दिवादांडीवर दिवा लागलेला सर्वांत आधीं कोण पहातो याची स्पर्धा सुरू होई. याच विशाल पाण्याच्या विस्तारावरून जेव्हां आम्ही कारवारला आलों त्या वेळीं रात्रीं आगबोटींतून देवगड कसें दिसलें नाहीं असा विचारहि कधीं कधीं मनांत येई.

एखादी आगबोट येणार असली कीं, देवगडच्या ध्वजादांडीवर लाल बावटा चढे. तो पाहून कारवार बंदराजवळील ध्वजादांडीवरहि बावटा चढे. येथला मनुष्य दुर्बिण घेऊन देवगडाकडे पहात राही. तेथें बावटा दिसला कीं येथें सुद्धां चढवी. कधीं कधीं साध्या डोळ्यांनीं दूर देवगडवर चढलेला बावटा पाहून मी गोंदूला चकित करून सोडीत असें.

मीं एकदां वडिलांना विचारलें, " देवगडावर दिवा कोण पेटवतो, बावटा कोण चढवतो ? " ते म्हणाले, " तेथें एक खास मनुष्य ठेवलेला आहे. संध्याकाळ झाली कीं तो दिवा पेटवतो. दुरून आगबोट येतांना दिसली कीं तो बावटा चढवतो. रात्रीं देवगडचा दिवा दिसला कीं जहाजें ताडतात कीं कारवार बंदर आलें. दिव्याखालीं खडक आहेत हें ठाऊक असल्यामुळें जहाजें दिव्याच्या आसपास फिरकत नाहींत. "

" दिवादांडीची देखरेख करणारा मनुष्य तेथें खाण्यापिण्याची काय व्यवस्था करीत असेल ? त्याला गोडें पाणी कोठून मिळत असेल ? " मीं प्रश्न केला.

" होडींत बसून तो खाण्यापिण्याच्या वस्तु कारवारहून घेऊन जातो. पावसाचें पाणी सांठवून ठेवण्यासाठीं एखादा टाकी किंवा विहीरसुद्धां देवगडावर असणें शक्य आहे. "

" आपल्याला नाहीं का तेथें जातां येणार ? चला ना, आपण एकदां तेथें जाऊन येऊं. मला नेहमींच तेथें रहायला मिळालें तर किती मौज होईल ? संध्याकाळ पडली कीं दिवा लावायचा, आणि आगबोटीचा भोंगा वाजला कीं बावटा चढवायचा, इतकेंच काम ना ? बाकीचा सगळा वेळ आपला स्वतःचा ! वाटेल तसा घालवावा. कुणी भेटायला येणारें नाहीं जाणारें नाहीं ! चला ना, आपण एकदां तेथें जाऊन येऊं. "

वडिलांनीं आमच्या घराच्या मालकांना, रामजी शेठ तेलींना विचारलें. त्यांनीं आपल्या फतेमारीच्या तांडेलाशीं मसलत केली. आणि दुसऱ्याच दिवशीं देवगडला जाण्याचें नक्की झालें. आम्ही सर्व गाडींत बसून बंदराच्या धक्क्यावर गेलों. मोठ्या फतेमारींत बसण्याची खूप मौज वाटली. शिडें उभारलीं गेलीं आणि आम्ही डुलत डुलत पुढें चाललों. फतेमारी डुलत होती मजेदार, पण झपाट्यानें पुढें जाण्याचें नांव घेईना. बराच वेळ झाला. वडिलांनीं रामजी शेठना कारण विचारलें. रामजी शेठनीं तांडेलाला विचारलें. त्यानें सांगितलें, " वारा अनुकूल नाहीं. तिरपा आहे. शिडें खुबीनें उभारलीं आहेत म्हणून मचवा पुढें जात आहे खरा, पण इतका हळू कीं देवगडला पोहोंचेपर्यंत संध्याकाळ होईल. " माझी स्वतःची याला मुळींच हरकत नव्हती. डोलण्याचा आनंद सारा दिवस अनुभवायला मिळेल आणि संध्याकाळ झाली कीं दिवादांडीचा दिवा जवळून पहायला मिळेल. पण इतकी मजेची गोष्ट वडिलांच्या ध्यानांत आली नाहीं ! ते म्हणाले, " हें

नाहीं चालणार. " तांडेल म्हणाला, " वाराच जेथें प्रतिकूल, तेथें आमचें काय चालणार ? पुढें गेल्यावर याच वाऱ्यानें जोर पकडला तर इतकें देखील अंतर कापणें अशक्य होईल !" रामजी शेठनीं वडिलांना विचारलें, " तर मग काय करायचें ? " वडिलांनीं उत्तर दिलें, " दुसरा उपायच काय आहे ? परतूं या झालं. "

हुकूम सुटला, " परत चला. " शिडांची रचना बदललीं. ही रचना कशी काय करतात तें पहाण्यांत मी गढून गेलों होतों. इतक्यांत फतेमारी परत धक्क्यापर्यंत येऊन देखील पोहोंचली ! जातांना तासभर तरी लागला असेल. परततांना पांच मिनिटें देखील लागलीं नाहींत. टांग्याचे घोडेच केवळ घरीं परततांना घाई करतात असें नाहीं !

आम्ही जसे गेलों तसेच हात हलवीत परत आलों. फजित झाल्याप्रमाणें हिरमुसलें तोंड घेऊन मीं घरीं आलों. आम्ही देवगडला जायला निघालों होतों, याचा उल्लेख देखील मीं शाळेंतल्या सोबत्यांजवळ केला नाहीं.

त्यानंतर जवळ जवळ पांचेक वर्षें मी कारवारला राहिलों असेन. पण पुन्हां कधींहि आम्ही देवगडला जाण्याचा प्रयत्नच केला नाहीं. सूर्यास्त होई, देवगडावरील दिवा दिसे आणि ' त्या पऱ्यांच्या देशांत काय असेल ?' हा प्रश्न मनांत आणून मी काढून टाकीत असें. चाळीस वर्षांनंतर, म्हणजेच आजपासून दहा वर्षांपूर्वीं पुन्हा एकदां कारवारला गेलों होतों. त्या वेळीं सुद्धां देवगडला जातां आलें नाहीं.

या वेळीं पुन्हां एकदां कारवारला गेलों तो निश्चय करून कीं शक्य झालें तर देवगड पाहिल्यावांचून रहावयाचें नाहीं. तिथल्या माझ्या मित्रांना मीं सांगूनच ठेवलें होतें कीं, एक दिवस देवगडसाठीं अवश्य राखून ठेवावा.

देवगडला कांहीं विशेष पहाण्यासारखें आहे असें नाहीं; परंतु पन्नास वर्षांचा माझा बालपणींचा संकल्प देवगडशीं निगडित होता. त्याला मोकळें करणें आवश्यक होतें.

देवगड कारवारच्या किनाऱ्यापासून जवळ जवळ तीन मैल समुद्रामध्यें असलेलें एक बेट आहे. कारवार बंदराची ती मोठ्यांतली मोठी शोभा म्हणतां येईल. समुद्रसपाटीपासून डोंगराची उंची २१० फूट आहे. आणि त्यावर ७२ फूट उंच दिवादांडी आहे.

दारूबंदीमुळें कस्टमच्या लोकांना समुद्रावर चौकी करावी लागते. या कामासाठीं त्यांच्यापाशीं एक वाफर असतें. या 'बाष्पनौकें'तून आम्हांला घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. आमचा हा लहरी कार्यक्रम कर्तव्यरूप अशा दुसऱ्या कार्यक्रमांच्या आड येऊं नये म्हणून आम्ही लवकर उठून बंदरावर जाऊन पोहोंचलों. सकाळची प्रार्थना किंवा नाश्ता घरीं करून घेण्याइतके कांही आम्ही अरसिक नव्हतोंच. खलाशी थोडेसे उशिरा येऊन पोहोंचल्यामुळें, घोड्याप्रमाणें धांवणाऱ्या आमच्या वाफराच्या तालावर चालणारी आमची प्रार्थना ऐकण्यासाठीं, कारवारच्या डोंगरामागून सविता नारायण सुद्धां उपस्थित होऊं शकले. नारायणाला जन्म देऊन कृतार्थ झालेली प्राची अशी कांहीं खुलली होती! समुद्राचें पाणी देखील प्रसन्नतेमुळें चकाकणाऱ्या लहरींत आलें होतें. मीं जमिनीकडे नजर फेकली. उजव्या बाजूला कारवारचें बंदर लहानमोठ्या मचव्यांना जागवीत होतें आणि खेळवीत होतें. त्यानंतरच्या खिंडींत नारळीचीं झाडें वाऱ्याची प्रतीक्षा करीत उभीं होतीं. आजकाल कधींहि डागली न जाणारी शनिवारची तोफ बावस्याच्या चौथऱ्यावरून तोंड वासून फुकटची भीति दाखवीत होती. त्यानंतरचीं सुरूचीं झाडें कारवारची रुंदी मोजीत थेट काळी नदीपर्यंत पसरलीं होतीं. भारतीय युद्धांतील राजांनीं विश्वरूपाच्या जबड्यांत धांव घ्यावी त्याप्रमाणें तीन-चार जहाजें काळी नदीच्या मुखांत घुसत होतीं आणि सदाशिवगडचा डोंगर किंचित् भू-संकोच करून या साऱ्या प्रदेशावर पहारा करीत होता.

आमची प्रार्थना संपली तेव्हां वाफरानें समुद्राच्या पाठीवर उमटवलेला आमचा मार्ग आणि त्यावरून झपाट्यानें अदृश्य होणारें नक्षीकाम यांनीं माझें लक्ष वेधलें. त्या नक्षीकामांत मुक्तवेणीची प्रत्येक खुबी व्यक्त होत होती.

आम्हांला देवगड दाखविल्याशिवाय रहाणारच नाहीं, असा निश्चय करून, प्रत्येक गोष्टीकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवणाऱ्या श्री. पद्मनाभ कामतांनीं दक्षिणेकडील डोंगराच्या पायथ्याशीं पसरलेल्या चंद्रभागी किनाऱ्याकडे माझें लक्ष वेधलें. एकेकाळीं युरोपियन स्त्रिया तेथें स्नान करीत असाव्यात. त्यामुळें त्याचें नांव ' लेडीज बीच ' म्हणजे युवती-तट असें पडलें आहे.

गोव्याच्या संस्कृतींत मुरलेले कवि बोरकर आमच्यासोबत होते आणि श्री. कामतांनीं आपल्याकडून भर टाकण्याच्या दृष्टीनें चित्रकार रमानंदाला

बरोबर घेतलें होतें. रमानंदानें आपल्या पित्याच्या, त्याचप्रमाणें बऱ्या पाहुण्यांच्या सान्निध्यांत साजेल अशी नम्रता धारण करून चांगलेंच आत्मविलोपन केलें होतें. पण भर समुद्रांत आल्यावर डोंगर, ढग, सूर्य, पक्षी, जहाजांचीं शिडें आणि समुद्राच्या लाटा या सर्वांच्या प्रभावाखालीं येतांच त्याच्या कलाकार आत्म्याला आमच्या अस्तित्वाचा विसर पडला आणि तो कित्येक दिवस उपाशी असलेल्या एखाद्या आधाशाप्रमाणें आसपासच्या काव्याचा एकाग्र दृष्टीनें आस्वाद घेऊं लागला. आम्ही बोट दाखवून त्याच्याकडे एकमेकांचें लक्ष वेधलें, पण त्यामुळें कांहीं त्याचें ध्यान भंग पावलें नाहीं. फक्त छोट्या कुंदेची नजर चंचलपणें सर्वत्र भिरभिरत होती.

आमचे कवि तर आमची प्रार्थना केव्हां संपते याची शास्त्रोक्त भक्तीनें वाट पहात होते. त्यांनीं लगेच सागराच्या लाटांचें खलाशीगीत ललकारलें. गीताची ढब जरी खलाशी पद्धतीची होती, तरी आंतले भाव खलाशी हृदयाचे नव्हते. त्या गीतांतून भोळा खलाशी बोलत नव्हता, तर मस्तींत आलेलें कविहृदय भावनांचे सर एकामागून एक उधळीत होतें. इतकें मात्र खरें कीं, त्या दिवशीं आमच्या टोळींत स्वस्थ ( सोबर ) असें कुणीहि नव्हतें. हिन्दू स्कूलचे आचार्य श्री. कुलकर्णी सुद्धां रंगांत आले. चि. सरोजनें आपली जागा सोडून बॉयलरच्या पुढल्या बाजूस उभें रहाणें पसंत केलें होतें. आपल्या स्वभावाविरुद्ध तिनें स्वीकारलेलें अग्रगामित्व पाहून मला मौज वाटली. मी तिला मंचर सरोवरांत काव्यपानानें मस्त झालेल्या नारायण मलकानींचें स्मरण करून दिलें. तेवढ्या इशाऱ्यानें आम्ही दोघें साऱ्या वस्तुस्थितीचें मोजमाप करूं शकलों !

समुद्राच्या पाण्यांतून तरून जाण्याच्या वेगवेगळ्या प्रकारांत वेगवेगळा रस असतो. लाटांच्या थपडा खात खात बाहुबलानें पोहत, आंत दूरवर जाण्यांत एक प्रकारचा आनंद आहे. छातीखालीं लाट उचंबळत असतांना तिच्यावर स्वार होण्याचा आनंद ज्यानें चाखला आहे त्याला त्याचा कधींकाळीं विसर पडणार नाहीं. नदीचें पाणी तुम्हांला बुडवायला टपलेलें असतें; तसें समुद्राच्या पाण्याचें नसतें. समुद्राच्या पाण्यानें बळी घेतला तर तो नाइलाज म्हणून. एरवीं त्याची दानत नेहमीं पोहणाऱ्यांना तारण्याचीच असते.

अरुंद व लांब होडींत बसून एकाच वल्ह्यानें प्रत्येक लाटेवरून चढउतार करणें हा पुन्हां आनंदाचा दुसरा प्रकार. दोन लाटांच्या मधल्या खिंडींत

होडी आडवी सांपडली तर संकट खरें. या एका बाबतींत काळजी घेतली तर समुद्राच्या आनंदाशीं एकरूप होण्याचें यापेक्षां उत्तम साधन मिळणें कठीण!

त्यानंतर मोठ्या होडींत जोडीजोडीनें बसून दोन्ही बाजूंचीं वल्हीं तालांत मारण्याचा सांघिक आनंद पुन्हां तिसऱ्या प्रकारचा. या प्रौढ आनंदाचा आस्वाद मौन राखून घेतांच येत नाहीं. तालाचा कैफ इतका मादक असतो कीं त्यांतून गायन अचूक स्फुरतेंच.

वाफरांत बसण्याचा आनंद या तिन्हींपेक्षां थोडा कमी दर्जाचा म्हणावा लागेल. तें एवढ्याचसाठीं कीं त्यांत माणसांचें बाहुबल मुळींच वापरलें जात नाहीं. नियंत्रण-चक्र हातांत पकडणाऱ्याच्याच मनगटांना जो व्यायाम होईल तेवढाच. एवढ्याच पुरुषार्थाला वाफरांत वाव मिळतो. पण वाफरानें पाणी कापीत जाण्याचा आनंद मात्र साऱ्या शरीराला मिळतो. वाफर जेव्हां वेगांत सरळ धावूं लागतें तेव्हां त्याची ती गति आपल्या नसानसांत जाऊन पोंहों-चते. मोटर चालविण्याच्या आनंदापेक्षां वाफर चालविण्याचा आनंद कितीतरी पटींनीं अधिक आहे.

त्या आनंदाची गोडी चाखत चाखत आणि समुद्राचें पाणी येथें किती खोल असेल याचा विचार करीत आम्ही देवगडच्या दिशेनें जात होतों. माझ्या मनांत विचार आला, 'जें पाणी अगदीं तळाशीं आहे, तें वरच्या पाण्याच्या भारानें चिरडून जात नसेल का? वरच्या पाण्यापेक्षां खालचें पाणी खरें तर अधिक दाट आणि जाड असलेंच पाहिजे. अमुक मासे तर या जाड पाण्याला भेदून खालीं उतरूंच शकत नसतील. पाऱ्याच्या सरोवरांत जर आपण पडलों तर लाकडाच्या तुकड्याप्रमाणें त्यावर तरंगतच राहूं. अमुक प्रकारच्या माशांचें खालच्या जाड पाण्यांत असेंच होत असेल.'

जसजसें देवगडचें बेट जवळ येत गेलें, तसतशीं त्याच्या आजूबाजूचीं लहान लहान बेटें व खडक स्पष्ट दिसूं लागले. आकाश आणि समुद्र जेथें मिळतात तेथली क्षितिजाची रेषा आज चांगलीच रेखीव होती. येथें पृथ्वी संपते व येथून स्वर्ग सुरू होतो, असें कुणीतरी सुई घेऊन नेमकें दाखवून देत असावें तसें वाटत होतें.

दोन फतेमाऱ्या आपल्या शिडांत वारा भरून घेऊन प्रवासाला निघाल्या होत्या. त्या शिडांच्या पोटांत वाऱ्याबरोबर उगवत्या सूर्याचीं किरणें देखील शिरलीं होतीं! त्या भारानें शिडें फाटून जातील कीं काय असें वाटत होतें.

शिडें अशीं कांहीं चमकत होतीं कीं तीं रेशमाचीं आहेत कीं हस्तिदंताचीं असा संभ्रम उत्पन्न होत होता. शिडांत जेव्हां वारा शिरतो तेव्हां, त्यांत उमटणारी केळीच्या पानाची नक्षी मोठी शोभिवंत दिसते.

आतां आम्ही देवगडच्या अगदीं समीप येऊन ठेपलों. सारी टेकडी लहानमोठ्या झाडाझुडपांनीं झांकलेली आहे. वरची दिवादांडी आपली इभ्रत सांभाळून आकाशाकडे बोट दाखवीत होती. आतां वाफर आणखी पुढें जाणें शक्य नव्हतें. बाकीचें थोडेंसें, उथळ अंतर कापण्यासाठीं आमच्या बाफरानें एक लहानसा किंकर सोबत बांधून आणला होता. त्या लहानशा होडींत आम्ही उतरलों आणि बेटाच्या किनाऱ्यावर जाऊन पोंचलों. उतरल्याबरोबर लाल लाल पिकलेल्या बोरांनीं आमचें स्वागत केलें. वर चढतां चढतां मोठमोठ्या वृक्षांच्या फांद्या आणि वडाच्या पारंब्या पहात पहात आम्ही दिवादांडीच्या पायथ्याशीं जाऊन पोहोंचलों. दिवादांडीचा दीपकार एक भला मुसलमान होता. त्यानें आमचें स्वागत केलें. बेटावर दिवादांडीमुळें थोडे लोक रहात होते. त्यांच्यामुळें थोड्या बकऱ्या व कोंबड्या देखील तेथें रहात होत्या. (आणि वेळोवेळीं मरत होत्या.) समुद्रकिनाऱ्यावरून उडत येऊन येथल्या झाडावर विसावा घेणारे व निसर्गकाव्याचे फवारे सोडणारे पक्षी तर ऋषिमुनींइतकेच पवित्र मानले पाहिजेत.

वाफरामधें बसून आम्हीं सकाळीं आत्म्याची उपासना केली होती. तेथें एका खडकावर बसून सर्वांनीं पोटाची उपासना केली. आसपासची शोभा पोटभर पाहून घेऊन दिवादांडीच्या पोटांत शिरून आम्ही वर गेलों.

दिव्यांतून ' विश्वतो ' निघणाऱ्या किरणांना खुबीनें वळवून त्यांचा पाण्याच्या पृष्ठभागाशीं समांतर असा धबधबा वाहता सोडण्यासाठीं अनेक प्रकारच्या बिलोरी काचेच्या बनवलेल्या दोन ढाली आम्हीं सर्वांत प्रथम पाहिल्या. पॅराबोला आणि हायपर-बोलाच्या गणिताचा त्यांत पुरेपूर उपयोग केलेला असतो. शंकुछेदाचें * गणित ज्याला ठाऊक आहे तोच त्याचें रहस्य समजूं शकेल. त्यानंतर त्या दिव्याचा बुरखा एकीकडे सारून दूरवरची सामुद्रीय शोभा आम्हीं न्याहाळली आणि त्यानें तृप्त न होतां. दिव्याच्या आसपास बांधलेल्या गॅलरींत जाऊन मुक्तपणें दाही दिशांना आम्हीं पाहूं लागलों.

---

* Conic Sections

जें दृश्य पाहण्याची हौस छप्पन वर्षे बाळगली होती, तें दृश्य आज पाहिलें! डोळ्यांचें पारणें फिटलें! सगळें बेट जणूं काय एक मोठें जहाज आहे व दिवादांडी त्याची डोलकाठी आहे, आणि आम्ही त्यावर चढून चौकी करणारे खलाशी आहोंत! जहाजाच्या डोलकाठीप्रमाणें ही दिवादांडी डोलत नव्हती हें खरें. पण नुकताच वाफराचा प्रवास करून आलेलें आमचें डोकें ती कमतरता दूर करीत होतें.

इतक्या उंचावरून चौफेर नजर फेंकण्यांत एक आगळाच आनंद होत असतो. कुतुबमिनारवरून हिंदुस्थानच्या अनेक सत्तांच्या राजधानीचें स्मशान पाहून मनांत जी विषण्णता उत्पन्न होते तशी येथें होत नाहीं. येथून दिसणाऱ्या समुद्रांत प्राचीन काळापासून आजपावेतों अनेक जहाजें बुडालीं असतील, पण त्याची विषण्णता येथल्या वातावरणांत मुळींच आढळत नाहीं. समुद्रांत भूत आणि भविष्य यांना स्थानच नसतें. एक तर वर्तमानकाळ किंवा सनातन अनंतकाळ या दोघांचेंच साम्राज्य तेथें नांदत असतें. जेव्हां वादळ होतें तेव्हां वाटतें कीं हेंच समुद्राचें सत्य व शाश्वत रूप आहे. आणि जेव्हां आजच्याप्रमाणें सर्वत्र शांति पसरलेली असते तेव्हां वाटतें कीं वादळ तर एक माया आहे. समुद्राचें मुखमंडल तर खरोखरच भगवान् बुद्धांची शांति व त्यांचा उपशम व्यक्त करण्यासाठींच निर्मिलें आहे.

इतक्या मोठ्या, विशाल समुद्राला आशीर्वाद देण्याची शक्ति पितामह आकाशावांचून दुसऱ्या कुणापाशीं असणार? आकाश शांत चित्तानें सर्वत्र पसरून समुद्रावर रक्षणाचें झांकण बसवीत होतें आणि या झांकणावर कसलीच नक्षी नसावी हें सहन न करूं शकणारे पक्षी त्यावर तऱ्हेतऱ्हेच्या रेघोट्या ओढण्याचा अस्थायी प्रयत्न करीत होते. एखाद्या उग्र माणसाला हंसवण्यासाठीं ज्याप्रमाणें मुलें त्याच्यापुढें भीत भीत थोडे चाळे करून पहातात, त्याप्रमाणें समुद्राचा निळा रंग आकाशाच्या नीलिम्याला हंसविण्यासाठीं अनेक प्रयोग करून पहात होता.

भगवंताचें असलें विराट दर्शन होतांच भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायाचें स्मरण व्हावयास हवें होतें, परंतु इतक्या प्राचीन काळांत शिरण्यापूर्वीं उत्तेजित झालेल्या चित्तानें विसाव्यासाठीं एक जवळचा प्रसंग पसंत केला. वीसेक वर्षांपूर्वीं लंकेच्या थेट दक्षिणेला देवेन्द्राच्याहि पुढें जेव्हां माताराला गेलों होतों तेव्हां तेथल्या दिवादांडीवर चढून दुपारच्या उन्हांत असेंच पण

याहूनहि कितीतरी पटींनीं विशाल दृश्य पाहिलें होतें. तेथें तर नजरेची त्रिज्या करून माणसाला जेवढें मोठें वर्तुळ काढणें शक्य आहे तेवढें काढून, त्याचा दक्षिणार्ध दिला होता हिंदी महासागराला. आणि उत्तरार्ध नारळींच्या पानांच्या लाटा उसळविणाऱ्या आणि दुपारच्या उन्हांत चकाकणाऱ्या वनसागराला अर्पण केला होता. येथें देवगडावरून, पूर्वेकडे सूर्यनारायणाचें पादपीठ म्हणून शोभणारा पर्वत दिसत होता. त्याच्या पायथ्याशीं पसरलेला कारवारचा समुद्र शांतपणें चकाकत होता. त्याच्या वरचें होड्यांचें नक्षीकाम अगदीं पुसट पुसट होतें. आणि पश्चिमेकडे तर अरबस्तानचें स्मरण करविणारा एक मात्र अखंड महासागरच होता. तें सारें दृश्य हृदय गुदमरून टाकणारें होतें.

मुखावाटें इतकेच शब्द निघूं शकले, ' नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ! '

* * *

आमच्या लाजाळू चित्रकारानें इतक्या वेळांत एका कोपऱ्यांत बसून जवळच्या खडकाचें व आसपासच्या समुद्राचें चित्र चितारलें. घरीं आल्यावर त्यानें तें मला भेट दिलें. छप्पन वर्षांची भूक शमविण्याच्या शुभ प्रसंगाचें स्मारक म्हणून तें सुंदर भावपूर्ण चित्र मीं प्रसन्नतापूर्वक स्वीकारलें.

दिवादांडीचें काव्य शेवटीं पूर्णतेला पोहोंचलें.

मे, ४७.

* * *

# भरताच्या डोळ्यांनीं

६

किनाऱ्यावर उभें राहून समुद्राची शोभा न्याहाळीत असतांना हृदयाला आनंदाची भरती येते. थोड्याशा उंचीवरून जर ही शोभा न्याहाळायला मिळाली तर मग काय विचारतां ? जहाजाच्या डेकवरून किंवा देवगडसारख्या बेटाच्या माथ्यावरून समुद्राचें किनाऱ्यावरील आक्रमण पहाण्यांत पुन्हां एक वेगळाच आनंद भरला आहे. आपण समुद्राचे राजा आहोंत आणि लाटांची ही सेना आपल्या वतीनेंच समोरचा भूमिभाग पादाक्रांत करीत आहे असें वाटून आपल्यांत एक प्रकारचा अभिमान स्फुरूं लागतो. नीट निरखून पाहिलें तर आपल्याला दिसून येतें कीं हिरवेंचार किंवा काळेंभोर पाणी खुशींत येऊन पांढऱ्याशुभ्र वाळूच्या वेळेवर आक्रमण करतें आणि मग ऐन घडीस, ' अरे, हा तर केवळ विनोद होता ' असें म्हणून हसूं लागतें. अशा वेळीं त्याच्या या फसवेगिरीवर आपणहि मुक्तदंत हंसूं लागतों.

समुद्रकांठीं रहाणाऱ्या लोकांना अशीं दृश्यें वाटेल तेव्हां पहावयास मिळतात. पण समुद्र आणि वाळूचा पट जेथें अखंड जलक्रीडा करीत आहेत अशा बाजूस काटकोनांत कांहींसें उंचावर उभें राहून, तो वाळूचा जलविहार आणि लाटांचा सिकताविहार न्याहाळण्याचें अहोभाग्य जरकधीं काळीं लाभलें तर मनुष्य 'अद्य मे सफला यात्रा; धन्योऽहं अप्प्रसादतः ' असें गाऊं लागेल ! गाऊं लागणार नाहीं ?

गोकर्णाची पहिली यात्रा मीं सन १८९५ त केली होती आणि त्याचें पुन्हां एकदां दर्शन गंगाधरराव देशपांड्यांबरोबर दहा वर्षांपूर्वीं घेतलें होतें. आतां त्याच गोकर्णाच्या पवित्र किनाऱ्यावर संगववेळीं * समुद्राचें दर्शन कर-

---

* गायींची धार काढण्याचें आणि गोशाळा साफ करण्याचें काम उरकल्यानंतर त्यांना चरायला वनांत पाठविण्यासाठीं जेव्हां गोळा करण्यांत येतें त्या वेळेस ( सकाळचा नऊ वाजण्याचा सुमार ) संगववेळा म्हणतात. वेदकाळांतील हा शब्द आहे.

ण्याचें अहोभाग्य मला लाभलें. त्यामुळें तर मी पुरता वेडावून गेलों होतों. गोकर्णाचा समुद्रकिनारा चांगला ऐसपैस आणि भव्य आहे. उजवीकडे म्हणजे उत्तरेकडील बाजूस कारवारकडील डोंगर आणि बेटें धूसर क्षितिजांत पुसट पुसट भासमान होत आहेत आणि डाव्या म्हणजे दक्षिणेकडील बाजूस रामतीर्थाचा डोंगर आणि त्यावरचें भरताचें छोटेंसें मंदिर दिसत आहेत. अन् समोर अनंत अगाध सागर 'तूं अमर होऊन ये' असें अहोरात्र आवाहन करीत आहे. असें हृदयाला उन्मत्त करून सोडणारें दृश्य एकदां पाहिल्यानंतर त्याचा कधींकाळीं विसर पडूं शकेल काय? रामतीर्थाच्या खडकावर जाऊन तिथल्या झऱ्यांत आंघोळ करण्याचा संकल्प नसता तर या सागराच्या हृदयांत तरंगत रहाणेंच मीं पसंत केलें असतें. आम्ही नारळींच्या बागा आणि खडबडीत खडक ओलांडून रामतीर्थापर्यंत पोंचलों. तेथें धारेखालीं स्नान करण्याचा जीवनानंद आपादमस्तक मिळविला, रामेश्वराचें दर्शन घेतलें.

असंख्य लोकांना उत्साहित करून शांडिल्यमहाराज नांवाच्या एका साधूनें येथलें बांधकाम विनामूल्य करवून घेतलें होतें. समुद्रांत घुसलेल्या उंच डोंगरावर हें मंदिर आहे. त्यामुळें वाळूचा पट आणि लाटांचा पट एकमेकांना बिलगून खेळ खेळत आहेत अशा या दृश्याचें, कित्येक मैल दूर पसरलेलें सौंदर्य आम्ही त्या मंदिरांतून पाहूं शकलों. नारळाच्या दोन-तीन झाडांनीं त्याच ठिकाणीं उभें राहून त्या सागर-सिकता-मीलनाच्या दृश्याचा आनंद लुटण्याचें ठरविलें होतें. आपल्या झावळ्या हलवून तीं आम्हांला म्हणालीं, 'या, या! अगदीं हीच जागा नेमकी आहे. येथूनच सिकता-सागर यांच्या मीलनाची रेखा समोर सरळ दिसून येत आहे.'

येथून मला आढळून आलें कीं, पाण्याच्या लाटांना समुद्राच्या खोल पाण्याचें पाठबळ होतें. वाळूच्या पटाला कोण पाठबळ देणार? आसपास कुणी टेकड्या नव्हत्या म्हणून नारळी, सुरूसारख्या झाडांनीं ही जबाबदारी आपल्या शिरावर घेतली होती. हीं उंच झाडें आणि तेथलें तें खोल पाणी यांच्या हिरव्या रंगांत फरक होता खरा, पण त्यांच्या कार्यांत मात्र कसलाहि फरक दिसत नव्हता. झाडें आपल्या पायातळींच्या वाळूला आशीर्वाद देत आहेत. आणि समुद्राचें खोल पाणी लाटांना पुढें झेंपावण्यासाठीं उत्तेजन देत आहे—असें हें दृश्य कितीहि पाहिलें तरी तृप्ति कशी होईल?

एखाद्या दृश्यानें तृप्ति वाटली नाहीं म्हणून एके ठिकाणीं उभें राहून त्याच दृश्याचा आस्वाद घेत रहाणें माणसाला थोडेंच रुचणार ? मला आढळून आलें कीं, रामतीर्थाच्या झऱ्याची आणि रामेश्वराच्या मंदिराची रखवाली करण्यासाठींच कीं काय श्रीरामचंद्राचा कारभारी भरत टेकडीच्या माथ्यावर उभा आहे. त्याचें दर्शन घेतलेंच पाहिजे आणि शक्य झाल्यास त्याच्या नजरेनें योग्य उंचीवरून समुद्र पाहून घेतला पाहिजे. उंच चढल्यावांचून विशाल दृष्टि कोठून येणार ? पायऱ्यांनीं आमंत्रण दिलें, आणि मी शिडांत वारा भरावा त्याप्रमाणें नाचत आणि उड्या मारीत किंवा उडत भरताचें मंदिर गांठलें. तेथें छोटासा गोरा भरत सुंदर पीतांबराचा काचा मारून समुद्रदर्शन करीत होता.

खरें पहातां भरताच्या मंदिराच्या आसपास मंदिर नकोच होतें. ऊन, वारा आणि पाऊस यांची तपश्चर्या करण्याची त्याला मोकळीक द्यायला हवी होती. समुद्रावरून येणाऱ्या गार वाऱ्यांत सूर्याच्या उन्हाचा ताप त्यानें सहज सोसला असता आणि किती झालें तरी भरत हा सूर्यवंशाचाच राजपुत्र होता याचा लोकांना कसा काय विसर पडला ? वायुपुत्र हनुमानाचें आणि सूर्यवंशी राघवांचें स्मरण करीत आम्ही कितीतरी वेळ तेथें उभें राहिलों. हृदयांत भक्तिभावाला भरतें येत होतें आणि समोर समुद्राच्या पाण्याला भरती येत होती.

त्या दिवशींच्या त्या भव्य-पावन दर्शनाबद्दल रामतीर्थाचा आणि भरत महाराजांचा मी सदा ऋणी राहीन.

मे १९४७.

* * *

# रण कीं सरोवर

६

एखादी घटना नियमित घडत असली म्हणून तिची अद्‌भुतता थोडीच नष्ट होते ! !

सहा तासांपूर्वी कुठेंच पाणी दिसत नव्हतें. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत समुद्रकिनारा सरळ पसरला आहे. पश्चिमेकडे जेथें आकाश नम्र होऊन धरतीला स्पर्श करतें तेथवर–क्षितिजापर्यंत–पाण्याचें नांव नाहीं, एकहि लाट दिसत नाहीं. या क्षणीं हें स्थान नव्यानें पहाणाऱ्याला वाटावें कीं हा एखाद्या वाळवंटाचा भाग असावा; पाऊस पडून ओला झाला आहे इतकेंच. अथवा त्याला वाटेल कीं ही एखादी मोठी दलदल आहे, त्यांत गवत उगवलेलें नाहीं इतकेंच. दृष्टीची पोंच जेथवर आहे तेथवर सरळ सपाट जमीन पसरलेली पाहून किती आनंद होतो ! इतकी सपाट भूमि तयार करण्याचें काम एखाद्या इंजिनीयरवर सोंपवलें तर त्याला अपार मेहनत करावी लागेल. पण ही आहे निसर्गाची करामत. उंच उंच पहाडांत भव्यता असते, तर अशा समतत* प्रदेशांत विशालता, विस्तीर्णता असते. या विशालतेचें पान करण्यांत गढून गेलों होतों, इतक्यांत दूर क्षितिजावर जहाजासारखें कांहींतरी दिसलें. जमिनीवर आणि जहाज ! हें कसें काय बुवा ? इतक्यांत दक्षिणेकडून उत्तरेकडे पसरलेली एक भुऱ्या रंगाची रेषा हळू हळू जाड होऊं लागली. तिच्यावर हळू हळू पांढऱ्या लहरी दिसूं लागल्या. पाण्याची सेना आली. सेनापतीच्या हुकुमाप्रमाणें एक-कतार लाटा पुढें सरकूं लागल्या.

आलें, आलें, पाणी पुढें आलें. अर्धा तट त्यानें व्यापून टाकला. सूर्य वर चढत होता, उकाडा वाढत होता आणि लाटांचा उन्मादहि वाढत चालला

---

* समतत–Stretched evenly. उदाहरणार्थ, गंगामुखाजवळील सुंदरवनाचें प्राचीन नांव ‘ समतत ’ होतें.

होता. या लाटा ईश्वरानें सोंपवलेलें कांहीं असाधारण कार्य सिद्ध करण्यासाठीं अशा पुढें येत आहेत का ? या लाटा रामदूतासारख्या दिसत नाहींत, देवदूतासारख्याच दिसतात. जंगलांत लांडग्याचा कळप भरधाव दौडत, उड्या मारीत यावा त्याप्रमाणें लाटा वाढूं लागल्या. जेथें नीरव, ओलें रण होतें तेथें उसळणाऱ्या, गरजणाऱ्या लाटांचा समुद्र पसरला. भरती ऐन आवेशांत आली. लाटा येताहेत आणि किनाऱ्यावर आदळताहेत.

थोडेसें टक लावून तास, अर्धा तास पाण्याकडे सारखें पहात राहिलांत तर लगेच मनाला जाणवल्यावांचून रहाणार नाहीं कीं या लाटा जड नसून सचेतन आहेत. त्यांना सुद्धां स्वभावधर्म आहे. जेथें पहावें तेथें पाणीच पाणी. डाव्या बाजूचीं तरवडाचीं झुडपें पाण्यांत हेलकावे घेऊं लागलीं; जणूं काय आतांच बुडून जातील. मर्यादवेल बऱ्याच दिवसांनीं भाचा भेटायला आला म्हणून स्नेहार्द्र झाली आहे, आणि लाटांचा मद तर उतरतच नाहीं. हत्तीप्रमाणें धावतात आणि किनाऱ्यावर वप्रक्रीडेचा आनंद अनुभवतात. किती अद्भुत दृश्य ! जमीन सखल असली, तिला उतरण असली आणि पाणी नदीरूपानें वहात असलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. उतार पाहून वहाणें हा पाण्याचा स्वभावधर्म आहे. पण सपाट भूमीवर जेथें पाणी मुळींच नव्हतें, तेथें पावसाशिवाय किंवा महापुराशिवाय पाणी दौडत यावें आणि पाण्याचा एक जाड थर जमिनीवर पसरत जावा हें केवढें आश्चर्य ? जेथें आतांच आपण धावत, फिरत होतों तेथें पाऊल ठरणार नाहीं अशी जळाकार स्थिति कशी काय झाली असेल ? इतक्या थोड्या वेळांत केवढा मोठा विपर्यास ! जेथें हवेंत हात हलवीत आम्ही फिरत होतों, तेथें उसळणाऱ्या लाटांमध्यें हाताचीं वल्हीं चालवून पोहण्याचा आनंद लुटत आहोंत. जणूं काय घोड्यावर बसून फेरफटका करायला निघालों आहोंत. या भरतीच्या क्षणीं जर कुणी मनुष्य नव्यानें येऊन हें दृश्य पाहील तर त्याला वाटेल कीं खाऱ्या पाण्याचें हें तुडुंब भरलेलें सरोवर हजारों वर्षांपासून येथें असेंच्या असेंच पसरलेलें आहे. पण जर त्यानें थोडे तास उभें रहाण्याची तसदी घेतली आणि पाहिलें तर कळून येईल कीं इतक्या मोठ्या महायुद्धासारख्या चढाओढीला सुद्धां अंत आहे. आपली लीला जशी पसरली, तशीच ती आतां मागें खेंचून घेण्याची वेळ आली आहे. ईश्वराचें कार्य जणूं समाप्त झालें. ईश्वरानें जणूं आपली प्राणशक्ति

मागें खेंचून घेतली. आतां एक एक लाट किनाऱ्याकडे दौडत आल्यासारखी वाटली तरी पाणी मागें हटत आहे हें स्पष्ट होऊं लागलें.

निघालें, पाणी हटूं लागलें. समुद्राच्या पलीकडे काय एवढा मोठा खड्डा पडला असेल कीं तो भरण्यासाठीं हें सगळें पाणी धांवत परत चाललें आहे ! अग्रेसर लाटांना मागें फिरतांना पाहून मागून येणाऱ्या लाटांचा मधेंच विरस होतो आणि धावतां धावतांच त्यांना फेसाळ हसूं कोसळतें. सागराच्या पाण्याचें मोजमाप कोण काढणार ? तें मापणार तरी कसें ? इतकें पाणी आलें कां आणि चाललें कां ? त्याला विचारणारें कुणीच नाहीं का ? कीं कुणीतरी विचारणारें आहे म्हणूनच तें इतक्या नियमानें येतें आणि जातें ? जसजसा अधिकाधिक विचार करावा तसतशी या सर्व बनावाची अद्‌भुतता मनावर अधिकाधिक ठसूं लागते. भरती आणि ओहोटी ही काय वस्तु आहे, तिचा उपयोग काय, ती जर नसती तर समुद्राचें काय झालें असतें, समुद्रजीवी प्राण्यांच्या जीवनांत काय काय फेरफार घडले असते, चंद्राचें व सूर्याचें आकर्षण आणि सागराचें पृथ्वीच्या थरापासून वेगळेपण वगैरे उपपत्ति योग्यच आहेत. पण या सर्वांमागला उद्देश काय हें जाणण्याकडेच मनाचा अधिक ओढा असतो. पण ही जिज्ञासा अजून तृप्त झालेली नाहीं.

जितक्यांदा समुद्रांत भरती-ओहोटी पहातों तितक्यांदा ती सारख्याच प्रमाणांत अद्‌भुत वाटते आणि ईश्वराच्या सृष्टींत जिथें तिथें तो ज्ञानमय प्रभूच सनातनपणें विराजत आहे याची प्रतीति येते.

'सर्वम् समाप्नोषि ततोऽसि सर्वः ।' असें म्हणून हृदय त्याला प्रणिपात करतें. सृष्टि महान् आहे तर मग तिची निर्मिति करणारा तो विभु कसा असेल ? त्याला कोण ओळखूं शकेल ? त्याला सुद्धां स्वतःला ओळखण्याची पर्वा असेल का ?

बोर्डी १ मे, १९२७.

* * *

# सार्वभौम भरती-ओहोटी

७

प्रत्येक लाट किनाऱ्यापर्यंत येते आणि मागें जाते. ही एकप्रकारची भरती आणि ओहटीच आहे. ती क्षणजीवी आहे. मोठी भरती-ओहटी बारा बारा तासांनीं येते. ती देखील एक प्रकारची मोठी लाटच म्हटली पाहिजे. ही बारा तासांनीं येणारी भरती-ओहटी जिची लाट आहे अशी ती भरती-ओहटी कोणती ? अक्षयतृतीयेची भरती जर वर्षांतील सर्वांत प्रचंड भरती तर मग सर्वांत सौम्य भरती केव्हां येते ?

आपण श्वास आंत घेतों आणि बाहेर सोडतों ही सुद्धां एकप्रकारची भरती-ओहटीच आहे. हृदयाची धडधड चालते आणि त्याबरोबर रक्त साऱ्या शरीरांत खेळत राहतें ही सुद्धां एक प्रकारची भरती-ओहटीच आहे. बालपण, तारुण्य आणि म्हातारपण या अवस्था सुद्धां तसें पाहूं गेलें तर एक मोठी भरती-ओहटीच आहे. अशा प्रकारें भरती-ओहटीचा हा क्रम विशालांतून विशालतर बनत सारें विश्व व्यापूं शकतो. जिकडे तिकडे भरती-ओहटीच आहे. राष्ट्रांना भरती-ओहटी लागते, संस्कृतींना भरती-ओहटी लागते. धार्मिकतेला सुद्धां भरती-ओहटी लागतच असते. प्रत्येक ओहटीनंतर भरतीची प्रेरणा देणारे तेच आपले रामचंद्र व कृष्णचंद्र यांच्यासारखे अवतारी पुरुष. समुद्राच्या भरती-ओहटीला प्रेरणा देणाऱ्या चंद्रावरूनच राम व कृष्ण यांना चंद्राची उपमा दिली गेली असेल का ? दोघांचेंहि दर्शन आल्हादकारक होतें त्यावरून त्यांना चंद्राची उपमा मिळाली होती असें कवि म्हणतात. आणि कवि म्हणतात तें खरेंच असलें पाहिजे. पण असें देखील कशावरून नसेल कीं धर्माची ओहटी थांबवणारे आणि नव्या भरतीला गति देणारे ते दोघेहि धर्मचंद्र होते, त्यावरूनच त्यांना चंद्राची उपमा दिली असेल ? अशी ही उपपत्ति आतांपर्यंत जरी

कुणी दिली नसली, तरी माझ्यापुरतें तरी धर्मसागराचे चंद्र म्हणूनच त्यांचें नांव रामचंद्र व कृष्णचंद्र पडलें असें मी मानणार.

जलाच्या ठायीं स्थल आणि स्थलाच्या ठायीं जल करूं शकते ती 'अघटित-घटना-पटीयसी' अशी ईश्वराची माया होय असें म्हणतात. या मायेचें आपल्याला येथें रोज दर्शन घडतें; तरीहि आपण भक्तिविनम्र कां होत नाहीं ? अद्‌भुत वस्तु रोजची झाली म्हणून काय निःसार बनली ? माझ्या जीवनावर तीन वस्तूंनीं आपल्या गांभीर्यानें सर्वांत अधिक परिणाम केलेला आहे. हिमालयाचे उत्तुंग पहाड, कृष्णरात्रीचें रत्नजडित गहिरी आकाश आणि विश्वात्म्याचें अखंड स्तोत्र गाणारा महार्णव. तीन हजार वर्षांपूर्वीं किंवा दोन हजार वर्षांपूर्वीं असेल ( हजाराचा येथें हिशोब नाहीं ) भगवान बुद्धाचे भिक्षु तथागताचा संदेश देशदेशांतरीं पोंचवून याच समुद्र-किनाऱ्यावर आले असतील. सोपाऱ्यापासून ते कान्हेरीपर्यंत, तेथून घारापुरी-पर्यंत आणि ठाणें जिल्हा व पुणें जिल्हा यांच्या सरहद्दीवर असलेल्या नाणाघाट, लेण्याद्रि, जुन्नर वगैरे स्थानांपर्यंत, कार्ला व भाजा येथील प्राचीन पहाडापर्यंत आणि या बाजूनें नाशिकच्या पांडवगुंफांपर्यंत शांतीचे सागर असे बुद्धभिक्षु जेव्हां विहार करीत असतील तेव्हांचा भारतीय समाज वेगळा होता. त्या वेळचे प्रश्न वेगळे होते. कार्यप्रणाली वेगळी होती. पण त्यावेळचा समुद्र मात्र अगदीं हाच होता. अशाच रीतीनें तो गर्जना करीत असेल. असेल काय, होताच. आणि 'सगळें दृश्यजात नश्वर आहे, कर्मच काय तें एक खरें होय. ज्याचा संयोग होतो, त्याचा वियोग हा होणारच. जे संयोग-वियोगाच्या पलीकडे गेले, त्यांनाच शाश्वत निर्वाण सुख मिळतें' असें आजच्याप्रमाणें त्यावेळीं सुद्धां महासागर बोलत होता. तो जमाना पालटला. महासागराचें नांव देखील बदललें. परंतु त्याचा संदेश बदलला नाहीं. भरती-ओहटींच्या पलीकडे जो जातो त्यालाच शाश्वत शांति मिळते. तोच बुद्ध आहे, तोच सुगत आहे. तो गेला कीं गेला. भरती परत येईल. ओहटी परत येईल. तो परत येणार नाहीं. तथा-गत खरोखरच सु-गत आहे.

बोर्डी, ७ मे, १९२७.

* * *

# चांदीपूर

८

मला खात्री होती कीं गेल्या खेपेस चांदीपूरमध्यें जें दृश्य मीं पाहिलें तें या खेपेस मला पहायला मिळणार नाहीं. त्यामुळें फार आशा न बाळगण्याचें मनाला बजावूनच आम्हीं चांदीपूरला जाण्यासाठीं निघालों. पण तरीसुद्धां चांदीपूर तें चांदीपूर. त्याची सामान्य शोभासुद्धां असामान्य म्हटली पाहिजे. कलकत्ता-कटक मार्गावर बालासोर अथवा बालेश्वर म्हणून एक कसबा आहे. त्याच नांवाचें एक रेल्वे-स्टेशनहि आहे. चांदीपूर तेथून आठ मैल पूर्वेस समुद्रकिनाऱ्यावर वसलेलें आहे. लष्करी खात्यानें हें स्थान थोडेंबहुत उपयोगांत आणलेलें आहे. पण त्यामुळें कांहीं त्याचें महत्त्व वाढलेलें नाहीं. येथून तीन मैलांवर बुढ्ढी बलंग नांवाची नदी ज्या ठिकाणीं समुद्राला मिळते, तेथें एक चांगलें बंदर होण्यासारखें आहे, पण अजून तसें कांहीं झालेलें नाहीं. चांदीपूरचें आजचें महत्त्व त्याला त्याच्या नैसर्गिक शोभेमुळेंच लाभलेलें आहे. आणि म्हणूनच मीं त्याला ' उगवतीची बोर्डी ' असें नांव दिलें आहे.

मुंबईच्या उत्तरेस घोलवड स्टेशनापासून दीड मैलावर बोर्डी नांवाचें एक स्थान आहे. तेथला समुद्र जेव्हां ओहोटीमुळें मागें हटतो, त्या वेळीं चांगलें दीड दोन मैलांचें पात्र रिकामें करून टाकतो आणि पाणी हटत हटत जवळ जवळ क्षितिजाला जाऊन भिडतें. सगळा समुद्रकिनारा जणूं काय देवाचें किंवा दानवांचें भिजून गेलेलें टेनिस-कोर्ट असावें तसा सरळ सपाट दिसूं लागतो आणि जेव्हां भरतीबरोबर पाणी येऊं लागतें तेव्हां पहातां पहातां तो सगळा किनारा सरोवराप्रमाणें तुडुंब भरून जातो. क्षणांत ओलें वाळवंट तर क्षणांत उथळ सरोवर, अशी ही निसर्गाची लीला पाहून मला जो विस्मय वाटला होता, त्याविषयीं लिहून काढलें तेव्हां मल

स्वप्नांत देखील कल्पना शिवली नव्हती कीं, हुबेहूब असेंच एक स्थान उगवतीस पूर्व किनाऱ्यावर निसर्गानें निर्माण करून ठेवलेलें आहे.

राष्ट्रभाषा-प्रचाराच्या निमित्तानें मी जेव्हां याच्या आधीं कलकत्त्याहून उत्कलमध्यें आलों होतों, त्यावेळीं बालासोरचें काम आटपून चांदीपूर पहाण्यासाठीं मुद्दाम गेलों होतों. रस्त्यांत पावलोंपावलीं पाण्यानें भरलेल्या खळग्यांमध्यें नील कमळें उगवलेलीं पाहून, माझ्या आनंदाला पारावार उरला नव्हता. कमल म्हणजे प्रसन्नतेचें प्रतीक. सुंदरता, कोमलता, टवटवी आणि पवित्रता यांचा जेव्हां मिलाफ झाला तेव्हां त्यानें कमलाचें रूप धारण केलें. कमल पांढरें असतें तेव्हां तपस्विनी महाश्वेतेचें स्मरण करून देतें; तेंच लाल असतें तेव्हां गंधर्वनगरीवर राज्य करणाऱ्या कादंबरीसारखें शोभून दिसतें. पण नील कमल तर प्रत्यक्ष कुंजविहारी श्रीकृष्णच होय असें वाटतें. आपल्या येथें नील कमलें अधिक प्रमाणांत पहावयाला सांपडत नाहींत, हें सुद्धां तसें वाटण्याचें कारण असेल. पण या रस्त्यानें जातांना नील कमलें पाहून मला अपरंपार आनंद झाला होता इतकें खरें.

बालासोरपासून चांदीपूरची सडक जवळ जवळ सरळ आहे. थेट किनाऱ्यावर डाक बंगल्याच्या दाराशीं जाईपर्यंत समुद्राचें दर्शनच होत नाहीं. पण एकदां झालें कीं लगेच आपल्या विशालतेनें चित्ताचें हरण करतें. गेल्या खेपेस आम्ही गेलों होतों तेव्हां भरती हळूहळू वाढत होती आणि नाजुक तन्वंगी लाटा क्षितिजाशीं समांतर रेषेंत संथपणें पुढें सरकत होत्या. क्षितिजापासून निघून किनाऱ्यापर्यंत येणाऱ्या लाटा जणूं काय दोन-तीन मैल लांबीची एक दोरी ताणून कुणीतरी पुढें आणीत असावें त्याप्रमाणें सरळ आणि समांतर येत होत्या. माझ्याबरोबर एखादा विद्यार्थी असता तर मीं त्याला समजावलें असतें कीं, वहीमधें पट्टी घेऊन ओळी आंखायच्या असतील तर या लाटांइतक्या नीट समांतर आल्या पाहिजेत. जमीन जेव्हां सगळ्या प्रकारें सारखीच सपाट असते तेव्हां इंग्रज लेखक तिला टेनिस कोर्टाची उपमा देतात. पण कुठें टेनिस कोर्ट आणि कुठें ही मैलच्या मैल विस्तारलेली लांब रुंद सिकतास्थली !

तें सगळें दृश्य पोटभर पाहून घेतलें. पोट भरल्यावरहि पाहिलें. समोरून पाहिलें, बाजूनें पाहिलें. आपण किती पुण्यवान आहोंत अशा धन्यतेच्या जाणिवेसहित पाहिलें आणि मग आतां पुढें काय करायचें असा विचार

मनांत आला. याविषयीं लिहायचें तर होतेंच. राजाला रत्नें सांपडलीं कीं तो तीं आपल्या खजिन्यांत पोंचवतो. स्त्रियांच्या हातीं फुलें लागलीं कीं त्या तीं आंबाड्यांत माळल्यावांचून रहायच्या नाहींत. निसर्गाची उपासना करणाऱ्या लेखकाला एखादें सुंदर दृश्य पहायला मिळालें कीं तें लेखबद्ध किंवा कविताबद्ध केल्याशिवाय तो स्वस्थ बसणार नाहीं. पण तें तर घरीं गेल्यावरच शक्य आहे. आतां येथें काय करायचें ? निसर्गाचा विस्तार रुंद असो किंवा उत्तुंग असो, त्याचा आस्वाद केवळ डोळ्यांनींच घ्यायचा नसतो. पायांनासुद्धां त्यांचा वांटा दिलाच पाहिजे.

आम्ही डाकबंगल्याच्या उंचीवरून निसटणाऱ्या आणि खिदळणाऱ्या वाळूवरून धावत धावत खालीं उतरलों. तेथें मोठमोठीं माणकें इकडे तिकडे धावतांना आणि पृथ्वीच्या उदरांत गडप होतांना आम्हांला दिसलीं. काय तो त्यांचा चमकदार तरल लालरंग ! मखमलींत जसा कांहींसा फिक्कट आणि गहिरा असा दुहेरी लालसरपणा असतो, तशीच छटा प्रकाशामुळें माणकांतसुद्धां आढळून येते. तेंच लावण्य आम्हांला या पाय असलेल्या आणि पळणाऱ्या रत्नांत दिसलें. हे खेकडे जितके आकर्षक होते तितकेच भयंकरहि वाटत. येऊन डसले तर आपल्याइतकेंच लाल रक्त काढतील अशी भीति वाटे. पण ते जितके भयंकर होते, तितकेच भित्रेहि होते. माणसाला पाहून चटकन् आपल्या बिळांत गडप होत. आम्ही त्यांच्या मागून धावलों आणि त्यांची धावपळ बघण्याची मौज लुटली.

धावतां धावतां डब्यांसारखे लहानमोठे शिंपले आम्हीं पाहिले. त्यांच्यावरचें नक्षीकाम पाहून माझी खात्रीच झाली कीं, यांचा आकार पाहूनच येथल्या मंदिरांचे कळस घडविले गेले असावेत. सुपारीघाटापेक्षां हा घाट कलेच्या दृष्टीनें किती तरी वरचढ आहे.

चि. मदालसेनें अशा कितीतरी डब्या वेंचल्या. त्यांना आरपार छिद्र असल्यामुळें त्यांचा हार बनविण्याची कल्पना सहज सुचण्यासारखी होती.

समुद्राचा विस्तार, त्याच्या लाटा, ते खेकडे आणि हे शिंपले या सर्वांविषयीं बोलत बोलत आम्ही परत फिरलों. कित्येक नील कमलांना सोबत घेतलें, आणि आजवरच्या भारतवर्षाच्या विविध दर्शनांत आणखी एक मूल्यवान भर पडली या समाधानांत आम्ही घरीं पोंचलों.

या वेळीं जेव्हां पुन्हा बालासोरला आलों, तेव्हां तें सारें दृश्य हुबेहूब नजरेसमोर उभें राहिलें आणि त्याला आपली श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठीं म्हणून चांदीपूरला जाण्याचा कार्यक्रम आम्ही ठरवला.

आकाश ढगाळलेलें होतें, तरीसुद्धां चांदीपूरला पोंचल्यावर आपल्याला पाण्यामधून बाहेर निघणाऱ्या सूर्याचें दर्शन घडेल अशी आशा आम्हीं बाळगलेली होती. म्हणून साडेतीन वाजतां उठून आम्ही नित्यविधि उरकले. चार वाजतां डॉ. भुवनचंद्रांची मोटर मागविली आणि मोटरवेगानें आठ मैलांचें अंतर पार केलें. रस्त्यांत नव्हते ते पूर्वींचे खळगे कीं नव्हतीं श्रीकृष्णाच्या डोळ्यांशीं स्पर्धा करणारीं नील कमलें. मला खात्री होती कीं, त्या पूर्वींच्या लाटा आपल्याला पहायला मिळणार नाहींत. अष्टमीचा चंद्र माथ्यावर मंद चमकत होता. त्यामुळें तेथें केवळ तुडुंब भरलेलें शांत सरोवरच आढळेल असें मीं मानलें होतें. आम्ही आमच्या परिचयाच्या डाकबंगल्याच्या अंगणांत आलों आणि मला आढळलें कीं पाणी तर केव्हांच मागें वळलें आहे. दूरचें गढूळ पाणी पाहून रेतीचे ढीग पडले असावेत असा भास होत होता. रेतीचा पट अधिकाधिक उघडा पडत चालला होता. आम्ही जर चारेक मिनिटें आधीं पोंचलों असतों तर सूर्याला पाण्यांत पाय ठेवतांना पाहिलें असतें. आकाशांत ढग असले तरी क्षितिजाकडचें आकाश स्वच्छ रेखीव दिसत होतें. ढगांचे डाग सूर्याच्या त्या शोभेंत भर टाकीत होते. सूर्याला पाहून माझा नेहमींचा श्लोक बोलण्याचें पण मला भान राहिलें नाहीं. मीं फक्त टाळ्यांचें अर्घ्य अर्पण करून दूर समुद्रांत निघालेल्या सूर्यनारायणाचें उपस्थान केलें. मी मनांत मनूचा श्लोक बोललों–

**आपो नारा इति प्रोक्ता आपो वै नर-सूनवः ।**
**तायदस्य अयनं जातम् इति नारायणः स्मृतः ॥**

इतक्यांत अमृतलालनें गीत ललकारलें––

प्रथम प्रभात उदित तव गगने ।

खालच्या वाळूच्या मैदानांत पोंचायला आम्हांला वेळ लागला नाहीं. लाजाळू खेकड्यांनीं आपल्या बिळांत घुसूनच आमचें स्वागत केलें.

समुद्राच्या मागें हटणाऱ्या पाण्यानें आम्हांला खुणावून विचारलें, 'येथवर यायचें आहे ?' पाण्याचें आमंत्रण नाकारायचें कसें ?

आम्ही निघालों, मधून मधून दोनचार बोटें पाणी पाहून पाय थब्‌थब्वीत निघालों. घटकेंत सूर्याकडे पहाण्याची इच्छा होई, तर घटकेंत मागें वळून किनाऱ्याकडे पहाण्याची. थोडींशीं सुरूचीं झाडें, एक दोन झोंपड्या आणि जकात खात्याचा बावटा चढवण्याचा झेंडा याहून अधिक आकर्षक असें तेथें कांहींच दिसत नव्हतें. त्यापेक्षां पायातळींच्या पाण्यांत ढगांचें प्रतिबिंब पडलें होतें, त्याची शोभाच मनाला अधिक आनंद देत होती. मागें हटणाऱ्या पाण्याच्या मोहिनीनें त्याच्या मागें मागें आम्ही कितीतरी दूर निघून गेलों असतों. पण आमच्यापुढें दुसरा कार्यक्रम आहे हें आम्ही विसरलों नव्हतों आणि वेळेच्या बजेटपेक्षां अधिक मौज येथें करणें योग्य नव्हतें. किनाऱ्यापासून कित्ती तरी दूर आलों त्याचा हिशेब काढण्यासाठीं पावलें मोजीत मोजीत आम्हीं परत आलों. दोन दोन फुटांचीं पावलें टाकीत आम्ही हजार मोजले आणि धावणाऱ्या माणकांच्या रत्नभूमीपर्यंत पोंचलों. वर चढून पहातों तों कर-न-करें पाणी हळूहळू आमच्या पाठून येत होतें, आणि पाण्याला येतांना पाहून कित्येक कोळी रेतीच्या मैदानांत आपलें जाळें खांबांच्या आधारें पसरून उभें करीत होते.

जुन्या गोष्टी पुऱ्या होत, ‘खाल्लें, प्यालें, राज्य केलें–’ या वाक्यानें. आमचीं वर्णनें मोठ्या प्रमाणांत पुरीं होतात ‘प्रार्थना केली आणि मग नास्ता केला’ या निवेदनानें. सोबतच्या एका गृहस्थानें सांगितलें कीं, आजकाल येथें जेव्हां लष्करवाले तोफा डागतात तेव्हां धरणीकंप व्हावा त्याप्रमाणें सगळें गांव हादरून जातें. तयार झालेला प्राणघातक माल बरोबर उतरला आहे कीं नाहीं तें तपासण्याचें ठाणें येथें आहे. आवाज कितीहि मोठा असला तरी क्रांतीनंतर ज्याप्रमाणें शांति स्थापन होते, त्याप्रमाणें आकाशाच्या विवरांत तो विलीन होतो आणि शेवटीं नीरवताच मागें उरते.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

मे, ४१

* * *

# दक्षिणेच्या टोंकास

१

धनुष्यकोटीला मी पहिल्या प्रथम वीस वर्षांपूर्वीं आलों होतों. माझ्या आठवणीप्रमाणें श्री. राजाजींनीं माझ्याबरोबर श्री. वरदाचारींना पाठविलें होतें. वरदाचारी रामायणाचे मोठे भक्त. प्रवासांत रामायणाच्याच रसिक गोष्टी चालल्या होत्या. आम्ही धनुष्यकोटीला पोहोंचलों आणि वरदाचारींचा सनातनी आत्मा श्राद्ध करण्यासाठीं व्याकुळ झाला. एक योग्य ब्राह्मण शोधून काढून ते श्राद्धविधींत गढून गेले आणि बाकीचे आम्ही समोर गर्जना करणाऱ्या रत्नाकराची व महोदधीची भव्य शोभा पहाण्यासाठीं मोकळे झालों.

दोन नद्यांचा संगम अथवा प्रयाग अनेक ठिकाणीं पहावयास मिळतो. संगमाचें काव्य आर्यांच्या मेंदूपर्यंत किंवा हृदयापर्यंत पोहोंचलें कीं त्यांना तेथें यज्ञ-याग करण्याचें सुचायचेंच. यज्ञ-यागासाठींच्या अशा प्रकृष्ट अथवा प्रशस्त स्थानालाच प्र-याग म्हणतात.

दोन नद्या मिळतात तेव्हां बहुधा इंग्रजी Y सारखी आकृति होत असते. महाराष्ट्रांत कऱ्हाडपाशीं दोन नद्या समोरासमोर येऊन मिळतात आणि मग काटकोनांत एका बाजूनें वहातात. इंग्रजी T सारखी पांच कांठांची ती आकृति बनते. दोन नद्या समोरासमोर येऊन एकमेकींला मिठी मारतात म्हणून त्याला प्रीतिसंगम म्हणतात.

गंगेला जेथें यमुना येऊन मिळते तेथें देखील जवळ जवळ T सारखाच आकार होतो. मात्र तेथें गंगा सरळ जाते आणि यमुना कसल्याहि आग्रहा-वांचून आणि थोड्याशा संभ्रमानें गंगेला मिळते.

यमुना प्रथम प्रथम ' आत्मनि अप्रत्यय ' दिसते. पण एकदां का ती गंगेला मिळाली कीं, दोघींच्या उल्हासाला उन्मादाचें भरतें येतें आणि जर एकमेकींत चटकन् मिसळून गेलों तर भेटण्याचा आनंद तेथेंच विराम

पावेल या भयानें दूरदूरपर्यंत त्या दोघी थोड्या अधिक प्रमाणांत एकमेकींत मिसळतच रहातात. धर्मकवींनीं या स्थानाला प्रयाग-राज हें गौरवास्पद नांव उगीच नाहीं दिलें.

पण जेव्हां एखादी नदी समुद्राला येऊन मिळते तेव्हां तो सागर-सरिता-संगमाचा उन्माद शिव-पार्वती-मीलनाइतकाच अद्‌भुतरम्य असतो. त्याचें वर्णन भक्तवृत्तीनें अथवा अपत्यसदृश भाषेंत होऊंच शकणार नाहीं. माणसाला आपण माणूस आहोंत हें विसरून जाऊन आपल्या शक्तीपेक्षांहि उंच उड्डाण करून सागर-सरितेच्या या अ-समान संगमाचें वर्णन करावें लागेल.

पण धनुष्कोटीमध्यें तर हरिहरांच्या मीलनाप्रमाणें दोन समुद्रांचा सागर-संगम आहे. रत्नाकर मानार ( Manar ) च्या बाजूनें येतो. महोदधि पाल्क ( Palk ) च्या सामुद्रधुनीचा प्रतिनिधि आहे. या दोघांना एकदम कसें काय भेटूं द्यायचें ? पृथ्वीनें जणुं काय रामधनुष्याची कमानदार 'कोटी' आडवी ठेवून त्या दोघांना एक कोसपर्यंत भेटूं दिलेलें नाहीं. या बाजूला रत्नाकर उसळत असतो व त्या बाजूस महोदधि गर्जना करीत असतो; आणि वारा सुचवील त्याप्रमाणें दोघे आपापले प्रवाह दौडवीत असतात.

आणि काय त्या दोघांचा खाजगी संकेत ! महोदधीनें हिरवा रंग धारण केला तर रत्नाकर अगदीं निळाभोर बनतो. आणि जेव्हां रत्नाकरावर हिरवट रंग चढतो तेव्हां महोदधि आकाशाला सुद्धां दीक्षा देऊं शकेल अशा गडद निळ्या रंगाची रेलचेल करून टाकतो.

भेटण्याची इच्छा असूनहि भेटतां येत नाहीं असें जोंपर्यंत वाटतें, तोंपर्यंत दोघेजण बेफाम होतात. क्षणोक्षणीं नव्या नव्या तऱ्हेनें आपला अमर्ष व्यक्त करतात. पण एकदां का भेटण्याची मोकळीक मिळाली कीं जणुं काय कसलीच उत्सुकता नव्हती, भेटायचें होतें तें भेटून घेतलें, झालें; अशी शांति आणि सहजता भेटतांना त्यांच्या चेहऱ्यावर आढळून येते—सगळी अस्वस्थता जणुं काय दूर मागें ठेवली असावी त्याप्रमाणें. पाण्याच्या तळापासून पुढें सरलेल्या वाळूच्या बांधामुळें उसळणाऱ्या लाटांच्या दोन रांगा दूरवर दिसतात. एक रांग महोदधीच्या बाजूस पसरलेली आहे आणि दुसरी रत्नाकरामध्यें. परंतु जेथें मधल्या भागांत त्या दोघांचें प्रत्यक्ष मीलन होतें, तेथें तर सरोवराइतकी शांतिच पसरलेली असते. आणि त्यांत नवल तें काय ! अद्वैतांत आनंदाची पराकाष्ठा असूं शकते, पण तेथें उन्मादाला कोठून स्थान असणार ?

धनुष्कोटीच्या टोंकाला उभें राहून एकदां एक गिरकी घेऊन सर्व दिशांनीं पाहिलें पाहिजे. जेथून आपण चालून आलों ती जमिनीची जीभ सोडली तर सर्वत्र महासागराच्या विशाल पाण्याचें क्षितिजाशीं बनणारें वलयच पहावयास सांपडतें.

रंगून किंवा कराचीला जातांना भरसमुद्रांत चहूंकडे समुद्रवलय व क्षितिजवलय एकाकार झालेलें दिसतें, त्याचा कैफ कांहीं कमी नसतो. पाण्याच्या या क्षितिज-विस्तारावर आकाशाचें तितकेंच मोठें पण अनंतपटींनीं उंच, खोल असें झांकण ठेवलेलें आहे आणि या डबेश्वरांत एका लहान जहाजांत बसलेले 'कोटश्च कीटायते'—असे आपण मोत्यांप्रमाणें सांठवले गेलों आहोंत अशी कल्पना मनांत उठल्यावांचून रहात नाहीं. पण जसजसा अधिक विचार करावा तसतशी आपली क्षुद्रता मनावर अधिकाधिक ठसूं लागते.

धनुष्कोटीमध्यें असें होत नाहीं. पृथ्वीशीं आपण निगडित आहोंत, आपल्या पायतळीं मजबूत जमीन आहे आणि ती जमीन हळूहळू विस्तार पावत एका विशाल देशाकडे व खंडाकडे आपल्याला घेऊन जाऊं शकते असा विचार आपल्याला सांत्वना देतो, इतकेंच नव्हे तर प्रचंड आत्मविश्वासाचे अधिकारी बनवतो. जितक्यांदां म्हणून मी धनुष्कोटीला पोहोंचलों आहें तितक्यांदां मला माणूस म्हणून स्वतःविषयीं वाटणाऱ्या आत्मगौरवाचें भान विशेषत्वानें झालें आहे. आणि त्यामुळें तेथें मला माझ्या 'भूमिके'वर दृढ राहून सागराची उपासना करणें शक्य झालें आहे.

जेव्हां जेव्हां मंडपम् सोडून पुलावरून पामबनला पोहोंचलों, तेव्हां तेव्हां 'रघुवंशा'मधलें कालिदासाचें या प्रदेशाचें वर्णन आठवल्यावांचून राहिलें नाहीं. कालिदासाची वर्णनशक्ति जरी माझ्यापाशीं नसली, तरी मी त्याचा समानधर्मा आहें याविषयीं मनांत मुळींच शंका उरत नाहीं. मी कुठें 'कवियशःप्रार्थी' आहें कीं, कालिदासाशीं आपलें नांव जोडण्यांत मला संकोच वाटावा ? मला हंसणाऱ्या टीकाकारांना मी त्यांचेंच एक वचन ऐकवीन—

**पर्वतपरमाणौ च पदार्थत्वं प्रतिष्ठितम् ।**

पण जेव्हां मी धनुष्कोटीपाशीं येतों तेव्हां कालिदासाला विसरून जातों आणि लंकेला कसें जातां येईल याच्या खटपटींत गुंतलेल्या हनुमानाच्या नजरेनें दक्षिणेकडे पाहूं लागतों. ज्या ज्या वानर-यूथ-मुख्यांनीं सेतूची कल्पना काढली आणि अमलांत आणली त्यांच्या नजरेनें तलाईमानारच्या दिशेनें पाहूं

लागतों. आणि अशा रीतीनें कल्पनाविहार करून थकल्यावर चार धामांची यात्रा पुरी करून रामेश्वराला येऊन पोहोंचलेल्या वृद्ध यात्रेकरूंचें हृदय धारण करून कल्पना करूं लागतों कीं, ‘ एक संपूर्ण आयुष्य जवळ जवळ पुरें करून भारतवर्षाइतक्याच विशाल जीवनप्रदेशाचें पर्यटन करून आलों. आतां येथून परतून काय करायचें आहे ? इहलोकींचें काम कसेंबसें पुरें झालें. त्यांत सफलता लाभली असो किंवा विफलता, पण पुन्हां तें अन् तेंच जीवन गिरवायचें नाहीं. आतां त्या सगळ्या जीवनाकडे पाठ फिरवलेलीच बरी. मागें वळून, सिंहावलोकन करून, त्यांच्याकडे पाहण्याचा स्मरण-रस देखील उरला नाहीं. आतां तर सांपरायाचा, पारलौकिक जीवनाचा पारमार्थिक दृष्टीनें विचार करणेंच श्रेयस्कर आहे. ’ अशी विचारपरंपरा मनांत उद्‌भवली. एका रीतीनें मन अस्वस्थ झालें होतें आणि दुसऱ्या रीतीनें परम शांति अनुभवीत होतें.

या खेपेस ज्या वेळीं धनुष्कोटीला आलों त्या वेळीं परंपरेला अनुसरून महोदधींत स्नान केलें. महासागराचें क्षमापन सुद्धां केलें. पण मनांत विचार उठला तो एकच कीं, आतां कांहीं पुन्हां या ठिकाणीं यावयाचें नाहीं. सिलोनला एकदां जावयाचें आहे, पण धनुष्कोटीचें आतां जें दर्शन घेतलें तें अखेरचेंच. असें कां वाटलें तें सांगणें कठीण आहे. पण मन अगदीं तृप्त झाल्याची भावना याच वेळीं मनांत आली खरी.

रामेश्वर-धनुष्कोटीनंतर येते कन्याकुमारी. एक स्थान भव्य तर दुसरें भव्यतर. येथें दोन नव्हे तर तीन सागरांचा संगम आहे. या संगमाचें वातावरण अभेदभक्तीच्या आनंदासारखें आहे. हा येथें हिंदी महासागर संपला, येथें मुंबईचा म्हणजेच पश्चिम समुद्र आणि येथें पूर्व समुद्र सुरू झाला असें सांगतांहि येत नाहीं व मानतांहि येत नाहीं. येथें भारतवर्षाचें दक्षिणेकडील टोंक आहे आणि तिन्ही सागरांनीं त्याला तिन्ही बाजूंनीं वेढलें आहे. संगम आपलें आपण म्हणायचें एवढेंच. सागराच्या गांवीं संगम नांवाची वस्तूच नाहीं. संगमाची कल्पना आपली आहे. सागरांना विचारलें तर ते म्हणतील कीं, जो भेद मुळांत अस्तित्वांतच नाहीं तो नाहींसा झाला असें म्हणावें तरी कसें ! ‘संगमा’ची कल्पना अगदींच चुकीची आहे. त्याला नांवच द्यायचें असेल तर ‘संभवन’ म्हणा. जेथें एकताच नांदत आहे तेथें वाटेल त्या भागाला तुम्ही वाटेल तें नांव देऊं शकतां. नाम आणि रूप यांचें द्वैत येथें फिकें पडतें, विरघळून जातें आणि मग केवळ अद्वैतच आपल्या अखंड मस्तींत गर्जना करूं लागतें.

कन्याकुमारीमध्यें जी भव्यता माझ्या अनुभवास आली तशी भव्यता एक हिमालय सोडून व गांधीजींचें जीवन सोडून अन्यत्र कोठेंहि अनुभवास आली नाहीं.

कन्याकुमारीचें महत्त्व मीं सर्वांत प्रथम ऐकलें होतें गांधीजींच्या तोंडूनच. एखाद्या दृश्याचें वर्णन करीत बसणें त्यांचा स्वभाव नव्हे; पण कन्याकुमारीहून आश्रमांत परत आल्यानंतर त्यांनीं त्या स्थानाचें मोठ्या उत्साहानें माझ्यापुढें वर्णन केलें होतें.

जेव्हां–२७ सालीं, त्यांच्याबरोबर मीं दक्षिण हिंदुस्थानचा प्रवास केला, तेव्हां नागरकोविल गांवीं येतांच त्यांनीं आपल्या यजमानाला खास शिफारस केली कीं, ‘ काकाला कन्याकुमारीला जायचें आहे. मोटारची व्यवस्था करा. ’ त्या दिवशीं त्यांनीं दोनदां चौकशी केली कीं, कन्याकुमारीला जाण्याची व्यवस्था नीट झाली आहे कीं नाहीं ?

पू. बांना उत्साहित करणें मला मुळींच जड गेलें नाहीं. दुसरेहि दोघेजण बरोबर निघाले.

ज्या दृश्याची प्रशंसा पू. बापूजींच्या तोंडून ऐकली होती तें दृश्य पहाण्याची माझी उत्कंठा अगदीं शिगेला पोहोंचली होती. येथें आल्यानंतर तर तिचा कैफच चढला. त्यानंतर जितक्यांदां म्हणून आलों तितक्यांदां पुनःपुन्हां तो न् तोच कैफ मीं अनुभवला आहे.

आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, या कैफाबरोबरच ब्रह्मचर्याविषयींचे देखील गहन विचार मनांत उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहींत. देवी कन्याकुमारीचें हें स्थान आहे या जाणिवेनें असे विचार मनांत उत्पन्न होतात असें मला वाटत नाहीं; आतांपर्यंत कधीं वाटलें नाहीं. स्वामी विवेकानंदांनीं या स्थानीं येऊन असाच कैफ अनुभवला होता, या माहितीमुळें देखील कधींकाळीं मनांत येथें येतांक्षणींच ब्रह्मचर्याचे विचार उद्‌भवले नाहींत. गांधीजींच्या भव्यतेच्या भव्य साधनेशीं पण तो विचार संलग्न आहे असें नाहीं. स्वयंभूपणें तो विचार मनांत उत्पन्न होत असतो.

या वेळीं ( १-५-१९४७ ) तिसऱ्यांदां मी येथें आलों आहें. आल्याबरोबर सर्वांत आधीं समुद्राच्या लाटा, आकाशांतले ढग, पूर्व-पश्चिमेचें क्षितिज आणि पाठीमागचे डोंगर–या सगळ्या मित्रांना पाहून घेतलें.

आज पौष शुक्ल त्रयोदशी आहे. आज चंद्र रोहिणींत किंवा मृग नक्षत्रांत असला पाहिजे. आम्ही मोटारीच्या वेगानें मजल दरमजल करीत कन्याकुमारीकडे धांवत होतों तेव्हांच चंद्र आकाशांत उंच चढून सूर्य मावळला कीं लगेच, वेळ न घालवतां, आकाशाचा ताबा घ्यावा म्हणून टपून बसला होता. संध्येला आपला वर्णविलास पसरविण्याला त्यानें विशेष अवकाश दिला नाहीं. तरी सुद्धां जितका वेळ मिळाला तितक्यांत रंगाचीं अनेक दृश्यें संध्येनें दाखविलींच.

सूर्यास्त पहाण्याची तीव्र इच्छा होती. पश्चिमेकडील ढगांनीं कांहींसें ठपका देत आम्हांला म्हटलें, ' कुणाचा अस्त पहाण्यासाठीं का कधीं कोणी असे व्याकुळ होतात ? खरें पाहिलें तर सूर्याचा अस्तच होत नाहीं. तुम्हां लोकांपुरता प्रकाशाचा अस्त असतो. त्याच्यासाठीं सूर्याला पहाण्यापेक्षां उदय असो कीं अस्त, दोन्ही प्रसंगीं तो जी एकरूपता धारण करतो तिचा रंगच कां पाहून घेत नाहीं ! '

**उदये सविता रक्तो रक्तश्चास्तमने तथा ।**
**संपत्तौ च विपत्तौ च महतां एकरूपता ॥**

हा श्लोक ढगांनीं देखील लहानपणीं पाठ करून ठेवला असावा !

सूर्य जेव्हां क्षितिजाच्या तळाला पोहोंचला तेव्हां ढगांच्या झरोक्यांतून सूर्यप्रकाशाचे लाल किरण वरपर्यंत पसरले. आणि वर पसरले त्याहिपेक्षां दक्षिणेस व उत्तरेस अधिक पसरले. झरोके अधिक नव्हते, पण जे होते ते मोठे होते. त्यामुळें किरणांचे मयूख जणुं काय लाल रंगाचे पट्टे ओढले असावेत त्याप्रमाणें भासत होते. आणि आकाश तर स्वतःच्या वैभवानें वजनदार, प्रतिष्ठित आणि गर्भश्रीमंत दिसत होतें. ही शोभा अपेक्षेपेक्षां अधिक वेळ टिकली, त्यामुळें सारखें तिलाच पहात बसण्याची अभिलाषा कांहींशी तृप्त झाली.

जेथें कुमारीच्या न झालेल्या लग्नाच्या अक्षता विखुरलेल्या आहेत, त्या बाजूच्या खडकावर लाटांचें तांडव पहाण्यासाठीं म्हणून आम्ही जाऊन बसलों. पहातां पहातां संध्या पश्चिमेंत विलीन झाली आणि चंद्राचें राज्य सुरू झालें. आकाशाला घेरून टाकण्याचा ढगांचा मनसुबा पुरा झाला नव्हता, तितक्यांत दक्षिणेंकडील ढगांतून एक मोठा तारा चमकूं लागला.

तो दुसरा कोण असणार ? ते तर अगस्ति महाराज. स्वतः दक्षिण-पूर्व दिशेवर आरूढ होत होते. सुदैवानें यमुना आणि याममत्स्य देखील तिरप्या रेषेंत आकाशांत दिसले. त्यामुळें दक्षिण दिशेचें ध्यान करण्याचें फळ मिळालें. तृप्त झालेल्या डोळ्यांनीं आम्हीं उत्तरेकडे नजर वळवली. तेथें देवयानी ( कॅसियोपिया ) चा M चांगला वर चढला होता. त्याच्या खालीं जवळ जवळ क्षितिजापाशीं एका ताडाच्या झाडाएवढ्या उंचीवर त्या ताडाच्या पानांचेंच आसन करून ध्रुवकुमारानें आम्हांला आपलें सुभग दर्शन दिलें. देवयानी व ध्रुव यांना पहातां पहातां नजर पश्चिमेकडे वळली. तेथें हंस म्हणाला कीं, श्रवण तर केव्हांच अस्ताला गेला आहे. म्हणून पूर्वेकडे नजर वळवली. तेथें ब्रह्महृदयानें सांगितलें कीं, ब्रह्ममंडळाचा विस्तार एवढ्यांतच कुठें तरी असला पाहिजे.

आम्हीं दक्षिणेकडे तोंड फिरविलें. अगस्ति इतका कांहीं वर आला नव्हता कीं त्याच्या झोंपडीची नीट कल्पना करतां यावी. पण व्याध तर दिसायलाच हवा. परंतु व्याध कितीहि तेजस्वी असला तरी ढगांचा जाड थर कसा विंधूं शकणार ! आम्हीं आमच्या नजरेनें ढगांचा थर विंधण्याचा प्रयत्न केला, तेव्हां शंका आली कीं ढगांमध्यें अमुक भाग उजळ दिसत आहे. त्याच्या मागेंच व्याध असला पाहिजे. ढगांच्या पलीकडे व्याधाचा प्रकाश आणि अलीकडे आमच्या नजरेची धडक—या दुहेरी हल्ल्यानें ढग विरळ झाले आणि झिरझिरीत पडद्यामागें नाटकांतलीं पात्रें अस्पष्ट दिसावींत तसा व्याध दिसूं लागला. पहातां पहातां व्याध पूर्णपणें स्पष्ट दिसूं लागला आणि मग व्याध, अगस्ति, यमुना आणि याममत्स्य हे सर्व तेलगु अक्षरांच्या शिरोरेखे-प्रमाणें शोभूं लागले.

आतां मृग दिसेल, रोहिणी झळकेल, प्रश्वन डोकावूं लागेल, अशा आशेनें आम्हीं आकाशाकडे डोळे लावून बसलों होतों. इतक्यांत रजनीनाथानें स्वतःभोंवतीं वलय पसरलें आणि त्या सुवर्ण-वलयाबरोबरच आकाशांत ढगांनीं गर्दी केली. आकाशांत चांदणें पसरलेलें असलें म्हणून काय झालें ! रात्रीचे ढग फारसे आकर्षक वाटत नाहींत. त्यामुळें काळ्याभोर समुद्राच्या गंभीर जळावर नाचणाऱ्या फेसाच्या चमकत्या रेखांच्या रांगा पाहूनच आम्हीं डोळ्यांना मेजवानी दिली.

समुद्राच्या पाण्यावरील आणि आकाशांतल्या ढगांवरील विविध रंगांचें नृत्य पोटभर पाहून घेतल्यानंतर ही गंभीरता इतकी तृप्तिदायक वाटत होती कीं, या तृप्तीबरोबर स्थितप्रज्ञाचा आदर्श गाण्यांत व संध्येची उपासना करण्यांत कांहीं अपूर्व आनंद प्रत्ययास आला. हा सागर पूर्ण आहे. त्याच्यावर पसरलेलें हें आकाश पूर्ण आहे. या दोघांच्या दर्शनानें जीवनाच्या सायंकाळीं हृदयांत उद्भवलेला आमचा उपशम-प्रधान आनंद सुद्धां पूर्ण आहे. आतां या त्रिविध पूर्णतेमधून कांहींहि काढून घेतलें किंवा भरीस टाकलें तरी पूर्णत्वांत कसलाहि उणेपणा येणार नाहीं. मिळवलेली पूर्णता संपुष्टांत येऊं शकते, कारण ती खरी पूर्णताच नव्हे. आत्मज्ञानांतून विकसित झालेली पूर्णता स्थायी असते, कारण तो वारसा सोबत घेऊनच आपण जन्मलों होतों. तेथवर पोहोंचायला विलंब लागला हाच उणेपणा. जें विकसित झालें तें आत्मसात् झालें. आतां तेथून चढणें कसलें नि उतरणें कसलें !

जें विराट आहे, भूमा आहे, बृहत्तम ब्रह्म आहे त्याच्याशीं एकरूप झाल्यानंतर स्वाभाविकपणें जें जीवन मनुष्य जगतो तेंच खरें ब्रह्मचर्य होय. वासना दाबून टाकली तर कधीं तरी ती पुन्हां वर उसळणार. वासना मारून टाकली तर ती भुताप्रमाणें मानगुटीवर बसणार. वासनेला तृप्त करण्याचे बेत केले तर व्यसनाप्रमाणें ती अखंड आपला पिच्छा पुरविणार आणि वाढत जाणार. वासनेला डोक्यावर चढूं दिलें तर मस्तकांत तिचें चक्रच भ्रमत रहाणार. वासनेला तर तोंड देऊन सवाल केला पाहिजे कीं, तूं कोण आहेस ? मित्राचें रूप घेऊन शत्रुता करायला आली आहेस कीं जीवनाला समृद्ध करण्याची साधना म्हणून आली आहेस ? वासनेचें स्वरूप जोंवर स्पष्ट आणि उघडें होत नाहीं तोंवरच ती मोहक वाटते. मोह अस्पष्टतेमुळें, एकांगी दर्शनामुळें निर्माण होतो. वासनेला वश होण्यांत मुख्य हात आंधळेपणाचाच असतो. वासनेचा आंधळा विरोध देखील तिला बळकटीच आणीत असतो. दोन डोळ्यांनीं पाहून वासनेला ओळखतां येत नाहीं. तिला, महादेवाप्रमाणें, तीन डोळ्यांनीं पाहिलें पाहिजे, मग मात्र तिची शत्रुता आपोआप वितळून जाते.

केवळ तपश्चर्येनें वासनेशीं सामना देतां येत नाहीं, उलट प्रज्ञा स्थिर झाल्यानंतर वासनेचा विरोधच करावा लागत नाहीं.

जीवनांत जोंवर अपूर्णतेची जाणीव आहे तोंवर ब्रह्मचर्य सिद्ध झालें असें म्हणतां येणार नाहीं. अपूर्णता स्वतः तशी बाधक नाहीं. लहान मुलांत अपूर्णता

काय कमी असते ! तें निर्मळ भावनेनें जगत जातें आणि त्याची अपूर्णता स्वाभाविक क्रमानें नष्ट होत जाते. अपूर्णतेची जाणीव उत्पन्न झाली कीं लगेच मनुष्य पामर बनतो. सागराप्रमाणें पूर्ण झाल्यानंतर लाटा वाटेल तितक्या उसळोत, पाण्याचा जथा हवा तसा जावो, पण सागराला वहावें लागत नाहीं. तो 'आत्मनि तृप्तः' आहे. त्यामुळेंच त्याला स्वतःची मर्यादा ओलांडावी लागत नाहीं. त्याला मर्यादेचें भानच नसल्यामुळें त्याच्याकडून ती अनायासें, अभावितपणें पाळली जाते. हेंच खरें ब्रह्मचर्य.

प्रार्थना पुरी केली आणि गेल्या चार दिवसांचीं संस्मरणें टिपून ठेवण्याची ऊर्मि मनांत जागी झाली. थोडी नोंद केल्यानंतरच झोंप आली.

दुसऱ्या दिवशीं ब्राह्म मुहूर्तावर भुताप्रमाणें समुद्राकिनाऱ्यावर जाऊन बसलों असतों, पण पावसानें जरा अडविलें. प्रार्थनेच्या वेळीं समुद्राकिनाऱ्यावर जातां जातां पुन्हां आकाशाकडे पाहिलें. दक्षिण दिशा इतकी कांहीं स्वच्छ, सुंदर आणि पारदर्शक होती कीं पूर्वेकडे गोळा झालेल्या ढगांची अगदीं चीड आली. त्यांनीं जर दक्षिणेचें अनुकरण केलें असतें तर काय बिघडलें असतें !

दक्षिणेस त्रिशंकु नीट उभा होता. जय-विजय त्याच्या द्वारपाळाचें काम करीत होते. कॅरीना अथवा खोटा क्रूस एका बाजूला जाऊन पडला होता. यां दोहोंमध्यें कित्येक असे कांहीं सुंदर तारे चमकत होते कीं, जे वर्धा-मुंबईच्या लोकांना सबंध जन्मांत पहायला सांपडणार नाहींत.

उत्तरेकडे सप्तर्षि अगदीं नम्रपणें पसरलेले होते. ध्रुव रात्रीप्रमाणेंच जवळ जवळ जमिनीला टेकायला आला होता. स्वाति आणि चित्रा या चांदण्या माथ्यावर चमकत होत्या. हस्त किंचित् वांकडा झाला होता. पश्चिमेला चंद्र मावळला होता, पण चांदणें अजून आपलें अस्तित्व जाणवून देत होतें. पुनर्वसूच्या होडक्यांतून फक्त प्रश्वनच ढगांचा वेध करून डोकावत होता. एकलकोंडा तारा एकाकी आपल्या स्वभावाप्रमाणें प्रश्वन आणि मघा यांच्याशीं कट्टी करून दूर जाऊन उभा होता. मघाची कोयती फाल्गुनीच्या चौरसाचा सांभाळ करीत होती. पूर्वेकडे विशाखेच्या खालीं गुरु, शुक्र शोभून दिसत होते आणि ते चांगलेच वर आलेले असल्यामुळें बारीक अनुराधा, वाकडी ज्येष्ठा आणि अणकुचीदार मूळ त्यांना आधार देत होते. गुरु, शुक्र जेव्हां पारिजाताच्या जवळ येतात तेव्हां तें त्रिकुट चांगलें शोभून दिसतें आणि मंगळ जवळ नाहीं अशी चुटपूट लागून रहात नाहीं.

हिंदुस्थानाची एक ज्योतिर्मयी व्याख्या मला सुचली आहे. जर कन्या-कुमारीच्या दक्षिणेस आपण गेलों तर ध्रुव दिसेनासा होतो आणि काश्मीरच्या उत्तरेस गेलें तर दक्षिणेकडे अगस्ति दिसत नाहीं. यावरून मीं व्याख्या बनवली आहे कीं, जेथून ध्रुव आणि अगस्ति दोन्ही दिसूं शकतात तोच आपला भारत देश होय.

प्रार्थनेनंतर सर्वच प्राण्यांना करावें लागणारें उदरभरण नांवाचें यज्ञकर्म पोटभर करून घेतलें आणि स्नानासाठीं तयार केलेल्या कुंडांत उतरलों. या नव्या धर्तीवर बांधलेल्या कुंडांत समुद्राचें पाणी अखंड येत असतें. अर्धें कुंड चार फूट खोल आहे, बाकीचें अर्धें आठ फूट. कपडे बदलण्यासाठीं दोन खोल्याहि बांधलेल्या आहेत. अशी नीटनेटकी व्यवस्था धार्मिक पुण्य कमी करणारी आहे असें मुळींच मानतां कामा नये. स्नान करून आम्ही कन्याकुमारीच्या दर्शनाला गेलों. हें मंदिर त्रावणकोरच्या हिंदु राज्यांत असल्यामुळें हरिजनांसाठीं केव्हांचें उघडें झालेलें आहे. मंदिराच्या दरवाजावर सरकारी जाहिरनामा आहे कीं, जे जन्मानें किंवा धर्मानें हिंदु आहेत फक्त त्या सर्वांनाच या मंदिरांत प्रवेश आहे.

मंदिराचें स्थापत्य साधें पण प्रशस्त आहे. दगडाच्या खांबावर छत म्हणून आडवे दगडच ठेवलेले असल्यामुळें मंदिराचा आंतला भाग एखाद्या भुयारासारखा वाटतो. देवीची मूर्ति पूर्वाभिमुख आहे, पण त्या बाजूचा बाहेरचा दरवाजा बंद असल्यामुळें देवीला समुद्राचें दर्शन होत नाहीं आणि समुद्राला देवीचें दर्शन होत नाहीं. बिचाऱ्या बंगालच्या समुद्रानें स्वतः जन्मानें किंवा धर्मानें हिंदु असल्याचा कधींच दावा केला नाहीं ! आणि समुद्र असल्यामुळें त्याला मर्यादाभंग करूनहि मंदिरप्रवेश करतां येत नाहीं !!

कन्याकुमारीची कथा करुण आहे. येथल्या किनाऱ्यावर अक्षतांप्रमाणें विखुरलेली शुभ्र जाड वाळू, माणकांच्या चुऱ्यासारख्या लाल रेतीचा गुलाल आणि शाईशोषक म्हणून वापरण्यांत येणारी काळी रेती, या सर्व प्राकृतिक वस्तु या करुण कहाणीला अधिक करुण बनविण्यांत मदतरूप होत असतात. जगांतलीं सगळींच महाकाव्यें जर शोकान्त असतात, तर हिंदी महासागराची अधिष्ठात्री देवी कन्याकुमारी हिची कथा देखील शोकान्त असणें सर्वथा सुसंगत आहे. करुणरसांत जी सखोलता असते तिच्या द्वाराच जीवनाची खोल प्रतीति होऊं शकते.

दुःखं सत्यं सुखं माया; दुःखं जन्तोः परं धनम् ।
दुःखं जीवन-हृद्गतम् ॥

उथळ जीवनाची समजूत असते कीं, सुख हीच काय ती एक जीवनाची अनुभूति आहे, जीवनाचें सारसर्वस्व आहे. हा भ्रम दूर करण्याचें काम दुःखाकडे सोपविण्यांत आलें आहे. दुःखानें खचून न जातां जो मनुष्य दुःखाचा जीवनाची साधना म्हणून स्वीकार करतो तोच सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन जीवनसमृद्धीच्या आनंदांचा आस्वाद घेऊं शकतो. हा आनंद सुखदुःखाच्या अतीत असल्यामुळें सागराप्रमाणें गंभीर आणि आकाशाप्रमाणें अनंत असतो.

या आनंदाच्या नशिबीं कुणाशींहि विवाहबद्ध होण्याचें लिहिलेलें नाहीं.

* * *

## कराचीच्या वाटेवर [ एका पत्रामधून ]

१०

मुंबईतल्या जागरणाचें उट्टें काढण्यासाठीं लवकर झोपीं गेलों होतों, तो सकाळीं चार वाजतां जागा झालों. स्टीमर डुलत डुलत पुढें जात होती. येथें कुठेंच जमीन दृष्टीस पडत नव्हती. वर आकाश आणि खालीं पाणी. जमीन दृष्टीआड होऊनहि दिवसरात्र मनुष्य समुद्रावरून जहाज हांकारीत प्रवास करतो, हा माणसाचा पाण्यावरील केवढा मोठा विश्वास ! संस्कृतमधें पाण्याला जीवन म्हणतात. तहानेमुळें जें पोटांत उतरतें तें जीवन, आणि वादळामुळें ज्याच्या पोटांत आपल्याला पोंचावें लागतें तें मरण—असे पाण्यासाठीं दोन वेगळे शब्द आपल्या पूर्वजांनीं कल्पिले नाहींत.

प्रार्थनेसाठीं सोबत्यांना उठवावें कीं नाहीं याची भवति न भवति थोडा वेळ मनांत चालली. नंतर मनाशीं नक्की केलें कीं जहाजाच्या पाळण्यांत निजलेल्या या बालकांना उठविण्यापेक्षां आपण एकट्या एकट्यानेंच हलकें प्रार्थना करून घेतलेली बरी. पण मग तिला सामुदायिक प्रार्थना कसें म्हणतां येईल ? मनांत आलें कीं चला जवळचा कॅनव्हासचा पडदा वर करून प्रार्थनेंत साथ देण्यासाठीं कांहीं तारे जागताहेत कीं काय तें पहावें. अनुराधा म्हणाली, 'आम्हीं आतांच उठलों आहोंत, कृष्णचंद्र आतां इतक्यांत येतीलच.'

इतक्यांत दोन शिंगें उंचावून चंद्र म्हणाला, 'येण्याला आणखी शिंगें उगवण्याचें कांहीं बाकी राहिलेलें नाहीं. हा पहा मी आलोंच आहें.' त्यानें डाव्या हातांत पारिजात धारण केला असल्यामुळें आज तो विशेष देखणा दिसत होता. पहातां पहातां अभिजितानें क्षितिजावरून डोकें वर काढलें आणि मग स्वाति, अभिजित आणि पारिजात या त्रिकोणाचा मोठा पिरॅमिड पूर्व क्षितिजावर उभा राहिला. त्या सर्वांना बरोबर घेऊन मीं माझी प्रार्थना पुरी केली.

इतक्यांत चंद्र कांहींसा वर आला आणि आमच्या जहाजापासून ते चंद्राच्या पायापर्यंत एक सोनेरी पट्टा पाण्यावर चकाकूं लागला. मला वाटलें

कीं चंद्रलोकावर जाण्यासाठीं किती सोपा आणि सरळ मार्ग ! जहाजांतून उतरून चालायला लागण्याचीच खोटी ! पण पाश्चात्त्य लोक म्हणतात कीं चंद्रलोकावर वेड्या लोकांचीच वस्ती आहे. तेव्हां पुन्हां मनांत आलें कीं इतकी मेहनत करून शेवटीं तेथें आपले समानधर्मा अथवा जातभाईच जर भेटणार असतील तर इतका त्रास घ्या कशाला !

मला आकाशांतले ढग फार आवडतात. लहान असो किंवा मोठा, पांढरा असो किंवा काळा, सलग असो किंवा चिंध्या चिंध्या झालेला, मला तो आनंदित करतोच. पण रात्रीचे ढग मला मुळींच आवडत नाहींत. त्यांचा आकार आणि रंग दोन्ही आकर्षक असले, तरी ताऱ्यांमधून भुताप्रमाणें किंवा मारेकऱ्याप्रमाणें लपत छपत ते जात असतात तेंच मला आवडत नाहीं.

उषःकालाआधीं आकाश किती रमणीय दिसत होतें ! चांदण्यांत समुद्राच्या लाटा–लाटा कसल्या ? नाजुक वीचिमाला अथवा सागर-बाप्पानें गालांतल्या गालांत केलेल्या मंद स्मितानें त्याच्या चेहऱ्यावर उमटलेल्या सुरकुत्या–बरोबर मोजून घ्याव्या इतक्या स्पष्ट होत्या. पण या विघ्नसंतोषी ढगांनीं मधें येऊन सगळें बिघडवून टाकलें !

आम्ही भरवेगांत पुढें चाललों होतों. उगवतीच्या म्हणजेच आमच्या उजव्या बाजूला जमीन दिसते आहे कीं केवळ भास आहे अशा विचारांत मी पडलों होतों. इतक्यांत एकाएकीं दिवे दिसूं लागले. माझी खात्री झाली कीं आम्ही श्रीकृष्णाच्या द्वारकेपाशीं, येऊन पोहोंचलों आहोंत. थोड्या अंतरावर दिव्यांचा एक दुसरा पुंजका चमकत होता. त्यांत एका दीपगृहाचा प्रकाश एखाद्या वृद्धाच्या स्मृतीप्रमाणें मधून मधून स्पष्ट होत होता. त्यानंतर एका गिरणीच्या धुराड्यांतून धुराची एक शांत नदी क्षितिजापाशीं समांतर वाहूं लागली.

आकाशांतले तारे पाहिले आणि तुझें स्मरण झालें. सकाळच्या उषेबरोबर तुझी काय दोस्ती आहे कोण जाणे ! आपण भेटलों त्यापूर्वींच बोर्डीमध्यें मीं पूर्व दिशेला अनसूया हें नांव बहाल केलें आहे. ' जीवनांतील आनंद ' या पुस्तकांतली ' अनसूया प्राची ' ही नोंद पाहून जा.

३१-१२-३७ ***

# लाटांचा तांडवयोग

## ११

[ कराचीजवळ कीआमारीहून थोडें दूर मनोरा नांवाचें एक बेट आहे. तेथें एक मजेदार देऊळ आहे. बेटावर बहुतांशीं पोर्टट्रस्टचे लोक आणि थोडेंसें लष्कर रहातें. मनोरा बेट कराचीचें लेणें आणि समुद्राचें खेळणें आहे. त्या बेटाच्या दक्षिणेकडील अंगास एक मोठी दरड आहे, तिच्यावर समुद्राच्या लाटा आदळत असतात. आणि तेथून पुढें चांगलें दूरपर्यंत एक मोठी भिंत बांधून लाटांना अडविलें आहे. म्हणून तेथें लाटांचा अखंड सत्याग्रह पहावयास मिळतो. हें दृश्य पहाण्यासाठीं मी अनेकदां तेथें गेलों होतों.

हिंदी साहित्य संमेलनासाठीं या वर्षीं कराचीला गेलों असतां फिरून तें दृश्य बघून आलों. लाटांचा परिणाम त्या दगडांवर जरी घडला नाहीं, तरी हृदयावर तो घडल्यावांचून कसा राहील? हृदय आणि समुद्र दोन्ही सभावतःच ऊर्मिल असतात. ]

कोणतेंहि नैसर्गिक दृश्य पहिल्या प्रथम पाहून मनावर जो परिणाम होतो, तो दुसऱ्यांदा पहातांना होत नाहीं. पहिल्या वेळीं सगळें नवें नवें असतें. अज्ञात जगाचा परिचय करून घ्यावयाचा असतो. पावलोपावलीं आश्चर्य आणि चमत्कृति प्रत्ययाला येत असतात. दुसऱ्या वेळीं त्याच ठिकाणीं जातांना तेथें कशाकशाची अपेक्षा ठेवावी याची माणसाला कल्पना असते. त्यामुळें तितक्या प्रमाणांत चमत्कृतीला कमी वाव असतो. परिचित वस्तु-बद्दल प्रेम उत्पन्न होऊं शकेल, पण आश्चर्य आणि चमत्कृति अपरिचित वस्तूच्याच वांट्याला येत असतात.

अशाच कांहींशा प्रेमपूर्ण, पण औत्सुक्य-रहित वृत्तीनें मी कराचीजवळील मनोऱ्याच्या लाटा पहाण्यासाठीं यावेळीं गेलों होतों. जुन्या, पण तरुण मित्रांशीं या रम्य ठिकाणीं विस्रब्ध वार्तालाप होऊं शकेल ही आशा तर होतीच.

लाटा तर तेथें आहेतच. त्यांना पाहून आनंद होणारच आहे; त्याहून विशेष कांहीं नाहीं अशी मनाची समजूत करून घेऊन मी तेथें गेलों.

गेल्या खेपेस उसळणाऱ्या लाटांचें धवल हास्य पकडून ठेवण्यासाठीं तऱ्हेतऱ्हेचे फोटो घेतले होते. पण त्यांतील एकहि चांगला आला नव्हता. म्हणून त्या लाटांविषयीं मनांत थोडीशी चीड होतीच. तरीसुद्धां वार्तालापासाठीं अनुकूल वातावरण तेथें सांपडणारच आहे असा विश्वास होता.

पण तेथें जाऊन पहातों तों काय ? गेल्या खेपेस जें दृश्य पाहिलें होतें आणि त्याचीं जीं काव्यमय चित्रें मीं मनांत सांठवून ठेवलीं होतीं, त्यांना फिक्कें पाडून पुसून टाकणारें लाटांचें एक अखंड तांडवच एकाएकीं नजरेस पडलें. आतां कसल्या गप्पागोष्टी नि कसला विस्रब्ध वार्तालाप ! मला तर तेथें उन्मत्त करणारी जणुं काय नशाच सांपडली. त्या ठिकाणीं मी एकटा असतों तर त्या लाटांमध्यें शरीर झोंकून देऊन त्यांच्याशीं एकरूप होऊन जाण्याची आंतरिक ऊर्मि मी दाबून टाकूं शकलों असतों कीं नाहीं तें आतां खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं.

एकजण गाऊं लागला कीं, दुसऱ्याला गाण्याची स्फूर्ति होतेच. एका कोल्ह्यानें रात्रीच्या शांततेविरुद्ध बंड पुकारलें कीं सगळेच क्रांतिकारी कोल्हे आपल्या फुफ्फुसांच्या कसरतीची भर त्यांत टाकणारच; इतकेंच काय, अहो ! तरफेच्या सतारीच्या तारा आपले प्राण ओतून छेडून बघा; लगेच खालच्या तारा आपण होऊन आनंदझंकार करूं लागतात. तर मग माझ्यासारख्या निसर्गवेड्या मनुष्याला निसर्गाच्या भव्यतेच्या दर्शनानें निसर्गाशीं असलेल्या आपल्या वेगळेपणाचा विसर पडला, तर मानवी शहाणपणाच्या दृष्टीनें त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं असूं शकेल, पण ती कांहीं जगावेगळी गोष्ट नव्हे.

ज्याप्रमाणें हत्तीची सारी शोभा त्याच्या गंडस्थळांत एकवटलेली असते, किल्ल्याची शोभा त्याच्या गजेन्द्रभव्य बुरुजांत असते, जहाजाची शोभा वरच्या तूतकांत, डेकमध्यें परिपूर्णता पावत असते, त्याचप्रमाणें मनोऱ्याच्या या त्याच्या अंगास ज्या किल्ल्यासारख्या भिंती आहेत त्यांच्यामुळेंच या बेटाला येथें विशेष शोभा आली आहे .आणि समुद्राच्या लाटासुद्धां याच ठिकाणीं वप्रक्रीडा चालवून आपला कंडु शमवीत असतात. हा कंडु-विनोद सतत चालूं राहिला तरीसुद्धां त्याचा कंटाळा येत नाहीं, इतकें हें दृश्य

चिरमनोहारी आहे. पण या स्थळीं माणसानें एक लांबलचक भिंत बांधून समुद्राच्या लाटांना चांगलेंच चिडवलें आहे आणि इतकीं वर्षें झालीं तरी या लाटा आपला अशा प्रकारचा हा पाणउतारा अजून विसरूं शकल्या नाहींत. जेव्हां जेव्हां या पाणउताऱ्याचें, अपमानाचें स्मरण त्यांना होतें तेव्हां तेव्हां फार मोठी सेना घेऊन त्या भिंतीवर चालून येतात आणि खडकांना आव्हान देण्यासाठीं एकमेकांचा पाठपुरावा करीत असतात. काय तो त्यांचा उन्माद ! काय ती त्यांची दृढ प्रतिज्ञा ! काय तें जिवावर उदार होऊन तुटून पडणें ! आज तर त्यांच्या अमर्षाला पूर्ण भरती आली होती. मग काय विचारतां ! जणूं काय वीरभद्र आपल्या सगळ्या शिवगणांना गोळा करून लाटांच्या रूपानें प्रलयकाळाचें नाटक करूं पहात आहे !

एक एक लाट म्हणजे एक उसळणारी टेकडीच. एकीची उत्तुंग शोभा पाहून दुसऱ्या लाटेनें तिचें कौतुकच करायला हवें. पण तसें करण्याऐवजीं दोघीजणी एक होऊन नवीनच उंची गांठतात आणि आसपासच्या लाटांना देखील आपल्या इतकीच उंची गांठण्याला उत्तेजन देत रहातात. आणि हें नृत्य एक क्षणहि न थांबतां अखंड चालूंच असतें. नीट टक लावून या तांडवाकडे पहात राहिलें तर त्यांत एक प्रचंड ताल आढळून येतो. जणूं काय शिवतांडव-स्तोत्राचें प्रमाणिकावृत्त आपली शक्ति अजमावण्यास सुरुवात करतें आणि हृदय भरून येऊन ओघ वाढल्यामुळें पहातां पहातां, प्रमाणिकेचें रूपांतर पंचचामरांत होतें. आणि मग आपला तोरा विसरून जाऊन त्या तालाबरोबर पुष्पदंत देखील तांडवनृत्य करूं लागतो.

ज्या बाजूनें लाटांचा मारा सर्वांत अधिक आहे आणि जेथें आपटणाऱ्या लाटांचा चक्काचूर होऊन, त्यांचा आकाशांत इंद्रधनुष्य धारण करणारा पंखा तयार होत असतो तेथेंच कित्येक पायऱ्या अखंड स्नान करणाऱ्या ऋषींप्रमाणें ध्यान करीत बसल्या आहेत. लाटांचें पाणी त्यांच्या शिरावर पडून हसत हसत आणि गोमूत्रिक-बंध करीत पायऱ्या उतरत जातें. दिल्ली-आग्र्यांत, काश्मीरमधें किंवा म्हैसूरच्या वृंदावनांत माणसानें विलासाचीं जीं साधनें शोधून काढलीं आहेत आणि पाण्याचा प्रवाह श्रावण-भाद्रपदीं धबधब्यांप्रमाणें वाहत सोडला आहे त्याचें येथें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं.

पण कित्येक लाटा आपल्या, त्या लांबलचक भिंतीवर आदळून तिच्या माथ्यावर पाण्याचे लांब सर फेंकण्यांतच मश्गूल झाल्या आहेत. लाट आपटांवी, तिनें भिंतीवर स्वार व्हावें आणि भिंतीच्या रुंदीचा अनादर करून पलीकडे उडी टाकावी, अन् मग या होळीच्या पिचकाऱ्या दुरून आपल्याकडे धांवत याव्यात हें दृश्य सर्व प्रकारें उन्मादक असतें. आणि असा महोत्सव साजरा करण्यासाठीं आलेल्या आपलें स्वागत करण्याची जबाबदारी जणूं काय स्वतःच्या शिरावर येऊन पडली असावी त्याप्रमाणें, या सरांतून आणि त्या पाण्याच्या पंख्यांतून पसरणारें पाण्याचें तुषारजाल सारी हवा थंड करून टाकतें. हें खारट दंव डोळ्यांच्या पापण्यांवर, नाकाच्या शेंड्यावर आणि आश्चर्यानें विलग झालेल्या ओठांवर जेव्हां जमूं लागतें तेव्हां आपल्याला वाटूं लागतें कीं आपण सुद्धां शहरवासी किंवा ग्रामवासी नसून वरुणाच्या सामुद्रिक राज्याची प्रजा आहोंत.

आणि महासागरावरून धांवत येणारा शुद्ध वारा सांगतो–'या दृश्याचा पाहुणचार स्वीकारण्यापुरती शक्ति तुमच्या पामर हृदयांत कोठून असणार ! या, मी तुम्हांला दूरदूरवरून आणलेल्या ओझोनची ( प्राणवायूची ) दीक्षा देतों, शिदोरी देतों. हा ओझोन जेव्हां तुमच्या हृदयांत भरेल तेव्हां तुमचीं फुफ्फुसें प्राणपूर्ण होतील, पवित्र होतील, आणि मगच येथलें वातावरण आणि उदावरण तुम्हांला मानवूं शकेल.' आणि खरोखरच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्राणवायूच्या श्वासोच्छ्वासानें उषेची लाली आली होती. आम्ही आठजण आठहि बाजूंस पुनःपुन्हा पाहूनाहि तृप्त होत नव्हतों.

याच ठिकाणीं आमच्या आधीं एक सिंधी मनुष्य एका मोठ्या खडकावर बसून गुपचूप त्या साऱ्या देखाव्याच्या काव्यांत नखशिखान्त नहात होता. बोलत नव्हता, चालत नव्हता, हसत नव्हता, गात नव्हता. तल्लीन होऊन कांहींसा डोलत मात्र होता. आम्ही गोष्टी करीत होतों; हृदयींच्या उद्गारांना वाचा फोडीत होतों. पण त्याचें त्या गृहस्थाला काय होय ! त्याला माणसांच्या मौजेचा आस्वाद घ्यायचा नव्हता, तर लाटांची मस्ती आपलीशी करायची होती, पिऊन टाकायची होती. एका पायावर दुसरा पाय घेऊन, मांडी मोडून त्यावर हाताचें कोपर टेकवून कलत्या मानेनें स्वारी समुद्राचें ध्यान करीत होती. त्याच्या विंचरलेल्या केसांच्या भांगांत

सीकरबिंदूंची मुक्तामाला चमकत होती. जणूं काय वरुणदेवानें आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला होता !

आम्ही पुन्हां पुन्हां जागा बदलून अनेक दृष्टिकोनांतून तें दृश्य पाहिलें; त्यामुळें लाटांच्या मनांत आमच्याविषयीं सद्भाव उत्पन्न झाला. त्या म्हणूं लागल्या, " या, या, इतक्या दुरून काय न्याहाळत आहांत ? तुम्ही कुणी परके थोडेच आहांत ? जवळ या, मौज करा, लाटांचा आनंद लुटा, हसा, नाचा. हा क्षण आणि अनन्त काळ यांच्यांत कसलाच फरक नाहीं. चला या " लाटांची रीतभात वेगळी असते. आमंत्रण देतांना हात पकडण्याऐवजीं त्या पाय भिजवतात. आम्ही विनयपूर्वक त्या स्वागताचा स्वीकार करून म्हटलें, ' खरोखरच येण्याची इच्छा होत आहे; पण आज नाहीं. अजूनहि आमचें कार्य पुरें झालेलें नाहीं. पुष्कळ बाकी आहे. कितीतरी संकल्प पुरे करायचे आहेत. ज्या भारतमातेच्या चरणांचें प्रक्षालन तुम्ही अखंड करीत असतां, ती भारतमाता अजून स्वतंत्र झालेली नाहीं. माणसामाणसामधला विग्रह अजून शमलेला नाहीं. गरीब आणि दबून गेलेल्या जनतेशीं जोंवर परिपूर्ण एकता साधली नाहीं तोंवर तुमच्याशीं एकरूप होऊन जाण्याचा आनंद लुटण्याचा अधिकार आम्हांला कोठून प्राप्त होणार ? तुम्ही मुक्त आहांत, अखंड कर्मयोगी आहांत. सतत कार्यरत असूनहि कर्तव्य असें तुम्हांला कसलेंच उरलेलें नाहीं. आम्ही तर कर्तव्याचा ढीग नजरेसमोर दिसत असूनहि आळसांत लोळत पडलों आहोंत. आम्हांला तुमच्या पंक्तींत येऊन नाचायचा अधिकार नाहीं. तुम्ही आम्हांला प्रेरणा द्या, तुमची मस्ती आमच्या हृदयांत भरा, तुमचा वेदान्त आमच्या चित्तांत पेरा. मग आम्हांला आमचें कार्य पूर्ण करायला वेळ लागणार नाहीं. आणि तो एक संकल्प पुरा झाला कीं कसलाहि विषाद न बाळगतां, आम्ही तुमच्याकडे धांवत येऊं. तुमच्याशीं अद्वैत साधूं. आणि तसें करायला हीं हाडें, चामडीं व मांस यांनीं कां-कूं केली तर अडचण करणारे कपडे जसे फाडून फेंकून दिले जातात त्याप्रमाणें या शरीराचा चक्काचूर करून टाकूं अन् मग त्या लगद्याला नवे नवे आकार धारण करतांना पाहून हंसूं लागूं. "

" ठीक आहे, तुम्हांला जमेल तेव्हां या. तुम्ही या किंवा येऊं नका, आमचें हें तांडवनृत्य चालूंच रहाणार. जीवनाचा रास पुरा करून गोपी यांत येऊन मिसळल्या आहेत. संसाराच्या फेऱ्यांतून मुक्त झालेले सगळे

साधुसंत, फकीर आणि अवलिये यांत मिसळले आहेत. विज्ञानवीर आणि सत्याचे उपासक यांत मिसळून शांत झाले आहेत. आणि त्यामुळेंच आमचा हा संघ अखंड अशांति माजवून देखील शांतीचें सागर-संगीत ऐकवूं शकतो. ”

“ ऐकूं येत आहे का तें संगीत ! ”

जून, १९३७

* * *

# समुद्राच्या पाठीवर [कलकत्त्याहून रंगूनला जातांना]

१२

संध्याकाळचा चार वाजण्याचा सुमार असेल. आमची अगबोट निघाली. ऊन सौम्य झालें होतें. मंदमंद वारा वहात होता. पाण्यावर नाचणाऱ्या समुद्राच्या चकाकींत पिवळी झांक मिसळूं लागली होती. लाल 'लाल बोयऱ्यां'ना चुकवून आगबोट पुढें निघाली. दोन्ही किनाऱ्यांवर जहाजें दिसत, लहान लहान डोंग्या दिसत. सेंट विल्यम्सचा किल्ला आम्हीं मागें टाकला आणि पुढें निघालों. कित्येक गोद्यांमध्यें लहानमोठीं जहाजें बांधण्याचें काम चालूं होतें. दोन्ही कांठांची जमीन पाण्याच्या सपाटीपेक्षां फारशी उंच नसल्यामुळें दोन्ही बाजूंना दूर दूरवर नजर पोंचत होती. परंतु मन रमावें असें कांहीं तेथलें दृश्य नव्हतें. अशा मोठ्या नद्या जेथें समुद्राला भेटायला जातात तेथले कांठ फार गलिच्छ असतात. भरती-ओहटीमुळें ओल्या झालेल्या चिखलांत धावपळ करणाऱ्या खेकड्यांशिवाय तेथें दुसरें कांहींच दिसत नाहीं.

जसजसे आम्ही पुढें गेलों तसतशी नदी रुंद होऊं लागली. दूरच्या कांठावर जेव्हां पांढरी रेती दृष्टीस पडली तेव्हां मला जरा हायसें वाटलें. सुंदरवनाचा प्रदेश पार करून रात्र पडण्यापूर्वींच आम्ही डायमंड हार्बरजवळ येऊन पोंचलों. आमचें जहाज आतां लाटांबरोबर डोलूं लागलें. थोडा वेळ डेकवर उभें राहून हिंदुस्थानचा किनारा दृष्टीआड होतांना आम्ही पाहून घेतला. पण मग सारखी चक्कर येऊं लागली. त्यामुळें रात्रीचें जेवण करून आम्ही झोंपी गेलों. झोंपण्यापूर्वीं प्रार्थनेच्या अंतीं चि. गिरिधारीनें 'आगुनेर परशमणि छोंआओ प्राणे' हें रवीन्द्रनाथांचें सुंदर पद गायिलें. तें ऐकायला कित्येक लोक गोळा झाले. आणि त्या गायनाच्या प्रतापानें आम्ही आपलीं अंथरुणें ऐसपैस पसरलेलीं पाहून कुणी कुरकुर किंवा ईर्ष्या केली नाहीं.

सकाळीं सर्वांच्या आधीं मी जागा झालों. त्यावेळीं अरुणोदय सुद्धां झालेला नव्हता. आकाशांत चंद्रानें प्रवास करावा त्याप्रमाणें जहाज एकटें

पाणी कापीत चाललें होतें. काय ती त्यावेळची शांति ! आगबोटीच्या पोटांतील यंत्ररूपी हृदय जर आपली धडधड ऐकवीत नसतें तर बाहेरची शांति इतकी उठावदार झाली नसती. चौफेर लोखंडाचा किंवा शिशाचा थंड रस पसरला असावा त्याप्रमाणें समुद्र दिसत होता. मी डेकच्या कठड्यापाशीं जाऊन उभा राहिलों. जहाज जसें डोले, तसें पाणी वर चढे किंवा खालीं जाई. जिकडे पहावें तिकडे लाटाच लाटा. लाटा एकमेकींवर आपटल्या कीं त्यांतून फेस उत्पन्न होई. अंधारांत हा फेस चकाकतो आणि त्या चकाकीच्या वांकड्यांतिकड्या रेखा एकत्र येऊन एक विचित्र नक्षीकाम करून दाखवतात. जहाजाच्या हलण्याचा मेंदूवर परिणाम होतो. त्यांत जर आपण लाटांच्या अखंड आणि सनातन नृत्याची लीला निरखीत बसलों तर मग त्याचा कैफच चढतो.

पुढें गेल्यावर लाटांचें फुटणें थांबलें. सागराचें हृदय ठिकठिकाणीं वर वर चढे व खालीं उतरे. सामान्यपणें लाटांचें उसळणें व फुटणें पाहून मौज वाटते, पण त्यांत तितकेंसें गांभीर्य नसतें. ध्वनिकाव्यांतलें रहस्य शब्दांनीं स्पष्ट केल्यानें त्याचें सौंदर्य जसें ओसरल्यागत होतें तसेंच या लाटा फुटल्यानें होतें. पण जेव्हां या लाटा आंतल्या आंत उसळतात आणि मिसळतात तेव्हां त्यांतली सूचकता विविध, अनंत व अस्पष्ट अथवा अव्यक्त रहाते. अंधार असूनहि हवा स्वच्छ असते तेव्हां आकाश व सागर यांचें मीलनवर्तुळ लक्ष वेधून घेतल्यावांचून रहात नाहीं. क्षितिजाजवळ लाटांचा प्रश्न उरत नाहीं. समुद्राच्या काळेपणाशीं तुलना करूं जातां अंधारून आलेलें आकाश देखील उजळ दिसतें. वेदकालीन ऋषींना जीवन-रहस्य जसें दिसलें असेल तसें रात्रीच्या वेळीं क्षितिज दिसतें. ऋषींना, अनंतकाल व्यापून रहाणारीं आध्यात्मिक तत्त्वें अनंत आकाशांत चमचमणाऱ्या ताऱ्यांप्रमाणें स्पष्ट दिसतात, उलट पार्थिव जीवनांतील भविष्यकाळ त्यांच्या आर्ष दृष्टीला सुद्धां समुद्राच्या अथांग जलविस्ताराप्रमाणें अज्ञात, अव्यक्तच उरतो.

अशाप्रकारें ध्यान व कल्पना यांचा खेळ चालू होता इतक्यांत

**‘ अंधारेर गाये गाये परश तव**

**सारा रात फोटाक तारा नव नव ’**

ही शोभा ओसरूं लागली आणि अरुणोदयानें पूर्वदिशा कोणती हें निश्चित

करून दिलें. रात्र ओसरल्याचें तें काव्य पहाण्यासाठीं मी जीवतरामना * उठवलें. ते उठण्याच्या आधींच गिरिधारी उठला आणि म्हणतो, 'मला दाखवा काय आहे तें, मला दाखवा!' मी त्याला काय दाखवणार? तें कांहीं पाखरूं किंवा जहाज थोडेंच होतें कीं अंगुलिनिर्देश करून दाखवतां यावें? मी त्याला म्हणालों, 'तें समोर लाल आकाश दिसतें आहे तें पहा; थोड्याच वेळांत तेथें सूर्य उगवेल.'

आतां समुद्रानें आपला रंग पालटला. पूर्वेकडे जणूं काय लाल जांभळ्या रंगाचा धबधबा चालू करून पुढें येत होता. आणि आश्चर्य हें कीं पश्चिमेकडे देखील त्याच रंगाचा पडसाद उमटला होता. मात्र पश्चिमेकडे समुद्रापेक्षां आकाशानेंच तो रंग अधिक फासून घेतला होता. पूर्वेकडील प्रसन्नता वाढूं लागली. लाल रंगांत चमक आली, कुंकवाचा शेंदूर बनला आणि शेंदुरांतून सुवर्ण आकारास आलें. मुंबईकडे रहाणाऱ्या आपल्यासारख्या लोकांना पश्चिम किनाऱ्यावरील समुद्रांत होणाऱ्या सूर्यास्ताची शोभा अनेकदां पहायला सांपडते, पण सागर-मंथनांतून लक्ष्मी बाहेर निघावी त्याप्रमाणें उदयमान उषेची वर्धमान शोभा पाहण्याचा आनंद कांहीं औरच असतो. आकाश जसजसें हसूं लागलें तसतशा समुद्राच्या चेहऱ्यावरील आनंद-लज्जेच्या रेखा वाढूं लागल्या. जणूं काय दोन समवयस्क तरुणांत हास्यविनोद चालला आहे.

एकीकडे या उमलणाऱ्या पहाटेचें सौंदर्य पहाण्याकडे मन ओढ घेत होतें तर दुसरीकडे जहाजाच्या हेलकाव्यांनीं डोकें गरगरूं लागलें होतें. एक घटकाभर या लाटा थांबल्या आणि जहाज स्थिर झालें तर किती चांगलें, असें मनांत आलें. पण सागराच्या लाटा आणि माणसाचे मनोरथ कधींकाळीं थांबले आहेत काय? कंटाळून आरामखुर्चीवर पडण्याचा विचार करीत होतों, इतक्यांत बालसूर्याचा घुमट पाण्यांत आंघोळ करून बाहेर निघाला. उगवत्या सूर्यबिंबावर एक विशिष्ट प्रकारची तरलता असते; जणूं काय सूर्य थंड पाण्यामधून कुडकुडत बाहेर पडतो, आणि पाण्यांत जो प्रकाश मिसळलेला असतो तो जणूं काय सूर्याचा धुऊन निघालेला अंगराग होय. सूर्यबिंब संपूर्णपणें बाहेर पडतांक्षणीं मीं सविता नारायणाचा ध्यानमंत्र उच्चारला: 'ध्येयः सदा सवितृ-मंडल-मध्यवर्ती' इत्यादि.

---

* आचार्य कृपालानी

जीवतरामना अशी गंभीरता मुळींच सहन होत नाहीं. ते एकदम उद्गारले, "पुरे करा. कसली वानर-भाषा बोलतां आहांत?" मीं त्यांना म्हणालों, "तुम्ही चुकत आहांत. ही तुमची भाषा नाहीं, संस्कृत आहे संस्कृत." विनोदाच्या भरांत भक्तीच्या उमाळ्याचा चक्काचूर झाला, प्रार्थना कशीबशी पुरी झाली आणि आम्ही जहाजांत रोज रोज ज्याच्यामधून पार पडावें लागतें त्या भयंकर दिव्याची चिंता करूं लागलों. शौचाला जाण्यासाठीं डेकवरून खालीं जावें लागतें. खालच्या मजल्याला एरवींसुद्धां नेहमीं वास मारत असतो; पण सकाळीं तर हा मजला नरकाचा प्रतिस्पर्धी बनलेला असतो. हवा घाणेरडी व खारट. जागजागीं लोकांनीं उलट्या करून ठेवलेल्या. एंजिनच्या वाफेंतून येणारा एक प्रकारचा उग्र दर्प आणि त्या वेळीं खलाश्यांच्या स्वयंपाकघरांतून सुरू झालेली कांदे व मासे यांची दुर्गंधि. या सर्वांच्या मिश्रणांतून पार पडून शौचकूपांत प्रवेश करण्यापेक्षां समुद्रांत उडी घेणें मला कमी त्रासदायक वाटलें असतें. हातची गोष्ट असती तर आम्ही तीन दिवस शौचाला गेलोंच नसतों. पण —

जाऊन आलों खरे, पण आम्हां तिघांचेहि चेहरे असे कांहीं झाले होते कीं एकमेकांकडे पहाण्यासहि मन तयार होईना. एखाद्या टोळीनें भांडण करायला जावें आणि सडकून मार खाऊन परत यावें, कीं मग आपल्या सर्वसामान्य अनुभवाचा उल्लेख देखील कुणी करीत नाहीं; त्याप्रमाणें आम्हीं त्या दिव्याचें नांव देखील काढलें नाहीं.

मीं गिरिधारीला म्हटलें, "चल, जेवायला बस." तो म्हणे, "मला भूक नाहीं." जीवतरामनीं सुद्धां जेवण्यास नकार दिला. मीं म्हटलें, "भल्या माणसांनो, ऊन वाढलें कीं चक्कर येऊं लागेल. मग जेवण्याची तुम्हांला शक्तीच उरणार नाहीं. ही थंड वेळ आहे. पोटभर जेवून घ्या. ऊन तापण्यापूर्वीं सगळें पचून जाईल." गिरिधारी विचारूं लागला, "व्यायाम केल्यावांचून आपोआप पचून जाईल?" मीं उत्तर दिलें, 'आपल्या सर्वांच्या वतीनें हें जहाजच व्यायाम करीत आहे. तेव्हां त्याची तूं चिंता करूं नकोस." गिरिधारीच्या डोक्यांत कांहीं प्रकाश पडला नाहीं. तो माझ्या तोंडाकडे पहातच राहिला. आम्हीं तिघांनीं पोटभर जेवून घेतलें. आमच्या तिघांत जीवतराम पक्के. त्यांनीं फक्त रसाळ फळेंच खाल्लीं. मीं माझ्या आवडीप्रमाणें खाऊन वर एक सबंध लिंबू चोखलें. केळीं उत्तम होतीं.

बिचाऱ्या गिरिधारीला तीं केळीं फार आवडलीं. त्यानें केळ्यांवरच सपाटून हात मारला. एक दोन तासांतच केळीं खाल्ल्याबद्दल त्याला असा कांहीं सक्रिय पश्चात्ताप झाला कीं सबंध प्रवासांत त्यानें पुन्हां केळ्याचें नांव घेतलें नाहीं.

दुपार झाली. मला माझा कमकुवतपणा ठाऊक होता. मीं अंथरूण पसरून हातपाय लांब केले. हातांत दुसरें लिंबू घेतलें आणि डोळे मिटून पडून राहिलों. मद्रासकडील एखादें जहाज कलकत्याला जात असेल, त्याला दुरून पाहून लोक बोलूं लागले, "तें पहा जहाज दिसतें आहे, तें पहा जहाज दिसतें आहे." इतक्यांत दोन्ही आगबोटींनीं भों भों...करून एक-मेकीला सलाम ठोकला. पण मीं आपले डोळे मिटून कल्पनेनेंच तें सगळें दृश्य पाहून घेतलें. गिरिधारीला राहवलें नाहीं. तो चटकन उठून उभा राहिला. तो उभा राहिल्याबरोबर लगेच त्यानें खाल्लेल्या केळ्यांनीं पोटांत रहाण्याचें नाकारलें. तो घाबराघुबरा झाला. मीं झोपल्या झोपल्याच त्याला आल्याचा तुकडा दिला. थोडासा शांत झाल्यानंतर तो माझ्या अंथरुणा-वर येऊन निजला. पण एकदां ढवळलेलें पोट एकदम शांत थोडेंच होणार ?

आम्ही जेथें निजलों होतों तेथें एका बाजूला वरच्या केबिनमध्यें दोन देशी खिस्ती बसले होते. त्यांपैकीं एकाला उलटी होऊं लागली. तो जोर-जोरानें ओकूं लागे तसतसा दुसरा त्याचा मित्र त्याची थट्टा करी. "वन हिगिन्स उलटी करोइंग" वगैरे वगैरे. त्याचे उद्गार त्या दुसऱ्याच्या उलट्यां-पेक्षांहि जोरांत निघूं लागले. गिरिधारी घटकेंत हंसूं लागे नि पुन्हां पस्तावे.

अशा प्रकारें संध्याकाळ झाली. संध्याकाळीं माझ्यांत पुन्हां जीव आला. आम्ही पुन्हां थोडेंसें खाऊन घेतलें, पण तें कुणालाहि अनुकूल पडलें नाहीं. सायंकाळची शोभा मीं बसल्या बसल्याच न्याहाळली. लोक म्हणूं लागले, "आतां आपण काळ्या पाण्याला आलों आहोंत." आणि खरोखरीच पाण्याचा रंग भय उत्पन्न व्हावें तितका काळाकुट्ट दिसत होता. लोक म्हणूं लागले, "आतां अंदमान दिसेल." कुणी म्हणाले, "नाहीं, आपलें जहाज फार दूर आहे. तें बेट दिसणार नाहीं."

संध्येची शोभा कांहीं वेगळीच होती. सकाळचे रंग आणि संध्याकाळचे रंग सारखे नसतात. उदय आणि अस्त सारखे असतीलच कसे ? उदय हा वर्धमान बाल्यकाळ आहे तर अस्त हा विजयी वीराच्या निधनाप्रमाणें विश्रण

असतो. उषेच्या मुखावर मुग्ध हास्य असतें, तर संध्येच्या मुखावर क्षणजीवी उल्लास व विलास असतात. समुद्राचे रंग पुन्हां बदलूं लागले. सूर्य मावळला आणि हळूहळू पहातां पहातां नक्षत्रांचा पारिजात फुलूं लागला.

जहाजावरचे विजेचे सौम्य दिवे तर केव्हांचे चमकूं लागले होते. मला हे दिवे लहानपणापासून अतिशय आवडतात. ते इतके सौम्य असतात कीं त्यांच्यामुळें जवळचें, आसपासचें सगळें कांहीं दिसत असलें तरी ते डोळ्यांना दिपवीत नाहींत. अंधाराला मारून स्वतःचें साम्राज्य स्थापण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्यांत नसते. अंधाराशीं गोड तह करून ' तुम्ही देखील रहा आणि आम्ही देखील रहातों ' अशी जीवननीति या दिव्यांनीं अंगीकारलेली असते. शहरांतले विजेचे दिवे नवख्या शिक्षकाप्रमाणें आपला सगळाच प्रकाश पाजळूं पहातात. आगबोटीवरचे दिवे योग्यांप्रमाणें ' आत्मन्येव संतुष्ट' असतात.

अंथरुणावर पडल्या पडल्या आम्ही या जहाजी दिव्यांच्या गोष्टी करीत होतों. इतक्यांत आमच्या आगबोटीनें भों ओं...करून हंबरायला सुरुवात केली. मी ओळखलें कीं तिला कुठें तरी दुसऱ्या म्हशीचा सुगावा लागला आहे. इतक्यांत दुरून उलट हंबरडा ऐकूं आला. मी उठून बसलों. रात्रींचें समुद्रांत जहाज पहाणें मला फार आवडतें. विजेच्या दिव्यांची एक लांबलचक हार आणि उंच डोलकाठीवरील दोन मोठे लाल दिवे जेव्हां भुताप्रमाणें अंधारांतून धावतांना दिसतात, तेव्हां आपण जणूं काय पऱ्यांच्या दुनियेंत प्रवेश केला आहे असाच भास होतो. जहाजाचा रोख जसजसा बदलत जातो तसतसें समोरील दृश्य नवी नवी शोभा प्रकट करूं लागतें; आणि जहाज जेव्हां दूर जातें आणि अदृश्य होणाऱ्या बेताला येतें तेव्हां तर झोपेमुळें चालण्याच्या स्मृति-विस्मृतीमधील लपंडावासारखेंच तें दृश्य दिसतें. आकाशांतले तारे पहात पहात मी झोपीं गेलों.

तिसरे दिवशीं पाऊस पडूं लागला. जहाजाच्या एका खिस्ती कारकुनानें येऊन आम्हा सर्वांना खालीं जाण्यास सांगितलें. याचें कारण लोकांच्या ध्यानांत प्रथम आलें नाहीं. त्यानें सांगितलें, " एक मोठें वातचक्र आग्नेयेकडून या बाजूला येत असल्याचें समजलें आहे." याला सायक्लोन म्हणतात. सायक्लोनमधें जहाज सांपडणें हें एक मोठें संकटच मानलें जातें. पुष्कळ जहाजें सायक्लोनमुळें बुडून गेलेलीं आहेत. तो कारकून म्हणाला, " अशा रीतीनें डेकवर बसलांत तर प्रसंगीं वावटळीनें उडून जाल." लोक भयानें

एकापाठोपाठ एक खालच्या मजल्यावर गेले. आम्हीं खालीं जाण्याचें साफ नाकारलें. त्यानें आम्हांला समजावण्याचा प्रयत्न केला. आम्ही म्हटलें, " वावटळ आली तर हे मोठमोठे दोरखंड पकडून आम्ही पडून राहूं. "

" पण पावसानें तुम्ही भिजून जाल. "

" भिजून गेलों तर सुकून देखील जाऊं. "

आमचा हेका पाहून कारकून निघून गेला. पाऊस आला. सडकून आला. वावटळीचा घेर तीन चार मैलांचा असतो. सुदैवानें वावटळ आमच्या जहाजापर्यंत आली नाहीं. वावटळीला धूमकेतूप्रमाणें चारी बाजूंस वाऱ्याच्या शेपट्या असतात. अशा एका शेपटीचा तडाखा आमच्या जहाजाला थोडासा बसला. आम्ही चांगलेच भिजून गेलों; त्यामुळें खालीं जाण्याच्या ऐवजीं आम्ही वरच्या केबिनमधें जाऊन बसलों.

शेवटीं रंगून आलें. बंदरावर उतरणाऱ्या लोकांची आणि त्यांना न्यायला आलेल्या इष्टमित्रांची बेसुमार गर्दी झाली. डॉ. प्राणजीवन मेहता आम्हांला नेण्यासाठीं स्वतः बंदरावर आले होते. रंगूनमधें रबरी रस्ते असल्यामुळें गाड्या धावतात तेव्हां फक्त घोड्यांच्या टापांचाच आवाज होतो.

त्या दिवशीं सबंध दिवस आमच्या पायातळींची जमीन डोलते आहे असें आम्हांला वाटत होतें. एका दिवसाच्या आरामानंतरच तीन दिवसांचा समुद्र डोक्यांतून उतरला.

मार्च, १९२७

* * *

# समुद्राच्या सहवासांत [ आफ्रिकेला जातांना ]

## १३

मुंबईहून मार्मागोव्याला जाईपर्यंत नजरेला हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याची सोबत होती. आई दृष्टीआड होत नाहीं तोंवर आपण आईपाशींच आहोंत असा ज्याप्रमाणें बालकाला विश्वास असतो, त्याप्रमाणेंच किनारा दिसत होता तोंवर आपण हिंदुस्थान सोडलें आहे असें वाटत नव्हतें. मार्मागोवा सोडलें आणि आमच्या 'कंपाला' आगबोटीनें स्वदेशाशीं काटकोन करून सरळ भरसमुद्रांत प्रवेश केला. पहातां पहातां हिंदुस्थानचा किनारा अदृश्य झाला आणि चहूंकडे फक्त पाणीच पाणी पसरलें. रात्र पडली आणि आकाशांतील वस्ती वाढली. त्यामुळें एकाकीपणाची भावना बरीच कमी झाली. पण जसजसे आम्ही भूमध्यरेषेकडे जाऊं लागलों तसतशी हवेची आणि ढगांची चंचलता वाढली. मोसम चांगला असल्यामुळें समुद्र शांत होता. लाटा मंद मंद स्मित करून नाहींशा होत होत्या. कित्येक लाटा कच्च्या शिंकेप्रमाणें उठतां उठतांच विरून जात होत्या. समुद्राचा रंग कधीं निळ्या शाईइतका निळसर होई, कधीं काळाकुट्ट; आणि जहाज पाणी कापत जात असतांना दोन बाजूंना त्याचा जो पांढरा फेंस पसरतो, त्याचें अनेक तऱ्हेचें जबरी नक्षीकाम तयार होई. निळ्या रंगाबरोबर त्याची एक तऱ्हेची शोभा, तर काळ्याबरोबर दुसऱ्याच प्रकारची. प्रथम प्रथम समुद्राच्या चेहऱ्यावर लाटांशिवाय आणखी, चामड्यावर असतो तसा सुरकुत्यांचा दाणा दिसत होता. कधीं कधीं त्या सगळ्या सुरकुत्या नाहींशा होऊन पाणी चकाकणाऱ्या भांड्यांप्रमाणें गुळगुळीत दिसूं लागे. जहाज हळूहळू डुलत जात होतें. जहाज आकारानें लहान असतें तेव्हां अधिक डोलतें. मोठीं जहाजें आपली धीरगति सहजासहजीं सोडत नाहींत. लाटा समोरून येऊं लागल्या कीं जहाज नेहमींच्या डोलण्याशिवाय आणखी,

घोडेस्वाराप्रमाणें वर खालीं डोलूं लागतें. अशा डोलण्याला इंग्रजींत 'पिचिंग' म्हणतात. पिचिंग फार वेळ चाललें तर माणसाला तें आवडत नाहीं, सोसतहि नाहीं. पण तें बंद कसें काय पडणार ? झोके घेऊन कंटाळा आला तर झोपाळा थांबवून खालीं उतरतां येतें. पण येथें तर एकदां जहाजांत बसलें कीं आठ दिवसपर्यंत त्याचें डोलणें आणि हिंदकळणें सहन करण्यावांचून दुसरा मार्गच नसतो. एखादे वेळीं, या दोन्ही गतींच्या मिश्रणानें चक्कर तर येणार नाहीं, अशी शंका मनांत डोकावे. आणि मग चक्कर येण्याची शंका मनांत आल्यामुळें देखील चक्कर येऊं शकेल अशी भीति मनांत घर करून बसे. जेवतांना अगदीं चव घेऊन जेवत असलों तरी खाल्लेलें पोटांत टिकेल कीं नाहीं अशी शंका मनांत उरेच. या शंकेचा नायनाट करणें तितकेंसें सोपें नसतें. कसेंहि असो, आम्ही आमचे आठहि दिवस कसल्याहि अपघाताशिवाय अगदीं आनंदांत घालवले. शेवटले चार दिवस जरा जड जातील अशी भीति लोकांनीं घातली होती. परंतु तसलें कांहींच झालें नाहीं. ज्या दिवशीं आम्ही भूमध्यरेषा ओलांडली त्या दिवशीं थोडा वेळ जरा सोसाट्याचा वारा सुटला होता. परंतु त्याचा आमच्यावर तसा कांहींच प्रतिकूल परिणाम झाला नाहीं.

चहुंकडे जेव्हां पाणीच पाणी असतें तेव्हां घटकाभर मनाला गंमत वाटते. नंतर सबंध वातावरण गंभीर बनत जातें. ही गंभीरता ओसरल्यानंतर डोळे कंटाळल्यागत होतात. आपली सबंध सृष्टि या जहाजापुरतीच मर्यादित. विशाल समुद्रापुढें ती किती लहान आणि तुच्छ ! समुद्राच्या दयेवर जगणारी. आणि बाकीचें सगळें पाणी, पाणी व पाणी. इतक्या या पाण्याचा अर्थ तरी काय ? जमिनीवर कितीहि मोठा भूखंड आपण पहात असलों तरी एवढी ही जमीन कशासाठीं उत्पन्न केली असेल असा विचार मनांत येत नाहीं. विशाल आणि अनंत आकाश पाहूनसुद्धां असें वाटत नाहीं कीं एवढें हें आकाश कशासाठीं निर्मिलें गेलें असेल ? परंतु समुद्राचें पाणी पाहून हा विचार हटकून मनांत येतो. जमिनीला सरावलेले डोळे पाण्याचा अखंड विस्तार पहावा लागल्यामुळें कंटाळून जातात आणि शेवटीं थकून क्षितिजावरील ढगाकडे पाहून विसावा घेतात. परंतु पुष्कळदां हे ढग आकारविहीन व अर्थशून्य असतात. आकाश जेव्हां मेघाच्छादित बनतें तेव्हां तर त्याची खिन्नता अगदीं असह्य होऊन जाते. ईश्वराच्या कृपेनें

या कंटाळ्याचा सुद्धां शेवटीं अंत होतो आणि डोळे उघडे असूनहि मन अंतर्मुख होऊन खोल विचारांत गढून जातें.

रात्रीं आणि विशेषतः भल्या पहांटे ताऱ्यांची शोभा पहाण्यासारखी होती. परंतु 'सगळें आकाश तुम्हांला एका वेळीं पाहूं देणारच नाहीं' असें म्हणून ढग लहान मुलांप्रमाणें आकाशाच्या चेहऱ्यावर आपले हात फिरवीत होते. त्यांच्या दयेनें ज्या वेळीं जितका भाग दृष्टीस पडेल तितकाच वाचून घेणें आमच्या हातीं उरे. गुरुवारची सकाळ असेल. जहाज सरळ चालत होतें. आणि त्याच्या मुख्य डोलकाठीमागें अगदीं मागच्या बाजूला शर्मिष्ठा होती. खांबाआड भाद्रपदाचा चौकोन कसाबसा बसवला जात होता. उतरणाऱ्या ध्रुवाच्या शेजारीं देवयानी उगवत होती. पावणेपांच वाजले आणि त्रिकांड श्रवण माथ्यावरील खस्वतिकाच्या स्थानीं विराजमान झाला. हंस, अभिजित आणि पारिजात मिळून एक सुंदर चांदवा तयार झाला होता. डाव्या बाजूला गुरु, चंद्र आणि शुक्र एका रेषेंत आलेले होते. चंद्राचें चांदणें इतकें पुसट होतें कीं त्याला ताकाची उपमा सुद्धां देता येणार नाहीं. समोर नजर टाकली तों डाव्या बाजूला वृश्चिक आपल्या अनुराधा, ज्येष्ठा व मूळ यांच्यासह लटकत होता, तर उजव्या बाजूला स्वातीचा तारा मावळण्याच्या बेतांत होता. बिचारा ध्रुवमत्स्य तर जवळ जवळ क्षितिजांत मिसळून गेला होता. दुसरे दिवशीं चंद्रानें शुक्राशीं दोस्ती केली. रात्रीं सप्तर्षींचें दर्शन घेऊन आम्हीं झोंपीं जात असूं, त्या वेळीं पुनर्वसूची होडी आमच्या बरोबर दक्षिणेच्या प्रवासाला निघालेली पाहून खूप आनंद होई. पुनर्वसूच्या होडींत बसण्याचे चित्रेचे मनोरथ अजून अपूर्णच राहिले आहेत. कदाचित् मघा नक्षत्राचा हेवा तिच्या आड येत असेल! शनिवारीं चंद्र आणि शुक्र यांची शोभिवंत युति पहायला मिळाली. शेवटीं शेवटीं त्या दोघांनींहि निळसर रंग धारण केला होता. भाद्रपदांचें रुंद नरसाळें येथें बरेंच वर चढलेलें दिसत होतें. कालपासून ध्रुव अदृश्य झाला आहे.

सकाळीं जेव्हां उषेच्या चेहऱ्यावर स्वागताचें स्मित उमटतें तेव्हां क्षितिजापुढें रुप्यासारखी चकाकणारी एक किनार तयार होते. नंतर समुद्र प्रसन्नतेनें हसूं लागतो आणि उषेला प्रकट होण्यासाठीं गुलाबी अवकाश देतो.

शनिवारीं समोरून एक जहाज येतांना दिसलें. दिव्यांचा प्रकाश मिचकावून त्यानें आमच्या जहाजाला अभिवादन केलें. आमच्या जहाजानेंसुद्धां

उत्तरादाखल अभिवादन केलें असेलच. हीं जहाजें चांगलीं जवळ आलीं असतीं तर दोघांनींहि हंबरडे फोडले असते. परंतु जेव्हां आवाज पोंचण्याची शक्यता नसते तेव्हां प्रकाशाच्या द्वाराच गोष्टी कराव्या लागतात. चार दिवसांच्या एकान्तवासानंतर आमच्या जहाजासारखीच दुसरी एक सृष्टि जीवनाच्या पटावर विहरतांना पाहून खूपच आनंद झाला. आमच्या जहाजावरील लोक आफ्रिकेचीं स्वप्नें पहात होते. समोरच्या जहाजावरील लोकांना हिंदुस्थानचीं स्वप्नें पडत असतील. प्रत्येक जहाजावरील उतारूंच्या मनोव्यापारांची माहिती गोळा केली तर काय काय गमती आढळून येतील !

जहाजावरील उतारूंच्या तीन जाति असतात. प्रतिष्ठेची अस्पृश्यता भोगणारे ते पहिल्या वर्गाचे उतारू. त्यांना विशेष सुखसोयी मिळत असतात; त्याचें कांहीं नाहीं, परंतु त्यांच्या राज्यांत दुसऱ्या कुणालाहि प्रवेश नसतो हा त्यांचा मोठेपणा. वरच्या डेकचा बराचसा भाग त्यांच्या आरामासाठीं व खेळांसाठीं राखून ठेवलेला असतो. दुसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठीं सुद्धां चांगल्या सुखसोयी असतात. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची माणसांत गणनाच होत नसते. त्यांचीं बिऱ्हाडें वाटेल तिकडे पडलेलीं असतात. आठ दिवसपर्यंत माणसाला पशु-जीवन जगावें लागावें ही कांहीं लहानसान गैरसोय नव्हे.

आणि आतां दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांमधें इंटरचा एक नवा वर्ग काढण्यांत आला आहे. पशु आणि मनुष्य यांच्यामधला तो वानरवर्ग म्हणतां येईल. त्यांत कितीहि गर्दी असली तरी कमींत कमी माणसासारखें झोंपतां तरी येतें.

आम्ही जहाजावर असल्याचें कित्येक लोकांना कळल्यामुळें अनेक लोक आमच्याशीं वार्तालाप करण्यासाठीं येत. त्यांतहि आम्ही सकाळ संध्याकाळ प्रार्थना करतों ही बातमी जेव्हां जहाजाच्या खलाशांपर्यंत पोंचली तेव्हां त्यांनीं आम्हांला खालच्या डेकवर सायंकाळच्या प्रार्थनेसाठीं बोलावलें. जवळ जवळ सगळे खलाशी सुरत जिल्ह्याचे होते. मोठे भजनप्रिय, अनेक भजनें जाणणारे, आणि रागदारींत गाऊं शकणारे. त्यांच्या भजनमंडळीचा थाट जमे, तेव्हां सगळ्या दिवसाचा थकवा आणि जन्मभरच्या चिंता यांचा त्यांना विसर पडे. निळ्या रंगाचा पोशाख परिधान करून सबंध दिवस यंत्राप्रमाणें काम करणारे लोक ते हेच हें ठाऊक असूनहि त्या वेळीं

खरें वाटत नाहीं. त्या लोकांपुढें मीं अनेक प्रवचनें केलीं. त्यांचें जीवन ही देखील एक साधनाच कशी आहे तें त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मीं असेंहि सांगितलें कीं जमिनीवर जशा भिंती उभारतां येतात तशा समुद्रावर येत नाहींत. म्हणून खलाश्यांनीं जातीपातींचीं कुंपणें रचूं नयेत. त्यांनीं आपलें हृदय सागराप्रमाणेंच विशाल केलें पाहिजे.

आम्ही लोक अशा प्रकारें भजनांत तल्लीन होऊन रहात असतांनाच जहाजावरील अनेक गोवानीज लोकांनीं एका रात्रीं स्त्री-पुरुषांचा एक नाच करण्याचें ठरवलें. त्यासाठीं जी वर्गणी गोळा करण्यांत आली त्यांतून आम्हांला वगळण्यांत आलें नाहीं. त्यामुळें आम्ही त्या नाचाचे हक्कपूर्वक प्रेक्षक बनलों !

गोव्याच्या ख्रिस्ती लोकांत युरेशियन जवळ जवळ नसल्यासारखेच आहेत. धर्मानें ख्रिस्ती परंतु रक्तानें शुद्ध हिंदी अशा लोकांनीं पश्चिमेचे जे आचार-विचार आपलेसे केले आहेत त्यांचा परिणाम पहाण्यासारखा असतो. कित्येक जोड्या संयमपूर्वक नृत्यकलेचा आनंद मिळवींत होत्या. कित्येक जोड्या जणूं काय एखाद्या सामाजिक विधींतून पार पडत असाव्यात तशा गंभीर, अलिप्त आणि यांत्रिक पद्धतीनें नाचत होत्या, तर कित्येक जोड्या नृत्याचे नियम मान्य करतील इतकें स्वातंत्र्य घेऊन नृत्यांत आणि एकमेकांत लीन होऊन जात होत्या. एक दोन जोड्या वयाच्या आणि उंचीच्या दृष्टीनें अगदींच विजोड होत्या. त्यांना पाहून इतकी ही विबंटना सहन करण्याची त्यांच्यावर कशी काय पाळी आली असेंच राहून राहून वाटत होतें. अरुंद जागेंत इतक्या सगळ्या लोकांचें नृत्य कसेंबसें पुरें झालें. शेवटपर्यंत जागत बसण्याची आमची तयारी नसल्यामुळें अकरा वाजण्याच्या पूर्वींच आम्हीं झोंपीं गेलों.

आमचें जहाज पश्चिमेकडे, म्हणजेच पृथ्वीच्या दैनंदिन गतीच्या विरुद्ध दिशेनें जात असल्यामुळें आम्हांला जवळ जवळ दररोज घड्याळाचे काटे फिरवावे लागत. जहाजाकडून सूचना मिळे कीं, 'मध्यरात्रीं अर्धा तास कमी करा' अथवा 'एक तास कमी करा.' सृष्टीचा नियम लक्षांत घेऊन आम्ही इतकें नुकसान सोसायला तयार होत असूं. आफ्रिकेला पोंचेपर्यंत आम्ही एकंदर अडीच तास गमावून बसलों. ( बेल्जियन कांगोला जातांना आणखी एका तासाचा बळी द्यावा लागला होता. )

भूगोलाचें विशेष ज्ञान नसलेल्या वाचकांसाठीं इतकें सांगणें आवश्यक आहे कीं रेखांशाच्या दर १५ अंशांनंतर एक तास वाढवावा किंवा कमी करावा लागतो. आणि प्रशांत महासागरांत आशिया व अमेरिका यांच्यामधें जहाजें जेव्हां १८० रेखांशावर असतात तेव्हां त्यांना येतांना किंवा जातांना एक संपूर्ण दिवस वाढवावा किंवा कमी करावा लागतो. या रेखांशाला इंग्रजींत 'डेट लाईन' म्हणतात. ज्याप्रमाणें आपल्याकडे अधिक मास येतो, त्याप्रमाणें 'डेटलाईन' वरून गेल्यानें एक अधिक वार येतो आणि आल्यानें एका वाराचा क्षय होतो.

आठ दिवस झाले, नाहीं वर्तमानपत्र, नाहींत पत्रें, नाहींत भेटायला येणारी मंडळी आणि नाहीं एखादें शहर किंवा गांव. अहो, शपथेला एखादा डोंगर किंवा बेट सुद्धां नाहीं ! अशा स्थितींत तासन् तास अन् दिवसामागून दिवस जेव्हां चुपचाप निघून जात असतात तेव्हां तारखेचें सुद्धां भान रहात नाहीं. आमच्या जहाजाच्या उंचीवरून हिशोब काढून आमच्या आसपास क्षितिजापर्यंत किती समुद्र पसरलेला आहे त्याची मी जहाजाच्या अधिकाऱ्यांकडे चौकशी केली, तेव्हां कळलें कीं आमचे डोळे २५० चौरस मैलांचा समुद्र एका फेऱ्यांत पिऊं शकत होते.

किती गहन ही शांति ! आणि ती सुद्धां डोलणारी, हिंदकळणारी, वाहणारी आणि तरीहि स्थिर अशी शांति; आकाशाच्या आशीर्वादाखालीं उचंबळणारी. Swelling and rolling peace, abiding and abounding. कसें कोण जाणे, पण ही शांति अनुभवीत असतांना माझ्या हृदयांत मानवप्रेम उचंबळून येत होतें. आणि अखिल मानवजातीला स्वस्ति, स्वस्ति, म्हणत होतें. मानवजातीचा इतिहास अजूनहि एकंदरींत पहातां भूषणास्पद बनलेला नाहीं. याच समुद्रानें कितीतरी अन्याय आणि अत्याचार पाहिले असतील, कितीतरी गुलामांचे कढत निश्वास येथल्या हवेंत मिसळले असतील आणि कितीतरी प्रार्थना सूर्य, चंद्र, ताऱ्यांपर्यंत पोहोचूनहि विफल झाल्या असतील. आणि इतकें असूनहि जर मनुष्य-रक्तानें समुद्राचें पाणी लाल झालेलें नाहीं, दुःखी जीवांच्या निश्वासांनीं येथली हवा कलुषित झालेली नाहीं आणि लोकांच्या निराशेमुळें आकाशांतल्या ज्योति मंदावल्या नाहींत, तर मग मनुष्यजातीचा तुटपुंजा इतिहास वाचून माझें मानवप्रेम काय म्हणून संकुचित किंवा फिकें व्हावें ? जर माझे असंख्य दोष विसरून

जाऊन मी माझ्यावर प्रेम करूं शकतों आणि स्वत:विषयीं अनेक आशांचे मनोरे बांधूं शकतों, तर माझींच अनंत प्रतिबिंबें मिळून बनलेल्या मानव-जातीला माझें प्रेम कमी काय म्हणून मिळावें?

अशा भावनेनें आफ्रिकेच्या भूमीवर विषम रीतीनें खेळलें जाणारें मनुष्य-जातीच्या त्रिखंड सहकाराचें नाटक पहाण्यासाठीं आम्हीं मोम्बासाला पोंचलों.

या आठ दिवसांत भरपूर वाचन होईल, भरपूर लिहून होईल अशी जी आशा मनांत बाळगली होती ती सफळ झाली नाहीं. परंतु हे आठ दिवस जीवनाच्या दर्शनानें, चिंतनानें आणि मननानें परिपूर्ण भरलेले होते.

मे, १९५०

* * *

# रेखोल्लंघन

## १४

भूमध्यरेषा ( equator ) पृथ्वीची कटि-मेखला आहे. सिलोनच्या दक्षिणेस एकदां पोंचलों असतां येथवर येऊनहि भूमध्यरेषेपर्यंत पोचूं शकलों नाहीं या विचारानें मन किती अस्वस्थ झालें होतें ! सिलोनच्या दक्षिणेस गाल, देवेन्द्र व मातारा येथपर्यंत जाऊनहि सहाव्या अक्षांशाहून अधिक दक्षिणेस जाऊं शकलों नाहीं. कन्याकुमारीला गेलों तेव्हां तर जेमतेम आठव्या अंशापर्यंतच पोंचलों होतों. चि. सतीश सिंगापूरला होता तेव्हां एकदां तेथें जाण्याची इच्छा झाली होती—त्याला भेटण्यासाठीं खास नव्हे, तर भूमध्य-रेषा ओलांडतां येईल या लोभानें. परंतु जेव्हां नकाशांत पाहिलें कीं सिंगापूर देखील भूमध्यरेषेच्या अलीकडेच आहे तेव्हां तो उत्साह राहिला नाहीं.

परंतु भूमध्यरेषेंत असें काय आहे ? जमिनीवर किंवा पाण्यावर पांढरी, काळी किंवा पिवळी रेघ देखील ओढलेली नाहीं. तरीसुद्धां भूमध्यरेषेचा प्रदेश काव्यमय आहे यांत शंका नाहीं.

या प्रदेशाचें स्मरण करतों तेव्हां मला शांतादुर्गा व अर्धनारीनटेश्वर यांचें स्मरण होतें. शांतादुर्गा एकीकडे शुभंकरी शांता आहे तर दुसरीकडे भयंकरी दुर्गा. महादेवाचेंहि तसेंच आहे. त्याचें दक्षिण मुख सौम्य शिव आहे आणि वाम मुख उग्र रुद्र आहे. अर्धनारीनटेश्वर एकीकडे स्त्रीरूप आहेत तर दुसरीकडे पुरुषरूप. आपल्या समन्वयवादी पूर्वजांनीं हरि-हरेश्वराची कल्पना देखील अशाच प्रकारें केली आहे. शिव आणि विष्णु दोघे मिळून हरि-हरेश्वर बनले आहेत.

भूमध्यरेषेवर अशाच प्रकारें परस्परविरोधी ऋतूंचें मीलन आढळतें. उत्तर गोलार्धांत जेव्हां उन्हाळा असतो तेव्हां दक्षिण गोलार्धांत हिंवाळा. एकांत जेव्हां वसंत असतो तेव्हां दुसऱ्यांत शरद. भूमध्यरेषा एक असा

प्रदेश आहे कीं जेथें उन्हाळा व हिंवाळा हस्तांदोलन करूं शकतात. आणि प्रौढ शरद् सुद्धां बाल वसंताशीं खेळूं शकतो.

अशा ठिकाणीं जर अखंड शांतीच नांदत राहिली तर तेथलें जीवन अळणी, मिळमिळीत बनून जाईल! खेळकर निसर्गाला हें कसें काय सहन व्हावें? गंगा-यमुनेच्या धवल-श्यामल पाण्याच्या संगमानें सुद्धां अविरत नाचत रहावें, आणि उत्तर-दक्षिणेच्या मीलनानें नृत्य करूं नये, हें कसें काय चालेल?

आज भूमध्यरेषेवर आलों आहोंत, येथें वाऱ्याचें अखंड नर्तन चालू आहे. चंचलता जर कुठें स्थिर झाली असेल तर ती येथेंच. येथें प्रकृति एका हातानें उन्हाळ्याला थोपटीत असते तर दुसरा हात हिंवाळ्याच्या पाठीवर फिरवीत असते.

भूमध्यरेषा म्हणजे तराजूंत घालून तोललेला पक्षपातरहित न्याय. उत्तर ध्रुव दिसावा आणि दक्षिण ध्रुव दृष्टीस पडूं नये, असें येथें चालणार नाहीं. येथल्या आकाशांत मृग नक्षत्राच्या पोटांत घुसलेला बाण इकडे किंवा तिकडे ढळूं शकत नाहीं. सरळ पूर्वेकडे उगवून खस्वतिकाला (zenith) स्पर्श करून तो पश्चिमेकडे मावळतो. हाच एक असा धन्य प्रदेश आहे जेथें खस्वतिक विषुववृत्तावर विराजमान होऊं शकतें. ज्याप्रमाणें जमिनीवर भूमध्यरेषा असते, त्याचप्रमाणें आकाशांत विषुववृत्त (celestial equator) असतें. इतकें लिहीत आहें इतक्यांत आमचें रंगीत अभिनंदन करण्यासाठीं एक इन्द्रधनुष्य समोर उजवीकडे प्रकट झालें आहे. आतां तृप्ति झाली. परंतु सगळ्या मानव-तृप्तींप्रमाणें ही तृप्तीदेखील अल्पजीवि नसली तर पोट फुटून जावयाचें. आणि पोट फुटलें नाहीं तर डोळे फुटून जायचे. हें कसें काय परवडणार? आतां दक्षिण गोलार्धांत काय काय पहायला-जाणायला मिळणार, काय काय नवीन अनुभव मिळणार त्याचीच उत्कंठा जागूं लागली आहे. भूमध्यरेषा पहिल्यांदा ओलांडूं शकलों त्याची धन्यता नेहमींच वाटत राहील.

मे, १९५०

* * *

# जपानला जातांना

१६

आगबोटींतून समुद्राचें जें दर्शन होतें तें प्रत्यक्ष आणि विमानांतून होतें तें परोक्ष, अशी एक भावना माझ्या मनांत घर करून बसली आहे. आगबोटींतून तर पाण्याचा दोनशें तीनशें मैलांचाच विस्तार दिसत असतो. आणि विमानांतून हजारों मैलांचा विस्तार एकदमच दिसत असतो. ही विश्वरूपी धन्यता अनुभवायला मिळत असतांना देखील समुद्राच्या लाटा एवढ्या उंचीवरून अगदींच निर्जीव दिसतात हेंच मला आवडत नाहीं. दहा वीस हजार फूट उंचीवरून समुद्रकिनाऱ्यावरील प्रचंड लाटा देखील इतक्या गरीब दिसतात कीं समुद्राविषयीं दयाच वाटते.

तसें पाहूं गेल्यास विमानांतून जेव्हां जमीन दिसायचीच बंद होते आणि विमानाखालीं व आसपास, क्षितिजाच्या वलयापर्यंत, केवळ पाणीच दिसतें तेव्हां आपल्या जगाविषयींचे निरनिराळ्या प्रकारचे विचार मनांत येऊं लागतात. कुठें म्हणजे कुठेंच जमीन दिसत नाहीं आणि ज्याच्या पोटांत आपलें हें विमान किंवा आपण जगूंच शकलों नसतों असा पाण्याचा विस्तार दिसतो तेव्हां जमीन-वासी या नात्यानें माझें मन विनाकारण अस्वस्थ होत असतें.

आपण जमिनीवर असतों तेव्हां वरचें आकाश आपल्याला मोकळेपणाचें तसेंच स्वातंत्र्याचें आश्वासन देत असतें. येथें तेंच आकाश समुद्रावर ठेवलेल्या एखाद्या झाकणासारखें दिसतें आणि कोणतेंच आश्वासन देऊं शकत नसतें.

मुंबईहून भावनगरला जातां-येतांना जो समुद्र दिसतो तो तर आपला घरचाच आहे. त्याच्याविषयीं आत्मीयता बांधली गेली आहे एवढ्याचसाठीं तो भव्य वाटत नाहीं. आफ्रिकेंतील अमरसर ( लेक व्हिक्टोरिया )-वरून आम्ही गेलों होतों तेव्हां तें सरोवर अगदींच उथळ वाटत होतें.

मोंबासाहून लिंडीपर्यंत तुकड्यातुकड्यांनीं गेलों तेव्हां महासागर व महाखंड यांच्यामध्यें जगू हस्तांदोलन चाललें आहे असें वाटत होतें. दारेसलामहून झांझिबारला गेलों त्या वेळीं ‘ चढलों आणि उतरलों ’ या अनुभवामुळें आपण समुद्राचा जणूं अपमान करीत आहोंत असें वाटत होतें. गंगोत्रीला गंगेच्या अरुंद प्रवाहावर उजव्या किनाऱ्यावर एक पाय व डाव्या किनाऱ्यावर दुसरा पाय ठेवल्यानें जसा त्या प्रवाहाविषयींचा आदर वाढत नसतो तसेंच दारेसलामहून झांझिबारला जातांना समुद्राविषयीं वाटत असतें.

आदिसअबाबाहून एडनला जातांना आम्ही आकाशांत अशा एका ठिकाणीं पोहोंचलों होतों कीं एका बाजूनें आफ्रिकेचा किनारा आणि दुसऱ्या बाजूनें आशियाचा किनारा दिसत होता. तेथें देखील भूमीच्या प्रमाणांत पाण्याला विशेष महत्त्व आहे असें वाटत नव्हतें.

भूमीची अल्पता सर्वप्रथम ध्यानांत आली ती, जेव्हां कायरोहून मुंबईला येतांना अठरा हजार फूट उंचीवरून संपूर्ण सौराष्ट्र एका दृष्टींत मी सामावूं शकलों तेव्हां.

समुद्राची भव्यता तर इराणच्या आखातांत, भूमध्य समुद्रांत आणि लंडनहून लिस्बनला जातांना अटलांटिक महासागरांत दृष्टीला पडली. त्यानंतर पश्चिम आफ्रिकेला जातांना दक्षिणेला जो अटलांटिक महासागर दिसला त्यानें तर माझें ‘ मन हरीज लीनो ’—मन ओढूनच घेतलें.

पण माझी भक्ति मिळवूं शकला तो मात्र प्रशांत महासागरच. कशामुळें कोण जाणें ! त्याच्या विशेष खोलीमुळें ? मोठ्यांत मोठ्या विस्तारामुळें ? कीं त्याच्या प्रसन्न सूर्योदयामुळें ? मी सांगूं शकत नाहीं. पण प्रशांत सागर पाहिल्याबरोबर वाटतें कीं माणसानें तो पाहून नम्र झालें पाहिजे.

या पृथ्वीवर जमिनीहून तीस पटींनीं जास्त पाणी आहे. या पाण्याच्या आंत पसरलेल्या जीवसृष्टीला आपण गौण कां मानावें, असा विचार मनांत आला पण टिकला नाहीं. आपण आकाशाशीं जेवढी मैत्री केली आहे तेवढी समुद्राशीं किंवा त्याच्या खोलीशीं केलेली नाहीं, एवढें तर कबूल केलेंच पाहिजे. आपण वातावरणांतील प्रजा आहोंत, उदावरणांतील नव्हे.

जुलै, १९५७

* * *

## सागर-सरितेचा संगम

१६

लहानपणीं राजा भोज आणि कालिदास यांच्या गोष्टी वाचावयास मिळत. भोज राजा विचारतो, 'ही नदी अशी रडत कां आहे ?' नदीचें पाणी दगडांतून वाहतांना खळखळाट करीत असेल. राजाच्या मनांत आलें, कीं चला कवीच्या पुढें एक कल्पना फेंकूं या. म्हणून त्यानें वरील प्रश्न विचारला. लोककथेंतील कालिदास लोकमानसाला रुचेल असेंच उत्तर देणार. तो म्हणाला, 'रडण्याचें कारण काय विचारतां महाराज ? ही मुलगी माहेराहून सासरीं चालली आहे. मग रडणार नाहीं तर काय करेल बिचारी ?' त्यावेळीं मनांत विचार आला, 'सासरीं जायला नाहीं आवडत तर जावें कशाला ?' कुणीतरी उत्तर दिलें, 'मुलीचा जन्म सासरीं जाण्यासाठींच असतो.'

नदी जेव्हां आपल्या पतीला, सागराला जाऊन मिळते तेव्हां तिचा सगळा नूर पार बदलून जातो. त्या प्रवाहाला नदी म्हणून ओळखणेंहि कठीण होऊन बसतें. साताऱ्याजवळ माहुलीपाशीं कृष्णा आणि वेण्याचा संगम पाहिला होता. पुण्याला मुळा आणि मुठेचा, पण नदी-सागराचा संगम पहिलावहिला पाहिला डो कारवारला—उत्तरेकडील सुरूच्या बनाच्या टोंकाला. आम्ही दोघे भाऊ समुद्रकिनाऱ्यावरील वाळूंत खेळत खेळत, फिरत फिरत पुढें जात होतों. रोजच्यापेक्षां खूप दूर गेलों आणि अकस्मात् एक सुंदर नदी समुद्राला येऊन मिळतांना पाहिली. दोन नद्यांच्या संगमापेक्षांहि नदी-समुद्राचा संगम अधिक काव्यमय असतो. दोन नद्यांच्या संगमाचा आनंद गूढ-शांत असतो; याच्या उलट सागर-सरिता जेव्हां एकमेकांना भेटतात तेव्हां दोघांतहि फक्त उन्मादच दिसून येतो. आणि त्या उन्मादाचा कैफ आपल्यालाहि अचूक चढल्यावांचून राहत नाहीं. नदीचें पाणी शांत आग्रहानें समुद्राकडे सरकत असतें; इकडे आपली मर्यादा कधींच न सोडण्याविषयीं

विषयीं नांवाजलेल्या समुद्राचें पाणी चंद्राच्या चिथावणीनें घटकेंत नदीला वाट करून देतें तर घटकेंत टक्कर देतें. नदी आणि समुद्र यांचा एकमेकांविरुद्ध असा सत्याग्रह चालू असतांना अनेक प्रकारचीं दृश्यें पहावयास मिळतात. समुद्राच्या लाटा नदीच्या पाण्याला तिरप्या कापीत येऊं लागल्या म्हणजे पाण्याचा एक फवारा या टोंकापासून त्या टोंकापर्यंत दौडत जातो. कांहीं ठिकाणीं पाणी गोल गोल फिरून भोंवरे निर्माण करतें. समुद्राचा जोर वाढला कीं नदीचें पाणी मागें हटत जातें. अशा वेळीं दोन्ही बाजूंच्या कांठांवर त्याचा मारा जोराचा असतो. नदीच्या गतीची ही विपरीत दशा पाहून त्याचा लाभ घेण्यासाठीं टपलेल्या मतलबी होड्या उत्साहानें आंत घुसतात. त्यांना ठाऊक असतें कीं या भाग्याच्या भरतीबरोबर जितकें आंत जातां येईल तितकें खरें! आणि नंतर जेव्हां समुद्राची ओहोटी सुरू होते आणि सागराच्या लाटा आपला विरोध सोडून बाहू पसरून नदीच्या पाण्याचें स्वागत करतात, तेव्हां या स्वार्थसाधु होड्यांना आपली त्रिकोणी पगडी फिरवावयास उशीर लागत नाहीं. वारा कोणत्याहि का दिशेला वाहीना, जोंपर्यंत तो समोरून उलटा वाहत नाहीं, तोंपर्यंत त्यांतून कोणता ना कोणता फायदा उकळण्याची हातोटी या वैश्यवृत्ति होड्यांत असतेच. त्यांच्या पगडीची अर्थात् शिडाची बांधणी आणि रचनाच अशा प्रकारची केलेली असते.

आम्ही पोंचलों तेव्हां होड्या अशाच रीतीनें नदींत प्रवेश करीत होत्या. पण त्या सागरी फुलपांखरांना निरखत बसण्यांत आम्हांला गोडी नव्हती. आम्ही आपले संगमाबरोबर सूर्यास्त कसा काय शोभून दिसतो तें पहाण्यांत गर्क झालों होतों. सोनेरी रंग तसा तर सर्वत्रच शोभतो; पण हिरव्या रंगाबरोबर त्याची बादशाही शोभा कांहीं औरच असते. उंचउंच झाडांच्या शेंड्यावर जेव्हां संध्येचे सुवर्णकिरण आरोहण करतात, तेव्हां ही मानवसृष्टि नसून पऱ्यांच्या दुनियेंत आपण वावरत आहोंत असा भास होऊं लागतो. समुद्र तर अगदीं तुडुंब भरलेल्या सुवर्णरसाच्या सरोवरासारखा शोभूं लागला. आम्ही ही शोभा पाहून तृप्त झालों; किंवा खरें सांगायचें म्हणजे जसजशी ही शोभा पहात गेलों तसतसें हृदय अधिकाधिक अस्वस्थ होत गेलें. सौंदर्यपानानें आम्ही जणूं गुदमरून जात होतों.

सूर्यास्तानंतर रंग ओसरूं लागले, सौम्य झाले. आम्हीहि भानावर आलों आणि परतण्याचा विचार केला. पण आतां मागें जाण्याची सोय

नव्हती. म्हणून आम्ही नदीच्या कांठाकांठानें; वरच्या बाजूस निघालों. तेथेंहि नदीचें पाणी दोन्ही अंगांस फुगत चाललें होतें—रेड्याच्या पाठीवरील पखाल पाणी भरतांना फुगते तसें. आम्ही जसजसे वर चाललों तसतसें पाणी अधिकाधिक शांत दिसूं लागलें. अंधारहि वाढत चालला होता. या कांठावरून त्या कांठावर येरझाऱ्या करणारी एक होडी चुपचाप कोपऱ्यांत पडून होती. आणि खेड्यांतील मजूर लंगोटीच्या दोरींत मागल्या बाजूस एक चक्र ओवून त्याला कोयता लटकावून चालले होते. या लोकांचा पोशाख म्हणजे एक लंगोटी आणि एक जाकीट. नदी पार करावयाची असेल तेव्हां जाकीट डोक्यावर घेतलें कीं काम भागलें. निसर्गाचीं बालकें ! जमीन काय आणि पाणी काय दोन्ही त्यांना सारखींच.

घरीं जाण्याची घाई फक्त आम्हांलाच होती असें नाहीं. या खेडवळ लोकांनाहि घाई असावीसें वाटत होतें आणि नदीच्या कांठावरून तुरूतुरू धांवणाऱ्या खेकड्यांनाहि आमच्याइतकीच घाई होती. रात्र पडली आणि आम्ही लगबगीनें घरीं आलों. पण कधींतरी या नदीच्या कांठाकांठानें आंत चांगलें दूरपर्यंत जाऊन आलें पाहिजे असा विचार मनांत स्फुरल्यावांचून राहिला नाहीं. हातांत एखादा कांदा किंवा कोबी येतांच त्याचे पापुद्रे उकलून पहाण्याची जशी इच्छा होते, त्याचप्रमाणें नदी पाहिली कीं तिच्या उगमाकडे जाण्याची इच्छा मनुष्याला झाल्यावांचून रहात नाहीं. उगमाचा शोध हा एक सनातन शोध आहे. गंगोत्री, जम्नोत्री आणि महाबळेश्वर किंवा त्र्यंबक यांचा शोध लागला तो अशाच तऱ्हेनें.

लहानपणींची ती इच्छा थोड्याच वर्षांपूर्वीं पुरी झाली. श्री. शंकरराव गुलवाडी आम्हांला एक केन्द्र पहाण्यासाठीं म्हणून वरच्या दिशेनें दूरवर घेऊन गेले. या प्रतीप-यात्रेच्या प्रसंगींच कवि बोरकरांची कविता ऐकल्याचें आनंददायक स्मरण कायम आहे.

१९३४.

* * *

# सार्वभौम जीवन-सागर

१७

संस्कृत भाषेनें पाण्यासाठीं जीवन शब्द वापरला यांत खरोखर मोठें औचित्य आहे. या पृथ्वीवर जमिनीपेक्षां पाण्याचा भाग अधिक आहे ही तर गोष्ट खरीच. पाण्यावांचून प्राणी जगूं शकत नाहींत हेंहि सर्वांना माहीत आहे. पण त्याहून मोठी गोष्ट म्हणजे पृथ्वीचा तप्त गोल थंड झाल्यानंतर आणि बरेचसे ज्वालामुखी शांत झाल्यानंतर जीवसृष्टीचा जो प्रथम प्रादुर्भाव झाला तो पाण्यांतच.

आपण सामान्यपणें जीवसृष्टीचा विचार करीत असतांना प्रथम वनस्पति आणि नंतर प्राणी असा विकासक्रम ठरवितों. पण खरोखर तसें नाहीं. विज्ञानवेत्त्यांचें म्हणणें आहे कीं जीवसृष्टीचा प्रारंभ पाण्यामध्यें कीटाणुपासून झाला. ते इतस्ततः पसरलेले होते. त्यांच्यासाठीं समुद्रांत आणि सर्वच जलाशयांत एक प्रकारची वनस्पतिसृष्टि उत्पन्न झाली. तेव्हां जीवसृष्टीचें आद्यस्वरूप जलचराच्या रूपांत होतें असें म्हणावें लागतें.

जीवसृष्टि स्वतःला हवा असलेला आहार प्रथम प्रथम चिखलासारख्या निर्जीव पदार्थांतून मिळवूं लागते. पण पुढें जीवसृष्टि परस्परावलंबनाचें महत्त्व समजून विकास करूं लागते. प्राणिजगत वनस्पतीवर पोट भरतें हें आपल्याला ठाऊक आहे. पण केव्हां केव्हां वनस्पति स्वतःच्या आटोक्यांत आलेल्या प्राण्यांना चोखून गिळंकृत करून आत्मसात करते याची माहिती फार थोड्यांना असेल. आपल्या लोकांनीं हा क्रम ओळखून सिद्धान्त बांधला: 'जीवो जीवस्य जीवनम्'. एक जीव दुसऱ्या जीवाला खाऊन जगत असतो. हा आहे सरळ अर्थ वरील वचनाचा. पण त्याबरोबर हेंहि दिसून येतें कीं एकमेकाला खाऊनच सृष्टीचा विकास होत आला आहे. प्राणिसृष्टि नसेल तर वनस्पतिसृष्टीचा विकास कुंठित होईल आणि वनस्पतिसृष्टि नसेल तर

प्राणिसृष्टीला जगणें अशक्य होईल. हीच गोष्ट जैन शास्त्रांत पुढील शब्दांनीं व्यक्त केली आहे. ' परस्पर उपग्रहो जीवानाम् । '

थोडेंसें निरीक्षण करून आणि शेंकडों वर्षें तें तसेंच आहे याचा अनुभव घेऊन आपण जीवनाचे सिद्धान्त ठरविले. आणि आपण मानून चाललों कीं सृष्टीचें रहस्य आपल्याला समजलें. बाह्य सृष्टीविषयींची आपली जिज्ञासा बेताचीच. पण पश्चिमेचा माणूस जेव्हां विज्ञानाच्या मागें लागला तेव्हां त्याच्या जिज्ञासेला अंतपार राहिला नाहीं. पश्चिमेकडील मनुष्यानें निरीक्षण, परीक्षण आणि तऱ्हेतऱ्हेचे प्रयोग करून सृष्टीचें रहस्य शोधतां शोधतां खोलांत शिरण्याचें ठरविलें. आज विज्ञानवेत्ते लोक पाण्यांतील जलचरसृष्टि, जमिनीवरील भूचरसृष्टि आणि आकाशांत उडणारी खेचरसृष्टि यांचें ज्ञान मिळविण्यांत कसलीच कुचराई करीत नाहींत. प्राण्यांच्या शरीरांतील रक्तांत पोहणारे सूक्ष्म कीटाणु कसे असतात, त्यांच्यांत देखील रोगवर्धक आणि रोगनाशक कीटाणूंचें युद्ध कसें होतें हें सर्व मनुष्य आतां शोधूं लागला आहे.

पृथ्वीवरीक घटकद्रव्यें किती आहेत याचा शोध मनुष्य लावीलच. पण आकाशांतील ग्रहनक्षत्रतारे यांच्या प्रकाशाचें सूक्ष्म पृथक्करण करून तेथें कोणकोणते धातु आहेत, कोणते नाहींत, तेथील उष्णता किंवा थंडी यांचें प्रमाण किती याचाहि माणसानें शोध लावला आहे.

पशु-पक्षी, मासे-खेकडे यांचा विस्तार किती आहे, कसा आहे, त्यांचा जीवनक्रम कसा असतो याची माहिती मनुष्यानें मिळविली आहेच. पण ज्या प्राण्याविषयीं आपल्या मनांत केवळ तुच्छता आणि तिरस्कार असतो अशा कृमिकीटकांचे प्रकार जगांत किती आहेत, ते कसे जगतात, त्यांच्या विस्ताराला मर्यादा कोणकोणत्या आहेत, कित्येक प्राण्यांचा सर्वनाश कां झाला या सर्व गोष्टींची माहिती मनुष्यानें मिळविली आहे. निरीक्षण, परीक्षण व प्रयोग यांच्या मदतीला जगभर पसरलेल्या माणसानें परस्पर सहयोग घेतला. उपलब्ध सर्व माहिती लिहून काढली. चुकींची माहिती सुधारली आणि ज्ञानराशी अखंड वाढविण्याचें व्रत घेतलें.

जगायचें तर कित्येक अनिष्ट प्राण्यांना मारून टाकल्यावांचून गत्यंतर नाहीं, असें ठरवून माणसानें संहाराची कला देखील वाढविली. प्राणिसृष्टीचा नाश करणारीं विनाशक द्रव्यें कोणतीं यांचा शोध तर माणसानें चालविलाच; पण एवढ्यानें तृप्ति न होतां माणसानें सृष्टीला ठाऊक नसलेले

कितीतरी विषारी पदार्थ नवे नवे निर्माण केले आहेत. शेती वांचविण्यासाठीं असंख्य किड्यांचा संहार करावा लागतो. त्यासाठीं विषारी द्रव्याचा सडा किंवा पाऊस पाडावा लागतो. तसें करतांना परोपकारी पक्ष्यांचाहि संहार होतो. पाण्याचे झरे कलुषित होऊन मनुष्याचें स्वास्थ्य बिघडतें. असा अनुभव वाढल्यामुळें, मनुष्यानें आतां आपल्या या उत्पाताला आळा घालण्याचें ठरविलें आहे.

अज्ञानाचें तमोगुणी सुख माणसानें सोडून दिलें आणि ज्ञानप्राप्तीच्या मागें तो लागला. पण ज्ञान ही सोपी वस्तु नाहीं. अल्पज्ञानासारखें भयानक तत्त्व दुसरें नाहीं. पण अल्पज्ञानानें कितीहि नुकसान होत असलें तरी मनुष्य अज्ञानाकडे परत जाऊं शकतच नाहीं. अल्पज्ञानाचा इलाज अधिक ज्ञान आणि पूर्णज्ञान हाच आहे.

भौतिक पदार्थांची माहिती घेतां घेतां मनुष्य आंतरजगांत शिरला आणि त्यानें मानसशास्त्राचा अभ्यास चालविला. बाह्यजगाहून आंतरजग कमी विस्तीर्ण किंवा कमी महत्त्वाचें नाहींच. जीवसृष्टीनें प्राणशक्ति मिळविली. प्राणशक्तींतून मन अवतरलें. मनानें बुद्धि आणि अहंकाराचा ठाव घेतला आणि हळूहळू आत्म्याची स्थापना केली. जीवसृष्टि ज्या नियमानें बांधली गेली आहे त्यांचा परिचय वाढतां वाढतां मनुष्याला मानवसृष्टीचा साक्षात्कार झाला. तेथें त्याला असंतोष आणि तृप्ति यांचा प्रथम साक्षात्कार झाला. त्यांतून धर्माचा आणि अध्यात्माचा उदय झाला.

मनुष्यानें पाहिलें कीं, या भौतिक सृष्टींत ज्याप्रमाणें विकासक्रम आहे त्याचप्रमाणें आंतरसृष्टींत देखील विकासक्रम आहे. धर्मज्ञानांत, अध्यात्माच्या साधनेंत, ईश्वराच्या अनुग्रहांत आणि त्याच्या अवतारकार्यांत देखील क्रमविकास पहावयाला मिळतो.

हें सर्व पाहून मनुष्याला आपल्या सर्व ज्ञानाची व्यवस्था करणें जरुरीचें आणि सुलभ वाटूं लागलें. आणि त्यानें प्रयोगविद्या आणि चिंतन, ध्यान, धारणा, समाधि यांचा विकास करणारी योगविद्या यांचा समन्वय करण्याचें ठरविलें. ज्ञानाच्या शाखा परस्परभिन्न नसून परस्परसंबंधित आहेत. सृष्टींतील अनंत विस्तार मूलभूत ऐक्याला बाधक होऊं शकत नाहीं. सृष्टीचा क्रम जसा लोकक्षयकृत आहे तसाच तो लोकोन्नतिकृतहि आहे, असा अनुभव येऊं लागल्यानंतर मनुष्याला एक प्रकारचें समाधान लाभूं लागलें आहे.

आतां मनुष्याला वाटूं लागलें आहे कीं, विज्ञानाच्या पोरपणांत आपण जें निरीक्षण-परीक्षण आदि केलें त्याच्या पुढें जाऊन आतां परिणतप्रज्ञेच्या जोरावर पुन्हां ज्ञानयात्रेचा प्रौढ प्रारंभ केला पाहिजे.

असें वाटूं लागल्यापासून मनुष्यानें पुन्हां आपल्या आसपासच्या जल-तत्त्वाचें निरीक्षण-परीक्षण सुरू केलें आहे. सूर्य आपल्या किरणांनीं पृथ्वी-वरील पाणी खेंचून त्याची वाफ बनवितो. या वाफेचे ढग होतात. ढग यथाकाळीं पावसाच्या रूपानें सृष्टीला आशीर्वाद देतात. नद्या वाहूं लागतात. खेचर, भूचर आणि जलचर प्राणी कृतार्थ होतात. सर्व पाणी पुन्हां समुद्रालाच जाऊन मिळतें आणि एक यज्ञचक्र पुरें होतें. हा जो जुना अनुभव त्यालाच नव्या भूमिकेवर पुन्हां तपासावें अशी बुद्धि मनुष्याला झाली आहे. आणि म्हणून आकाशांतील ढग, हवेंतील ओलावा आणि पृथ्वीवरील जलतत्त्व या सर्वांचें खोल आणि प्रौढ अध्ययन सुरू झालें आहे.

हें अध्ययन अगदीं नवें आहे. याची माहिती कॉलेजच्या किंवा युनिव्ह-र्सिटीच्या अभ्यासक्रमांत अजून दाखल झालेली नाहीं आणि म्हणूनच मुद्दाम सांगावें लागतें कीं मातेच्या उदरांत आपण जणूं खाऱ्या समुद्रांत पोहत असतों; या आद्य अनुभवाचा आणि समुद्रसृष्टीचा तुलनात्मक अभ्यास करणें अत्यंत मनोरंजक आहे. आपण समुद्रांत असल्या वेळीं आणि जमिनीवर आल्यानंतर देखील पाण्याशीं असलेला आपला संबंध कधींहि तुटूं शकत नाहीं, हें ओळखण्यासाठीं आणि ओळखल्यानंतर आपण भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही प्रकारच्या ज्ञानांचा समन्वय केला पाहिजे आणि अध्या-त्माचा प्रारंभ जुन्या ग्रंथांपासून न करतां समुद्रशास्त्र (oceanography) या जीवनशास्त्रापासून केला पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं पाण्याला जीवन म्हटलें त्या वेळीं त्यांना जी प्रतीति आली तीच प्रतीति आपल्याला आतां नव्यानें आणि गूढपणें होत आहे. खरोखर ज्ञानानंद, विकासानंद आणि अद्वैतानंद हाच खरा आनंद आहे. जीवनानंदामध्यें हे सर्व आनंद सामावतात.

एप्रिल, १९६७

***

# हिंदी महासागराची हांक

१८

[ १ ]

" भारताला स्वतंत्र केल्यावांचून गत्यंतर नाहीं; भारत पराधीन आहे तोंवर राष्ट्राची कोणत्याहि प्रकारची उन्नति होणें शक्य नाहीं. " या निश्चयानें आपण स्वराज्याची चळवळ चालविली आणि शेवटीं सर्वांच्या संकल्पाला आणि प्रयत्नांना यश येऊन भारत स्वतंत्र झाला. ही आनंदाची गोष्ट आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर या देशांत आम्ही स्वर्गाची स्थापना करूं किंवा नरकांत खितपत पडूं, ही आमच्या मर्जीची गोष्ट आहे, पण परतंत्र राहणार नाहीं; हा त्या वेळचा दृढ संकल्प होता. त्या वेळींच आपापसांतील चर्चेंत आम्ही म्हणत असूं कीं, स्वातंत्र्य मिळविलें म्हणजे तें टिकविण्याची जबाबदारी आपल्यावर येणारच. त्याचें चिंतन आतांपासून केलें पाहिजे. देशाचें रक्षण करणें ही जबाबदारी क्षत्रियांची; क्षत्रिय हरले तर सगळें राष्ट्र हरलें, अशी बावळट कल्पना आपण उराशीं बाळगली आणि देशरक्षणाविषयीं राष्ट्रहृदय बेफिकीर राहिलें. याचा परिणाम केवढा भयंकर झाला हें आतां समजावून सांगण्याची गरज नाहीं. आपल्या संस्कृतींत क्षात्रधर्माचें विवरण विस्तारानें मिळतें. क्षत्रिय देशासाठीं लढले. माघार घेणार नहीं, प्राण अर्पण करील पण क्षात्रधर्म लाजेल असें कांहीं करणार नाहीं. सर्व वर्णांचें रक्षण करणें हा क्षत्रियाचा धर्म आहे. इत्यादि गोष्टी जुन्या ग्रंथांत विस्तारानें सांगितल्या आहेत. फक्त एकच गोष्ट राहून गेली आहे—राष्ट्ररक्षणासाठीं सगळ्या क्षत्रियांनीं एकत्र होऊन लढलें पाहिजे, आपापसांतील ईर्ष्या-असूया विसरून जाऊन एक झालें पाहिजे. एवढी एक गोष्ट आग्रहानें सांगितलेली कुठें दिसत नाहीं. क्षत्रिय राजे आपापल्या राज्याचें रक्षण करण्यासाठीं आणि राज्याचा विस्तार करण्यासाठीं आपापसांत लढत. एखादा महत्त्वाकांक्षी राजा आसपासच्या राजांना परास्त करून चक्रवर्ती किंवा मंडलेश्वर बनत असे. ब्राह्मण अशा चक्रवर्ती राजांचा जयजयकार

गात. त्यांच्या नांवानें मंत्रपुष्प बोलत. पण चक्रवर्तीची शक्ति जरा ढिली पडतांच मांडलिक राजे स्वतंत्र होत असत. जनतेला साम्राज्यें हवीं होतीं; पण राजेलोकांना आपापलें लहान-मोठें राज्य असावें असेंच वाटे. सबंध राष्ट्र एक आहे याची जाणीव धर्मसंस्कृतीला होती, पण राजसत्तेला ती गोष्ट पटली नव्हती. आपले राजे लोक अडीअडचणींच्या वेळीं परकीयांची मदत घेत. पण परकीयांविरुद्ध स्वकीयांना मदत करण्याची विशेष जबाबदारी त्यांना पटलेली दिसत नाहीं. पठाणांनीं किंवा मोंगलांनीं कोणत्याहि हिंदु राज्यावर हल्ला करावा, आसपासच्या हिंदु राज्यांना त्याचें वैषम्य वाटत असलेलें दिसत नाहीं. राज्याचें रक्षण क्षत्रिय करतील; प्रजेचा धर्म एकच—ज्या कुणाचें राज्य होईल तें स्वीकारून शांतीनें नांदावयाचें !

अशा प्रकारची राष्ट्रीय मनोवृत्ति असल्यामुळें राष्ट्ररक्षणाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे, प्रत्येकानें ती जबाबदारी ओळखली पाहिजे आणि राष्ट्ररक्षणाचें चिंतन चालविलें पाहिजे, हें अजून आपल्या लोकांना उमगलेलें दिसत नाहीं. 'राष्ट्ररक्षणाचा विचार स्वदेशी किंवा परदेशी सरकार करीलच. तें काम सरकारचें आहे, प्रजेचें नव्हे' अशीच मनोवृत्ति सर्वत्र दिसून येते. फरक इतकाच कीं पूर्वीं आपण म्हणत असूं कीं, राष्ट्ररक्षणाची जबाबदारी क्षत्रियांची; आतां आपण म्हणतों कीं, ती जबाबदारी सरकारची आणि सरकारच्या फौजेची. राष्ट्रांतील प्रत्येक जिवंत माणसाची ही जबाबदारी आहे असें भान अजून तीव्र झालेलें दिसत नाहीं.

गेल्या शंभर वर्षांत क्रांतिकारी लोकांच्या डोक्यांत विचार आला खरा कीं, जनतेनेंच लढून स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे. पण सबंध जनतेची उठावणी करण्याइतकी तयारी कधींच झाली नाहीं. अठराशें सत्तावन सालीं भारतीय फौजेनें ( हिंदु-मुसलमान एक होऊन ) इंग्रजांचें राज्य तोडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर देखील फौजेंत असंतोष उत्पन्न करावा, असे तुरळक प्रयत्न झाले; पण समस्त जनतेच्या उठावणीच्या विचारानें देशांत मूळ धरलें नाहीं.

समस्त जनतेच्या उठावणीचा खरा प्रयत्न महात्माजींनीं केला; पण तो सशस्त्र उठावाचा नसून सत्याग्रहाचा होता.

तें कसेंहि असो. गांधीकाळांतच हजारों आणि लाखों लोक स्वराज्यासाठीं बंडखोर होऊं शकले आणि त्यांनीं तऱ्हेतऱ्हेच्या हालअपेष्टा सहन केल्या. जनजागृतीच्या दृष्टीनें हा पहिला आणि व्यापक प्रयत्न होता.

शेवटीं युरोपांत दोन महायुद्धें झालीं. जगाची परिस्थिति बदलली. गांधीजींच्या उठावाला यश मिळालें. आणि भारत स्वतंत्र झाला.

पण राष्ट्ररक्षणाच्या जबाबदारीची कल्पना आज कोणत्या स्थितींत आहे? आपण स्वराज्य मिळविलें आणि गांधीजींना घालवून बसलों. त्यानंतर आजवर गांधीपद्धतीनें राष्ट्ररक्षण करण्याची विचार-जागृति किंवा प्रवृत्ति कुठेंच दिसत नाहीं. गांधींना पूज्य मानणाऱ्या लोकांच्या हातीं स्वराज्याचे अधिकार आले. त्यांनीं सशस्त्र फौज कायम ठेवली. पण राष्ट्ररक्षणाला ती पर्याप्त आहे किंवा नाहीं याचा विचार केलेला दिसत नाहीं. राष्ट्रांतील सर्वच लोक अर्थकारणाची चर्चा करतात. धर्मकारणाची आणि समाजकारणाची चर्चा दिवसरात्र होते. जगांतील सर्व विषयांची आपण चर्चा करतों. पण राष्ट्ररक्षणाच्या नीतीची आणि योजनांची चर्चा कुठेंच ऐकूं येत नाहीं. ती जबाबदारी सरकारची! आणि आमची जबाबदारी? सरकारवर टीका करण्याची! असा श्रमविभाग ठरून गेला आहे.

गांधीवादी लोक समजूतदार आहेत. सरकारनें सशस्त्र फौज जय्यत ठेवली आहे याची टीका अहिंसेच्या दृष्टीनें ते करीत नाहींत. तत्त्वतः त्यांचें म्हणणें आहे कीं, अहिंसेच्या जोरावर-असहकार व सत्याग्रहाच्या जोरावर-राष्ट्ररक्षण करणें शक्य आहे. एवढें म्हणून आपण थांबतों. त्यासाठीं काय केलें पाहिजे, केवढी प्रचंड तयारी केली पाहिजे आणि कोणत्या क्रमानें प्रगति केली पाहिजे याचें चिंतन कोणीच करीत असलेलें दिसत नाहीं. (आम्ही लोक हल्लीं शांतिसेनेची गोष्ट करतों खरे. या प्रवृत्तीवर माझा पूर्ण विश्वास आहे. पण नांव घेण्याजोगी किंवा आशा उत्पन्न होण्याजोगी अजून कसलीच तयारी दिसत नाहीं.)

"देशाची अहिंसक पद्धतीची तयारी नाहीं तोंवर सरकारच्या फौजी तयारीचें समर्थन केलें पाहिजे" असें एका राष्ट्रसेवकानें म्हणतांच शांततावादी कित्येकांनीं काहूर माजवून म्हटलें कीं, "अहिंसक तत्त्वज्ञानांत तुमचें म्हणणें बसूं शकत नाहीं. आपण अहिंसावादी आहोंत. अहिंसक प्रतिकाराचाच आपण पुरस्कार केला पाहिजे इत्यादि..."

अहिंसेचा प्रचार आपल्या ऋषिमुनींनीं आणि संतांनीं यथेच्छ केला आहे. भगवान बुद्धानें अवैरवृत्तीचे गोडवे गाइले. जैन लोकांनीं जीवदयेचा प्रचार केला. सापाविंचू देखील मारूं नयेत असा आग्रह धरला. पण या लोकांना राष्ट्ररक्षणाची चिंता नव्हती. अहिंसेनें जीवदया वाढते. मोक्ष जवळ येतो.

जीवन निष्पाप होतें. ही गोष्ट सर्वांना पटली आहे. पश्चिमेकडील युद्धविरोधी शांततावादी लोकांचें म्हणणें देखील हेंच आहे कीं, ज्याला मनुष्यहत्या करणें पाप आहे हें पूर्णपणें पटलें त्यानें युद्धांत भाग घेतां कामा नये; मग परिणाम कांहींहि होवो. आम्ही या पापकर्मांत भाग घेणार नाहीं; फौज ठेवून युद्ध करूं पाहणाऱ्या सरकारशीं आमचा सहयोग केव्हांहि नसणार; मग तें सरकार परदेशी असो किंवा स्वदेशी असो. ही त्यांची भूमिका. युद्धाला विरोध केल्यानें, फौजेंत दाखल होण्याचा इन्कार केल्यानें जी शिक्षा भोगावी लागेल ती भोगण्यास आपण तयार आहोंत, यांत आमच्या अहिंसाधर्माची परिसमाप्ति आहे, असें ते म्हणतात.

गांधीजींची भूमिका याहून निराळी आहे. अन्यायाचा प्रतिकार करणें आणि राष्ट्राचें रक्षण करणें हीं दोन कर्तव्यें प्रत्येक आबाल-वृद्ध स्त्रीपुरुषाला चिकटलेलींच आहेत, हा गांधीजींचा सार्वभौम सिद्धान्त आहे.

याचें प्रतिपादन केल्यानंतर ते दुसरा सिद्धान्त मांडतात कीं, अन्यायाचा प्रतिकार म्हणजे राष्ट्राचें रक्षण अहिंसक प्रतिकाराच्या द्वारा खात्रीनें होऊं शकतें. या विचाराचा प्रचार करून, निरनिराळे प्रयोग करून अहिंसक प्रतिकाराला विश्वमान्य करणें शक्य आहे. म्हणून सत्य आणि अहिंसा तसेंच त्याग, संयम आणि सेवा यांच्या जोरावर अहिंसक संस्कृति स्थापन करणें शक्य आहे; आणि असहयोग व सत्याग्रह या रूपानें प्रगट होणाऱ्या बलिदानाच्या शक्तीनें विजय खात्रीनें मिळूं शकतो, हा आहे गांधीजींचा निरपवाद आग्रह.

इतकें म्हटल्यानंतर गांधी म्हणतात कीं, जर तुम्हांला अन्यायाचा प्रतिकार माझ्या अहिंसक पद्धतीनें करतां न आला तर अहिंसेची ढाल वापरून भ्याड बनूं नका ! जुन्या आणि माझ्या दृष्टीनें टाकाऊ अशा हिंसामार्गाचा अवलंब तुम्ही केला, तर भ्याडपणापेक्षां तो मार्ग चांगला, असें मी निःशंकपणें म्हणेन.

गांधीजींचें तत्त्वज्ञान स्वराज्यपरायण भारताला पटलें. शांतिपरायण युद्धविरोधी जगाला गांधीजी जवळचे वाटतात याचें हेंच कारण कीं, गांधी मऊपणें अहिंसेची महती गाणारे दैववादी संत नसून अन्यायाचा प्रतिकार करणारे, क्षात्रतेजाला सार्वभौम बनविणारे शूर वीर लोकनेते आहेत. भविष्यकाळ त्यांचा आहे. आजचें जग युद्धाची लोकोत्तर तयारी करून देखील सुरक्षित नाहीं. विचारी लोकांचा युद्धरूपी हिंसेवरचा विश्वास उडाला आहे, पण तो

अहिंसेवर बसला नाहीं. अशा गोंधळलेल्या स्थितींत जग आहे आणि म्हणूनच जग गांधीविचाराचें मोठ्या आस्थेनें अध्ययन करूं लागलें आहे.

[ २ ]

एवढ्या विशाल, विस्तृत भूमिकेंतील प्रतिपादनानंतरच आपल्याला भारतरक्षणाचा विचार करायचा आहे.

गांधीजींचें दर्शनहि घडलें नव्हतें, त्यांची अहिंसा पटलेली नव्हती अशा काळापासून देशरक्षणाचा विचार करीत असतांना आणि इतिहासांतून बोध घेऊन जुन्या चुका सुधारण्याचा प्रचार करीत असतांना एक गोष्ट पटली होती कीं, यापुढें केवळ क्षत्रियवर्णावर किंवा केवळ सरकारी फौजेवर विसंबून राहणें योग्य होणार नाहीं. देशरक्षणाचें कर्तव्य देशांतील प्रत्येक जिवंत माणसाचें आहे आणि त्यासाठीं योग्य तें शिक्षण आणि योग्य ती तालीम राष्ट्रव्यापी करणें आवश्यक आहे, ही गोष्ट बालंबाल पटली आहे. मला कोणी विचारलें कीं, देशरक्षणाची जबाबदारी कुणाची, तर मी मुद्दाम खोंचकपणें म्हणतों कीं, ज्याला पति व्हायचें आहे आणि पिता व्हायचें आहे त्याची जबाबदारी तर खरीच ! गृहस्थाश्रम ज्याला चालवायचा आहे आणि भावी पिढीच्या उत्कर्षाची जबाबदारी जो स्वीकारतो तो साधु-संन्यासी, ब्रह्मचारी असो किंवा विवाहित असो; देशरक्षणाची जबाबदारी कुणालाहि टळूं शकत नाहीं. या बाबतींत ज्या लोकांना आध्यात्मिक अड-चण वाटत असेल त्यांचा मार्ग गांधींनीं मोकळा केला आहे. अन्यायाचा प्रतिकार आणि राष्ट्राचें रक्षण करण्याचे मार्ग दोन-एक आहे हिंसक दुसरा आहे अहिंसक. आपापल्या श्रद्धेप्रमाणें दोहोंपैकीं एका मार्गाचें ग्रहण केल्या-वांचून सुटका नाहीं. अहिंसक पद्धतीनें का होईना, राष्ट्ररक्षणाच्या कामीं जो आपलें जीवनसर्वस्व अर्पण करीत नाहीं त्याचें जीवन निष्पाप होऊं शकणार नाहीं. माणुसकीला तो अंतरला. या बाबतींत दुमत असण्याचें कारण नाहीं.

देशाचें रक्षण दोन रीतींनीं करायचें असतें—स्वचक्र आणि परचक्र हीं त्याचीं जुनीं नांवें आहेत. देशाच्या आंतल्या आंत बंडाळी उत्पन्न झाली, अराजक माजलें, गुंडांचा सुळसुळाट झाला, पेंढारी आणि ठग जनतेला नाडूं लागले तर अशा अंतस्थ बंडाळीचा धींमोड करणें ही राष्ट्ररक्षणाची एक बाजू.

आणि जर, राष्ट्राच्या बाहेरून शत्रु चाल करून आला आणि देश जिंकण्याचा त्यानें मनसुबा केला तर सारी राष्ट्रशक्ति एकत्र करून बाह्य आक्रमणाशीं सामना करणें ही राष्ट्ररक्षणाची दुसरी बाजू. यासाठीं आपण केवळ फौजेवर अवलंबून रहात नसतों. आसपासच्या राष्ट्रांशीं स्नेहसंबंध वाढविणें, शेजाऱ्यांच्या उपयोगी पडणें, आक्रमणकारी माणसाचा प्रतिकार करीत रहाणें आणि सर्व जगाला न्यायपरायण, शांतिपरायण बनविणें ही सर्वांत मोठी गोष्ट आहे.

पण परिस्थिति बिथरली तर गफलतींत न राहतां बाह्य आक्रमणाला तोंड देण्याची सतत तयारी असलीच पाहिजे. या बाबतींत थोडी देखील गफलत अक्षम्य मानली जाईल.

मी सध्यां प्रचार चालविला आहे कीं, बाहेरून देशावर आक्रमण आलें तर अहिंसक पद्धतीनें राष्ट्ररक्षण करण्याची तयारी आज नाहीं. यथाकाळीं ती होईल तेव्हां होवो; पण सध्यां देशांतील आंतरिक सुरक्षा, शांति आणि न्याय्य समाजव्यवस्था कायम ठेवण्यासाठीं फौजेचा किंवा पोलिसचा उपयोग करण्याची पाळी न यावी यासाठीं आपण एवढ्या प्रचंड देशांत कमींत कमी पन्नास लाख शांतिसैनिकांना शिक्षण देऊन तयार केलें पाहिजे. हें काम पांच दहा वर्षांत होऊं शकेल. जबरदस्त प्रयत्न केला तर हें अशक्य नाहीं. आंतरिक सुरक्षेसाठीं पन्नास लाख शांतिसैनिकांची फौज जर आपण तयार करूं शकलों तर तिचा प्रभाव जगावर पडल्यावांचून राहणार नाहीं. आणि मग पुढचा मार्ग आपल्याला स्पष्ट दिसूं लागेल.

या शांतिसेनेचे दोन विभाग असतील—स्थलसेना आणि चलसेना. स्थलसेनेचीं पथकें आपापल्या प्रदेशांत शांति आणि सुरक्षा कायम राहील याचा सतत प्रयत्न करीत राहतील. चलसेना भारतांत जिथें कुठें आवश्यकता उत्पन्न होईल तिथें पाठविली जाईल. या साऱ्या योजनेचा विस्तार करण्याचें हें स्थळ नव्हे. आज आपण बाह्य आक्रमणाविरुद्ध देशाचें ताबडतोब रक्षण कसें करतां येईल याचाच मुख्यत्वें विचार करणार आहोंत.

[ ३ ]

हिंदुस्थानाच्या रक्षणाचा विचार स्थळमार्गानें आणि जलमार्गानें होणाऱ्या आक्रमणाच्या दृष्टीनें करावा लागणार.

असें म्हणतात कीं, देशाच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें मैल पांच मैलांहून समुद्रांत दूरवर न जातां बंदरें करीत जाण्याची कला जगांत सर्वत्र होती. देशाच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें समुद्रयात्रा करण्याच्या कलेला इंग्रजींत 'कॅबोटेज' म्हणतात. या कलेंत माणूस-जात प्रथमपासून सर्वत्र तरबेज होती. पण समुद्रांत शिरून, समुद्रांत शेंकडों मैल घुसून मोठेमोठे महासागर सरळ आरपार विंधणें याला जी दर्यावर्दी हिंमत लागते ती मानवी इतिहासांत प्रथम भारताच्या लोकांनीं दाखविली. आज या कलेंत आपण मागासलेले आहोंत. ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, जपान, रशिया आदि देशांनीं या बाबतींत खूपच प्रगति केली आहे. त्यांच्या मानानें आपण अगदींच मागासलेले आहोंत.

एकाकाळीं हिमालयानें आपलें उत्तरेच्या बाजूनें रक्षण केलें. देशावर आक्रमणें आलीं तीं उत्तर-पश्चिमेकडून किंवा उत्तर-पूर्वेकडून. त्याकाळीं समुद्राच्या बाजूनें आपण सुरक्षित होतों. पण बघतां बघतां स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड, डच आदि दर्यावर्दी राष्ट्रें हिंमतपूर्वक जगभर पसरलीं. समुद्राच्या बाजूनें देशाच्या रक्षणाचा विचार पठाणांनीं किंवा मोगलांनीं मुळींच केला नाहीं. स्थानिक तयारी ठिकठिकाणीं होती. आंग्रे, झामोरीन, वगैरे राजे लोक आपापल्या किनाऱ्याचें रक्षण करीत असत. तरीहि समुद्रमार्गें होणाऱ्या आक्रमणाला तोंड देण्याची तयारी आपण केली नाहीं; आणि आंतरिक एकतेचा विचारच झोंपीं गेलेला ! तेव्हां पोर्तुगीजांपासून इंग्रजांपर्यंत पश्चिमेच्या राष्ट्रांनीं आपली चांगलीच फजीती केली !

पण जुन्या इतिहासाचे रवंथ करून काय फायदा ?

उत्तरेच्या बाजूनें चीननें हल्ला करून आपल्याला सिद्ध करून दिलें कीं, खुश्कीच्या मार्गानें आपण अरक्षित आहोंत. पण इतकी फजीती झाल्यानंतर मला नाहीं वाटत कीं उत्तरेच्या बाजूनें आपण यापुढें गफलतींत राहूं. सरकारनें ती बाजू सांभाळण्याचा निश्चय केला आहेच.

पण समुद्राच्या बाजूनें राष्ट्ररक्षणाची आपली तयारी कितपत आहे ?

सरकार म्हणेल कीं, आम्ही जागरूक आहोंत; आमची तयारी जोरानें चालू आहे. सरकारच्या या वचनावर विश्वास ठेवण्याचें ठरविलें तरी तेवढ्यानें संतोष होतां कामा नये. कर्ज काढून आज आपल्याला हवीं तितकीं लढाऊ आणि व्यापारी जहाजें विकत घेतां येतील. पण तीं चालवायचीं कुणीं ?

जपानी, इंग्रज, रशियन किंवा अमेरिकन लोकांना बोलवून आपण त्यांच्यामार्फत देशाचें रक्षण करणें शक्य नाहीं. त्याला 'स्वराज्य' म्हणतां यायचें नाहीं !

भारताच्या तीन बाजूंनीं हजारों मैलांचा समुद्रकिनारा आहे. या बाजूंनीं जर एखादी परकी सत्ता आज भारतावर हल्ला करीत नसेल तर त्याचें कारण भारताची शक्ति किंवा भारताची तयारी नसून इंग्लंडचीं जहाजें हिन्दी महासागरांत येरझारा घालीत असतात, म्हणून आपण सुरक्षित आहोंत. कबूल केलें पाहिजे कीं, भारताचें स्वराज्य ब्रिटनद्वारा रक्षित आहे. या अर्थानें आपलें स्वराज्य कॉमनवेल्थच्या अंतर्गतच आहे.

मुख्य प्रश्न हा नाहीं कीं, भारत सरकारची तयारी कितपत आहे ? सरकार कितीहि जागरूक असो किंवा संघटित असो, सरकारची शक्ति लोकमानसाहून अधिक असूंच शकत नाहीं आणि तशी ती नसावीहि. राष्ट्रापेक्षां सरकारचें सामर्थ्य वाढलें तर त्याला 'स्वराज्य' म्हणतां येणार नाहीं; आणि त्या मार्गानें लोकसत्ता टिकणारहि नाहीं.

तेव्हां प्रश्न हा आहे कीं, राष्ट्रमानसांत–कोट्यवधि लोकांच्या हृदयांत समुद्राला स्थान कितपत आहे ? समुद्रकिनाऱ्यावरील आपण सर्व लोक समुद्राचें दर्शन करतों, आगबोटींतून प्रवास करतों. मच्छीमार लोक ज्यांना हवा आहे त्यांना तो आहार पुरा पाडतात; हें सारें खरें. तरीहि आपण लोक फतेमारीनें किंवा आगबोटीनें किंवा वाफरानें प्रवास करण्यापेक्षां आगगाडीनें, मोटारीनें किंवा अशाच जमिनीवरील वाहनानें प्रवास करण्याचें पसंत करतों. आपल्या पूर्वजांनीं समुद्रयात्रेचा निषेधच केला. खारवा आणि खलाशी जातीच्या लोकांना जितकी सामाजिक प्रतिष्ठा असायला पाहिजे होती तितकी आपण कधींच दिली नाहीं. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांना जितकी सामाजिक प्रतिष्ठा असते तितकी खारवा लोकांना अजून तरी आपण दिली नाहीं. आपल्या येथें शेतकरी राज्यकर्ते झाले. पण खारवा लोक राज्यकर्ते झाल्याचीं उदाहरणें किती ? (तुरळक उदाहरणांनी आपणाला संतोष होणार नाहीं. ) एवढ्या मोठ्या देशाला अफाट समुद्रकिनारा असून समुद्राला आपण मज्जावच मानला आहे. समुद्राचें आमंत्रण आपण उत्साहानें स्वीकारलेलें नाहीं.

असें सांगतात कीं, रशियाच्या विरुद्ध जपानला विजय मिळवून देणारा जपानी दर्यासारंग ॲडमिरल टोगो यानेंच जपानी राष्ट्राला खरीखुरी

समुद्राची दीक्षा दिली. समुद्रांत जर प्रचंड तुफान उठलें तर ॲडमिरल टोगो आपल्या खलाश्यांना म्हणे– "जवानांनो, समुद्रांत तुफान उठलें आहे. अशा वेळीं आपण जमिनीवर असणें आपल्याला शोभतें का ? घ्या आपलीं जहाजें आणि चला समुद्रांत. शांत समुद्राचा परिचय असणें याला कांहींच अर्थ नाहीं. तुफानी समुद्राचा परिचय, त्याचें आकर्षण आणि त्याची मस्ती आपल्या हाडींमाशीं खिळेल तेव्हांच आपण खरे जपानी ! 'लढाईच्या वेळीं आपण शांत राहूं' असें वचन समुद्रानें आपल्याला कांहीं दिलेलें नाहीं. तुफानी समुद्र हाच आपल्या नित्याच्या परिचयाचा समुद्र असला पाहिजे."

परवां समुद्रकिनाऱ्यावरील एका प्रख्यात नगरीच्या प्रख्यात शाळेच्या प्राचार्यांला मी विचारलें– "तुमच्या शाळेच्या मालकीच्या बोटी किती आहेत ? तुमचे बोटिंग क्लब किती आहेत ?" ते म्हणाले कीं, "आम्ही मुलांना पोहावयाला शिकवितों. याहून पुढें जाऊं शकत नाहीं. मुलांनीं होडींत बसून समुद्रांत दूरवर जाणें मुलांच्या आई-बापांना पसंत नाहीं; त्यांत जोखीम आहे असें त्यांना वाटतें."

उद्वेगानें मी म्हणालों, "ब्रिटिश किंवा जपानी तरुणांना देखील आई-बाप आहेत ! त्यांचें आपल्या मुलाविषयींचें भ्याड प्रेम नाहीं. आज आपण आपल्या मुलांना लष्करी तालीम देतों, त्यावेळीं आई-बाप विरोध करीत नाहींत. गांधीवादी किंवा जैन आईबापांचीं मुलें देखील एन्. सी. सी. चें शिक्षण घेतात. मग समुद्राच्याच बाबतींत उदासीनता कां ? आपले लोक भ्याड नाहींत याची मला खात्री आहे. सर्व जगांत भारतीय फौजांच्या बहादुरीची वाहवा होते. पण कोण जाणें कशामुळें--आपल्या राष्ट्रांतलें सामुद्री मानस आटून गेलें आहे. देवानें आपल्याला समुद्रकिनारा दिला ही जणूं त्याची चूकच झाली ! इतर देशांतील लोक आपला माल स्वतःच्या बोटींत लादून भारतांत आणून विकतात. भारतांतील माल परदेशांत जातो तो प्रधानतया त्या त्या देशांतील बोटींच्या मार्फत. आपल्याकडे लढाऊ जहाजें इतकीं कमी आहेत कीं संकटसमयीं देशाचें रक्षण आपण स्वतःच्या हिंमतीवर, समुद्रमार्गें आठ दिवस तरी करूं शकूं कीं नाहीं याची वानवाच आहे.

ही झाली लढाऊ जहाजांची गोष्ट. सामान्यपणें कोणत्याहि देशांत लढाऊ जहाजांच्या दसपट, वीसपट व्यापारी जहाजें असावीं लागतात. असें असलें तरच पुरेसे खलाशी आपल्याला मिळूं शकतात.

दोला (स्थळ प्रत)

भारताच्या पश्चिमेला सौराष्ट्र किंवा काठेयावाड हें मोठें द्वीपकल्प आहे. जवळ जवळ सगळ्या बाजूंनीं समुद्र. तरीहि तेथील लोकांनीं अर्णवाचें आमंत्रण स्वीकारलेलें दिसत नाहीं. सौराष्ट्रांत उत्तमोत्तम राष्ट्रीय शाळा पांच दहा तरी आहेत. आज वीस तीस वर्षें झालीं—त्यांना सांगत आलों आहे कीं, तुमच्या शाळेंत नौकानयनाचा विकास करा. दीव बेट सौराष्ट्राच्या दक्षिणेला आहे. लष्करीदृष्ट्या या बेटाचें महत्त्व असाधारण आहे. पण अजून तेथें कसलीच चाहूल नाहीं. गुजरातचे व्यापारी धाडशी आणि साहसी. पूर्व आणि पश्चिम दोन्ही बाजूंना ते दूरदूरच्या देशावर पोहोंचले आहेत. जहाजांत बसून जातात आणि येतात. जहाजांतील पाणी संपलें तर शिडें आडवीं पसरून त्यांत पावसाचें पाणी गोळा करून कित्येक महिने त्यांनीं मुसाफरी केल्याचीं उदाहरणें आहेत. तरीहि गुजरातमधील खारवा जातीच्या उन्नतीसाठीं राष्ट्राच्या नेत्यांनीं आजवर कांहींच केलें नाहीं. बंगालच्या बाजूला कित्येक मुसलमान नेत्यांनीं मात्र त्यांच्या लोकांच्या हृदयापर्यंत समुद्राचें आकर्षण पोहोंचविलें आहे.

राष्ट्रीय जीवनाचा विकास करण्यासाठीं हिंदी महासागराच्या किनाऱ्यावरील राष्ट्रांशीं घरोबा आणि सहयोग वाढविण्यासाठीं आणि राष्ट्ररक्षणासाठीं आपण समुद्रमानस कमावलेंच पाहिजे. आजवर उपेक्षा केली म्हणून कांहीं आपल्या राष्ट्राचें तें वैशिष्ट्य होऊं शकत नाहीं. गफलत, उपेक्षा, बेफिकिरी, आंधळेपणा हीं कांहीं कोणत्याहि संस्कृतीचीं वैशिष्ट्यें होऊं शकत नाहींत. स्वराज्य होण्यापूर्वींच आपण हिंदी महासागर आपला करावयास पाहिजे होता. राष्ट्रीय सरकारनें प्रत्येक भारतीयाच्या घरांत हिंदी महासागराचा एक भला मोठा नकाशा पोहोंचविला पाहिजे. आज त्या प्रचंड महासागराला हिंदी महासागर म्हणतात खरें; पण तो आपला नाहीं, इंग्रजांचा आहे. त्यांच्या ग्रंथांत या महासागराला आत्मीयतेनें ‘ ब्रिटिश सरोवर ’ म्हणतात. कारण या महासागराच्या सर्व बाजूंनीं ब्रिटिश पुरुषार्थ पेरलेला आहे. जेव्हां आपण समुद्राला पादाक्रांत करून समुद्राची दोस्ती वाढवूं तेव्हांच या दक्षिण महासागराला ‘ हिंदी ’ हें विशेषण शोभेल ! समुद्रयात्रा-निषेध करून आपण आपल्या राष्ट्राची खची केली. हें पाप धुऊन काढणें स्वतंत्र भारताचें आणि समुद्रकिनारीं राहणाऱ्या भारतीयांचें प्रथम कर्तव्य आहे.

एप्रिल, १९६७

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५६२९ वि: भ्रमण प्रवास

REFBK-0017214
REFBK-0017214